रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २९४ । पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in



आजच संपर्क साधा: ९८५०९ ८०५३० / ७५०७८ ०१९०५

रायगड, शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

B.com Computer
रिसेप्शनिस्ट महिला पाहिजे. अनुभवाची अट नाही. वेटर/रुमबॉय व महिला पाहिजेत. अर्जासह भेटा.
साई-इन रिसॉर्ट चोंढी, अलिबाग-रेवस रोड अलिबाग

## रोहा, खोपोली, श्रीवर्धन तालुक्यात अवकाळी पाऊस

**। खोपोली/रोहा/श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

एप्रिल महिन्यातील प्रखर उन्हाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात अचानक ढगाळ वातावरण निर्माण होत अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. रोहा, खोपोली (पाताळगंगा परिसर) आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये झालेल्या या अचानक पडलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली असून, शेती, फळबागा आणि स्थानिक व्यवसायांवर त्याचा मोठा परिणाम



झाला आहे. या पावसामुळे आंबा, काजू बागायदार हवालदिल झाले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना वातावरणात अचानक बदल होत ढगाळ स्थिती आणि तुरळक पावसाच्या सरी कोसळत आहेत. या बदलत्या हवामानाचा परिणाम मानवी आरोग्यावरही होत असून,

> या अवकाळी पावसाने आमचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच उत्पादन घटले होते, त्यात उरलेले आंबेही गळून पडले. वर्षभराची मेहनत वाया गेली. शासनाने तात्काळ मदत करावी, अन्यथा आमच्यासाठी जगणे कठीण होईल.
> – संकेत हुमणे, आंबा बागायतदार, श्रीवर्धन

पान २ वर

## विकास निधी शंभर टक्के खर्च

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा वार्षिक आराखड्यातील शंभर टक्के निधीचा विनियोग मुदतीमध्ये करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा नियोजन कार्यालयातून प्राप्त झाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून जिल्ह्याला पालकमंत्री नसतानादेखील निधीचे विनीयोग करण्यास प्रशासनाला यश आल्याचे सांगण्यात आले. सलग पाचव्या वर्षी रायगड जिल्ह्याने जिल्हा विकास निधी शंभर टक्के खर्च केल्याचा दावा करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यासाठी ४८१ कोटी रुपयांच्या वार्षिक आराखड्याला २०२५-२०२६ या वर्षासाठी मंजुरी देण्यात आली होती. कृषी व सलग्न सेवेसाठी ४१.२२ कोटी ग्रामविकाससाठी ३६.२१ कोटी, पान २ वर

### वे|ध|क

#### खरातच्या पत्नीविरोधात लूकआऊट नोटीस

**नाशिक** : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात फरार असलेली त्याची पत्नी कल्पना खरात हिच्याविरुद्ध शिर्डी पोलिसांनी लूकआऊट नोटीस जारी केली आहे. त्यामुळे तिच्या परदेशात पळून जाण्याच्या शक्यतेवर पूर्णविराम लागला असून, देशातील सर्व विमानतळांवर तिच्या प्रवासावर बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, शिर्डी येथील जमीन व्यवहारातील फसवणूक आणि सावकारी प्रकरणात अशोक खरातसह त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल असून, पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे.

#### तरूणाचा मृत्यू

**रसायनी** : रसायनी पोलीस ठाण्याहद्दीमध्ये आपटा गावाच्या जवळील पाताळगंगा नदीच्या पुलावरील रेल्वे पटरीवर ३० वर्षीय तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, महेश मोहन वाघे (रा. तपोरा वाडी, सारसई, ता. पनवेल) हा रेल्वे पटवरीवरून जात असताना रेल्वेची ठोकर लागल्याने त्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाला. त्याला उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले असून, गजानन बाळू पवार याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# 'रायगड' धोक्यात

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र किल्ले रायगड परिसरात एकीकडे समाधीस्थळाजवळ नियमांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे बेकायदा उत्खनन आणि टोलेजंग बांधकामांमुळे जैवविविधता व ऐतिहासिक वारसा धोक्यात आल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. पवित्र स्थळाचा अवमान आणि विकासाच्या नावाखाली सुरू असलेली बेफिकीर तोडफोड; या दुहेरी संकटामुळे रायगडकरांमध्ये संताप उसळला आहे. महाराजांच्या भूमीतच नियम पायदळी तुडविले जात असल्याचा आरोप होत असून, नियमांना फाटा देणाऱ्यांवर प्रशासन आणि सत्ताधारी काय कारवाई करणार, असा थेट सवाल आता जनतेकडून उपस्थित केला जात आहे.**

### छत्रपती शिवाजी महाराज समाधीजवळ
## जि.प. अध्यक्षांकडून नियमभंग

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र रायगड समाधीस्थळी घडलेल्या प्रकाराने रायगडकरांच्या भावना चांगल्याच पेटल्या आहेत. नवनिर्वाचित जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या रायगड दौऱ्यादरम्यान त्यांच्या सोबत आलेल्या कार्यकर्त्यांनी थेट पोलिसांच्या उपस्थितीतच शांतता राखण्याचे फलक काढून टाकल्याची घटना व्हिडिओच्या माध्यमातून समोर आली आहे. त्यामुळे पवित्र स्थळ, स्पष्ट नियम तरीही अशी उघडपणे पायमल्ली? हा सत्तेचा माज नाही तर नेमकं काय आहे, असा थेट सवाल आता रायगडकरांकडून विचारला जात आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, संबंधितांवर तात्काळ कारवाईची मागणी जोर धरत आहे. राजकीय पद मिळालं म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा जाब आता उघडपणे विचारला जातोय.

रायगड हे केवळ पर्यटनस्थळ नसून, मराठी अस्मितेचे आणि



स्वाभिमानाचे प्रतीक मानले जाते. अशा ठिकाणी शिस्त, नियम आणि आदर यांचे काटेकोर पालन होणे अपेक्षित असताना, उघडपणे नियमांची पायमल्ली झाल्याने अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. 'महाराजांच्या समाधीपाशीही नियम धाब्यावर बसवले जात असतील, तर सामान्य नागरिकांनी काय आदर्श घ्यायचा?' असा सवाल आता सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावर अधिकृत स्पष्टीकरण अद्याप आलेले नसून, रायगडकर मात्र स्पष्ट म्हणत आहेत. समाधीस्थळावर स्पष्ट सूचना, नियम आणि शिस्त असतानाही अशी उघड बेफिकिरी दाखवली जाणे म्हणजे केवळ निष्काळजीपणा नाही, तर थेट त्या पवित्र ठिकाणाच्या मर्यादांचा अवमान असल्याची भावना व्यक्त होत आहे. 'नियम सर्वांसाठी सारखे असतात, मग काहींना सूट का?' असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या घटनेनंतर स्थानिक, इतिहासप्रेमी आणि शिवभक्त मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले असून, 'रायगडचा सन्मान राखला गेला पाहिजे' अशी ठाम भूमिका घेतली जात आहे. काही संघटनांनी या प्रकाराची चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

विशेष म्हणजे, पोलिसांच्या उपस्थितीतच हा प्रकार घडल्याचा आरोप असल्याने कायदा-सुव्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह पान २ वर

## जैवविविधता, ऐतिहासिक वारशाला धोका



### उत्खनन आणि बेकायदा बांधकामांवर प्रश्नचिन्ह

**उदय सावंत**

**। महाड ।**


ऐतिहासिक किल्ले रायगड आणि परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे जैवविविधता, नैसर्गिक संपत्ती आणि ऐतिहासिक वास्तूंना गंभीर धोका निर्माण झाला आहे. रायगड प्राधिकरण मार्फत विविध विकास प्रकल्प राबवले जात असताना, खासगी जमिनींच्या खरेदी-विक्रीनंतर मोठ्या प्रमाणात सपाटीकरण व उत्खनन सुरू असल्याचे दिसून येत आहे. या उत्खननामुळे परिसरातील नैसर्गिक सौंदर्य आणि ऐतिहासिक ठेवा धोक्यात आला असून, हे काम

> या विषयाचा मी आढावा घेत असून, त्यानंतर अधिकचा तपशील देण्यात येईल.
> – महेश शितोळे, तहसीलदार, महाड

नेमके कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणी वाडी, पाचाड आणि आसपासच्या भागात पूर्वी भारतीय पुरातत्व विभाग कडून खोदकाम व बांधकामांवर निर्बंध घालण्यात आले होते. मात्र, सध्या या नियमांकडे दुर्लक्ष करून मोठ्या प्रमाणात उत्खनन आणि पान २ वर

## पालीत दूषित पाण्याचा पुरवठा



(छायाचित्र : गौसखान पठाण)

**। सुधागड पाली । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला थेट अंबा नदीतून कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या अंबा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात गढूळ व दूषित स्वरूपात नागरिकांना मिळत असून, त्याबरोबरच अनेक वाहिन्या आतून गंजल्यामुळे पालीकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे भाविक व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.पाली नगरपंचायत पान २ वर

## मोरबे जलवाहिनीतून पाणीचोरी

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणारी मोरबे जलवाहिनी ही पनवेल तालुक्याच्या हद्दीमधून येत असताना देवद-विचुंबे या ठिकाणी अनधिकृतपणे नळ जोडणी करून मोठ्या प्रमाणामध्ये पाणीचोरी होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक प्रदीप गवस यांनी महानगरपालिकेत याबाबत लक्षवेधी मांडली असता पोलिसात तक्रार करण्यात आली होती.

मोरबे धरणाची जलवाहिनी या ग्रामपंचायती हद्दीतून जात असल्याने २००७ मध्ये फक्त ७०० युनिट पाणी देण्याची मुभा देण्यात आले होती. वाढत्या मागणीमुळे २०१४ मध्ये ती १४०० से युनिटपर्यंत वाढवली. मात्र, स्थानिक पातळीवरील वाढते शहरीकरण आणि राजकीय दबाव यांच्याकडून अनधिकृत जोडण्या करून दररोज एक लाख युनिट पाणी उपसले जात असल्याचा आरोप होत असून, याचा फटका नवी मुंबई येथील रहिवाशांना होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेकडून वारंवार पत्रव्यवहार करूनही स्थितीत सुधारणा न झाल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी नगरसेवक प्रदीप गवस यांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याला पत्र पाठवून अनधिकृत पान २ वर

## अंगणवाडीचे बांधकाम लाल फितीत

### वन विभागाकडून वन हक्क दावा मंजूर करण्यास विलंब



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील दाभोळवाडी व कोरळवाडी या आदिवासी वाड्यांमध्ये अंगणवाडी बांधकामासाठी ग्रामस्थांसह महिला रस्त्यावर उतरल्या आहेत. जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाची मंजुरी मिळूनही अंगणवाड्यांचे बांधकाम करण्यात आले नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अंगणवाडीसाठी उपोषण सुरु केले आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या दुर्लक्षपणाचा फटका या वाड्यांमधील मुलांच्या शिक्षणावर होत आहे. बांधकाम करण्यात येणारी जागा वन विभागाच्या अखत्यारीत येत असून, जागेसाठी वन हक्क दावा मंजूर करण्यास विलंब झाल्याने अंगणवाड्यांचे बांधकाम लाल फितीत अडकल्याचे चित्र आहे.

पनवेल तालुक्यातील आपटा ग्रामपंचायत हद्दीत पान २ वर

## तरुणीवर अत्याचार

**डोंबिवली** : येथील टिळकनगर परिसरात २२ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाणे यांनी तातडीने कारवाई करत आरोपी चेतन चव्हाण, हेमंत चव्हाण आणि उमेश वर्मा यांना अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींपैकी दोघांची पीडितेशी पूर्वी ओळख होती. त्यांनी पार्टीचे आमिष दाखवून तिला एका ठिकाणी नेले व तिथे तिसऱ्या आरोपीच्या मदतीने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे.

## जसखारजवळ उड्डाणपूल खचला

### प्रशासन झोपेत, ठेकेदाराला काळ्या यादीत टाका

**। उरण । प्रतिनिधी ।**

करळ फाटा ते जेएनपीए मार्गावरील उड्डाणपूल हा विकासाचा नव्हे तर, थेट भ्रष्टाचाराचा जिवंत नमुना असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. मोठ्या गाजावाजात उद्घाटन करून काहीच महिने लोटले नाहीत, तोच जसखार गावाजवळ मंदिरालगतच्या भागात पुलाला भले मोठे भगदाड पडले आहे. ''उद्घाटन करा आणि विसरून जा'' हीच प्रशासनाची कार्यपद्धती असल्याचे या घटनेतून स्पष्ट होत आहे. पान २ वर



## मयत महिलेवरही गुन्हा दाखल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पोयनाडकडून अलिबागकडे जाणाऱ्या रुग्णवाहिकेच्या धडकेने महिला गंभीर जखमी झाली. त्यामध्ये तिचा मृत्यू झाला. ही घटना पेझारी चेकपोस्ट पुढे पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर बुधवारी (दि. २५) सायंकाळी घडली. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात चालकाविरोधात मंगळवारी (दि. ३१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पेझारी येथील चालक एम.एच १४ सी.एल. पान २ वर

### कच्चा माल महागला | शेकडो कारखानदारांना फटका

## युद्धाचा परिणाम पेणच्या गणेशमूर्ती उद्योगावर

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्याचा आर्थिक कणा मानल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती उद्योगावर आंतरराष्ट्रीय तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम दिसू लागला आहे. विशेषतः अमेरिका-इराण तणावामुळे कच्च्या मालाच्या किमतीत मोठी वाढ झाली असून, याचा थेट फटका पेणमधील शेकडो मूर्ती उत्पादकांना बसत आहे.

पेण तालुक्यातील गणेशमूर्ती उद्योगाला मोठ्या प्रमाणावर



उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाले असून, या क्षेत्रातून हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तालुक्यातील सुमारे ८० टक्के रोजगार या उद्योगावर अवलंबून असल्याने, सध्याची परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी पेणमधून लाखो गणेशमूर्ती देशांतर्गत तसेच परदेशात निर्यात केल्या जातात. मात्र, यावर्षी परदेशी ग्राहकांकडून नोव्हेंबरडिसेंबरमध्ये मिळालेल्या ऑर्डर्स वेळेत पूर्ण झाल्या असल्या तरी, वाहतूक व्यवस्थेतील अडचणींमुळे त्या वेळेवर पाठविणे कठीण झाले आहे. दरवर्षी सुमारे दोन लाखांहून अधिक मूर्ती २५ पेक्षा जास्त देशांमध्ये निर्यात केल्या जातात, ज्यामुळे मोठी आर्थिक उलाढाल होते.

सध्याच्या परिस्थितीत मूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा तसेच पॅकिंगसाठी आवश्यक असलेल्या बॉक्स, रबर आणि फोमचा तुटवडा जाणवत आहे. त्याचबरोबर निर्यात खर्चातही मोठी वाढ झाली असून, काही कंटेनर जेएनपीटी बंदरावर अडकून पडल्याने माल वेळेत पोहोचत नाही. या सर्व अडचणींमुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील पान २ वर

## पेट्रोल-डिझेल खुल्या विक्रीवर बंदी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

समाजमाध्यमांवर पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या अफवा पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.

सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्वलनशील पदार्थांच्या मुक्त विक्रीमुळे अनुचित घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन ही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे.

पेट्रोलियम नियम, २००२ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा



**नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई**

वापर करून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालक व मालकांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार पेट्रोल व डिझेलची विक्री केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच करावी लागणार असून, कोणत्याही परिस्थितीत कॅन, बाटली किंवा इतर अनधिकृत कंटेनरमध्ये इंधन भरण्यास व विक्रीस सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सर्व पेट्रोल पंपांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे व विक्रीची नोंद नियमितपणे राखणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अनधिकृतपणे पेट्रोल-डिझेल साठवणूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येणार आहे.

हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून, पुढील आदेश येईपर्यंत तो कायम राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांविरुद्ध पान २ वर

# मुंढेंच्या बदलीबाबत संघटना आक्रमक

## बदलीच्या आदेशाला स्थगिती देण्यासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी

दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीच्या कार्यवाही नंतर दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची बदली करण्यात आली. या बदलीनंतर रायगड जिल्ह्यातील विविध संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. मुंढे यांच्या बदलीला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते व विविध संघटनांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर कामकाज अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी पुढाकार घेतला. सरकारी खात्यामध्ये असलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याची सूचना सर्व विभागाला देण्यात आली. जिल्हा परिषदेसह सर्व विभाग कामाला लागले. त्यामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन नोकरीला लागलेल्या कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात आली. मुंढे यांनी सुमारे सहा ते सात महिन्यांपूर्वी विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर दिव्यांग सक्षमीकरण विभागात मोठे बदल घडवून आणले. दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या या विभागाला त्यांनी नवी दिशा देत प्रभावी निर्णय घेतले, त्यामुळे विभाग कार्यक्षम तेकडे वाटचाल करू लागला.

दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ ची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू करणे, जिल्हास्तरावर स्वतंत्र दिव्यांग सक्षमीकरण कार्यालये सुरू करणे, शासकीय आस्थापनांमध्ये दिव्यांगांसाठी ४ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश निर्गमित करणे, अशा अनेक महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांविरोधात कारवाई, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९०० हून अधिक संस्थांवर कारवाई, विविध समित्यांची स्थापना यामुळे विभागात शिस्त आणि पारदर्शकता निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दिव्यांगांसाठी स्वतंत्र संकेतस्थळ (वेब पोर्टल) सुरू करून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याने लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचेही निवेदनात सांगण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण झाली असून, प्रत्यक्ष लाभ मिळू लागल्याचे सांगण्यात आले. परंतु, तुकाराम मुंढे यांची या विभागातून अन्य विभागात बदली केल्याच्याविरोधात रायगड जिल्ह्यातील विविध संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे साकडे घालून मुंढे यांची बदली तात्काळ स्थगित करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. याबाबत उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांना निवेदन देण्यात आले.

# रोहन तटकरेंचे जल्लोषात स्वागत

## सैन्य दलातील सेवेनंतर मायदेशी भव्य मिरवणूक



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील गवळीवाडी येथील रोहन तटकरे यांनी भारतीय सैन्य दलातील सेवा पूर्ण केली. देशसेवेतून निवृत्त होऊन ते मायदेशी परतले. सैन्य दलात हवालदार म्हणून कार्यरत असलेले रोहन ओमप्रकाश तटकरे यांचे गावामध्ये ढोल-ताशांच्या गजरात आणि भव्य मिरवणुकीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी फुलांची उधळण करत व तिरंगा झेंडा फडकवत सन्मान केला.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील गवळीवाडी येथील एका गरीब कुटुंबात जन्मलेले रोहन यांनी पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर भारतीय सैन्य दलात सामील होण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यासाठी त्यांनी जिल्हा क्रीडा संकुल मैदानात जोरदार सराव केला. २००६ साली अलिबागमध्ये झालेल्या सैन्य भरतीमध्ये त्यांची निवड झाली. भारतीय सैन्य दलात सामील होण्याचे त्यांचे स्वप्न २९ जून २००६ ला पूर्ण झाले.

बेळगाव येथील मराठा रेजिमेंटल सेंटरमध्ये त्यांनी प्रशिक्षण घेतले. त्यानंतर ते देशसेवेसाठी जम्मू काश्मीर येथे रुजू झाले. त्याठिकाणी त्यांनी दहा वर्षे सेवा केला. त्यानंतर बेळगाव येथील मराठा लाईट इन्फन्ट्री रेजिमेंटल सेंटरमध्ये तीन वर्षे सेवा केली. त्याठिकाणी शस्त्रधारी प्रशिक्षणक म्हणून काम केले. २०२१ मध्ये इंदोर (मध्य प्रदेश) येथे केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना उत्कृष्ट शूटर म्हणून सन्मानित करण्यात आले. दोन वर्षे सियाचीन तसेच कारगिल येथे झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्येदेखील त्यांचा सहभाग होता. वीस वर्षे देश सेवा केल्यानंतर ते एक एप्रिलमध्ये सेवानिवृत्त झाले. देशसेवेनंतर मायदेशी परतणाऱ्या जवानाचे क्षण भावूक होते.

गावातील प्रवेशद्वाराजवळ आल्यावर रोहन तटकरे, त्यांची आई अश्विनी, पत्नी विनिता आणि मुली यांची रथातून ढोल-ताशांच्या गजरात पुष्पवृष्टी करत गवळवाडी गावातून घरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. महिलांनी औक्षण केले आणि फटाक्यांची आतषबाजी करत ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला.

## खांदेश्वर पोलिसांकडून दंगा काबू योजना

। पनवेल । प्रतिनिधी ।

खांदेश्वर पोलिसांच्या मार्फत हद्दीमध्ये शिवशंकर मंदिर खांदा कॉलनी या ठिकाणी पालखी मिरवणुकीवरून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याच्या घटनेच्या अनुषंगाने दंगा काबू योजना राबविण्यात आली. वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे कडील ०५ अधिकारी व ३० पोलीस अंमलदार लाठी काठी ,ढाल हत्यारासह, फायर ब्रिगेडचे एक अधिकारी पाच फायरमन, ॲम्बुलन्स स्टाफ सह एकत्रितपणे हद्दीमध्ये शिवशंकर मंदिर खांदा कॉलनी या ठिकाणी पालखी मिरवणुकीवरून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याच्या घटनेच्या अनुषंगाने दंगा काबू योजना राबविण्यात आली.

# उच्चदाब लाईन कामात बेजबाबदारपणा

## ● नियमांना तिलांजली, नागरिकांच्या जीवाशी खेळ

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।



श्रीवर्धन तालुक्यात सुरू असलेल्या अंडरग्राउंड उच्चदाब विद्युत लाईन टाकण्याच्या कामात गंभीर अनियमितता उघडकीस आल्याने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणांकडून तांत्रिक नियम, सुरक्षा निकष आणि पर्यावरणीय कायद्यांचे उघड उल्लंघन होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीविताला थेट धोका निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान समोर आलेले चित्र अत्यंत चिंताजनक आहे. उच्चदाबाच्या केबल्स ज्या खोलीत टाकणे बंधनकारक आहे, त्या ऐवजी अत्यंत कमी खोलीत टाकून काम उरकले जात असल्याचे स्पष्ट दिसून आले. अशा प्रकारे 'दिसण्यासाठी काम' करून मोठा अपघात घडण्याची शक्यता वाढवण्यात आली आहे. उद्या एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

याचबरोबर, रस्त्यालगत गेल्या चार-पाच वर्षांत जतन करून वाढवलेली झाडे कोणतीही परवानगी किंवा पर्यावरणीय नियम न पाळता निर्दयपणे तोडण्यात येत आहेत. ग्रामस्थ, सेवाभावी संस्था आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रयत्नातून उभे राहिलेले हरित वैभव काही क्षणांत नष्ट केल्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे कंत्राटदार मनमानी करत असल्याचा आरोपही जोर धरत आहे. या गंभीर प्रकारामुळे श्रीवर्धनमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासन आता काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रखवालदाराकडून घरफोडीचा डाव

। पनवेल । प्रतिनिधी ।

शहरातील पुष्पकनोड परिसरात घडलेल्या धक्कादायक घरफोडी प्रकरणात इमारतीच्या रखवालदाराचाच सहभाग असल्याचे उघड झाले. सेक्टर आर-४ मधील सिद्धिविनायक व्हिला येथे सुमारे ४० लाखांच्या ऐवजाची चोरी झाली होती. या इमारतीत राहणारे कुटुंब घराबाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत इमारतीच्या रखवालदाराने घरफोडीचा डाव साधल्याचे समोर आले. यावेळी चोरी झाल्याचे कळताच पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिसांनी संपूर्ण इमारतीची तपासणी केल्यावर चोरांनी टेरेसवरून रस्सीच्या सहाय्याने घरात प्रवेश केला आणि त्यानंतर घरातील लाकडी कपाट फोडून तसेच बेडमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेण्यात आल्याचे समोर आले.



## पनवेलमध्ये ऑटिझम जागरूकता दिनानिमित्त जनजागृती

। पनवेल । प्रतिनिधी ।

जागतिक ऑटिझम जागरुकता दिनानिमित्त पनवेलमधील खांदा कॉलनी येथील ऑटिझम रिसोर्स सेंटर येथे ऑटिझमबाबत समाजात जागरूकता, स्वीकृती आणि समावेशकता वाढवण्यासाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यंदा संयुक्त राष्ट्रांनी २०२६ साठी ''स्वमग्नता आणि मानवता : प्रत्येक जीवन मौल्यवान आहे'' ही संकल्पना जाहीर केली असून, त्यानुसार विविध उपक्रम राबविण्यात आले. सामाजिक जाणीव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने सोपान संस्था संचलित 'समर्पण स्पेशल स्कूल'मार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विशेष मुलांसाठी विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाद्वारे ऑटिझम असलेल्या मुलांच्या क्षमतांचा गौरव करण्यात आला तसेच समाजाने त्यांच्याकडे सकारात्मक आणि समजुतीने पाहावे, असा संदेश देण्यात आला.

## मोबाईलची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील संत सावतामाळी हॉलच्या मागे एका महिलेचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरून नेल्याची घटना घडली आहे. नियाज अहमद पटेल (वय ६८) यांच्या दुकानातून ५ हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरून नेल्याने तसेच फोनचा गैरवापर करून त्यांच्या खात्यातील पैसे काढल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलिस तक्रारदाराची तक्रारीनुसार मोबाईलचा शोध तसेच चोरट्याचा शोध घेत आहेत.

पान १ वरून

## रोहा, खोपोली, श्रीवर्धन तालुक्यात अवकाळी पाऊस

नागरिकांना थकवा आणि आजारांचा त्रास जाणवत असल्याचे दिसून येत आहे. जंगलातील रानमेवा विक्री करणाऱ्या महिलांनीही या परिस्थितीमुळे त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याची माहिती दिली. रोहा तालुक्यात दुपारी अचानक वातावरण बदलून जोरदार वाऱ्यासह पावसाचा शिडकावा झाला. गडगडाटासह झालेल्या पावसामुळे काही प्रमाणात गारवा निर्माण झाला असला, तरी नागरिकांची धावपळ उडाली. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. हनुमान जयंतीनिमित्त उभारण्यात आलेल्या मंडपांवर पावसाचा परिणाम होण्याची भीती डेकोरेटर्स व्यावसायिकांनी व्यक्त केली.

खोपोलीजवळील पाताळगंगा परिसरातही ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसामुळे उन्हाळ्याची तीव्रता कमी जाणवू लागली असली, तरी वातावरणातील या बदलामुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, श्रीवर्धन तालुक्यात अवकाळी पावसाने अक्षरशः थैमान घातले असून, विशेषतः आंबा आणि काजू बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच दुष्काळ आणि मोहर गळतीमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर या पावसाने आणखी संकट कोसळले आहे. अनेक बागांमध्ये आंब्यांची मोठ्या प्रमाणात गळती झाली असून, काही ठिकाणी झाडांचेही नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त शेतकऱ्यांनी शासनाकडे तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. हवामानातील सतत होणारे बदल आणि वाढते अवकाळी पावसाचे प्रमाण यामुळे शेती व्यवसाय अधिकच अस्थिर होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

## जि.प. अध्यक्षांकडून नियमभंग

उपस्थित होत आहे. पोलिसांसमोरच नियम मोडले जात असतील, तर सामान्य नागरिकांनी काय शिकायचं? अशी टीका होत आहे.

राजकीय वर्तुळातही या घटनेची जोरदार चर्चा सुरू झाली असून, या प्रकरणावरून सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अद्याप अधिकृत स्पष्टीकरण न आल्याने वाद अधिकच चिघळण्याची शक्यता आहे. रायगडातील मावळ्यांचा सूर आता अधिकच आक्रमक झाला असून, 'महाराजांच्या भूमीत कोणताही माज चालणार नाही' असा स्पष्ट इशारा दिला जात आहे. या घटनेमुळे केवळ एका व्यक्तीवरच नव्हे, तर संपूर्ण यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या प्रकरणावर संबंधितांकडून अधिकृत स्पष्टीकरण अद्याप आलेले नसले, तरी संतप्त जनतेने प्रशासनाकडे उत्तरांची मागणी सुरूच ठेवली आहे. रायगडकरांसाठी हा विषय केवळ राजकारणाचा नसून भावनेचा आहे. आणि त्या भावनेला धक्का बसला, तर प्रतिक्रिया तीव्र होणारच, असे मत इतिहासप्रेमी, रायगडकरांसह ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## अंगणवाडीचे बांधकाम लाल फितीत

दाभोळवाडी व कोरळवाडी या दोन आदिवासी वाड्या आहेत. शेकडो लोकवस्ती असलेल्या या वाड्यांमधील बालकांना प्राथमिक पूर्व शिक्षण घेण्याची संधी मिळावी, यासाठी स्थानिकांनी जिल्हा परिषदेकडे अंगणवाडीसाठी मागणी केली होती. जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाकडून या अंगणवाडीसाठी मंजुरी मिळाली. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता आदेश देण्यात आले. त्यानंतर अंगणवाडी केंद्राचे जिल्हास्तरावरून कार्यारंभ आदेश देण्यात आले. प्रस्तावित केंद्राची जागा वन खात्याच्या अखत्यारित येत आहे. जागेसाठी वन हक्क दावा करण्यात आला. परंतु, वन हक्क दावा वन विभागाकडून अद्याप मंजूर करण्यात आला नाही. त्यामुळे अंगणवाडी इमारत बांधकामासाठी विलंब होत आहे. आदिवाडी वाड्यांमधील मुलांना प्राथमिक पूर्व शिक्षण मिळण्यास दिरंगाई होत आहे. ही बालके शिक्षणापासून वंचित आहेत. वन हक्क दाव्याचा प्रस्ताव लाल फितीत अडकून पडला आहे. वन विभागाने या प्रकरावर त्रुटी काढल्या आहेत. अंगणवाड्यांच्या बांधकामाला त्रुटीची आडकाठी आली आहे. याकडे जिल्हा परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर अंगणवाडी उभारण्यासाठी सहकार्य करावे, अशी मागणी होत आहे.

पनवेल येथील दाभोळवाडी व कोरळवाडी या आदिवासी वाड्यांमधील अंगणवाडी केंद्रांसाठी सुमारे प्रत्येकी १२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. 'शासकीय काम आणि सहा महिने' थांब अशी अवस्था आता निर्माण झाली आहे. याकडे प्रशासन काय भूमिका घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. अंगणवाड्यांचे बांधकाम करण्यासाठी एक एप्रिल रोजी कोरळवाडीमधील ग्रामस्थ व महिलांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पेण येथे उपोषण केले होते.

**पनवेल तालुक्यातील कोरळवाडी व दाभोळवाडी येथील आदिवासी वाड्यांमध्ये दोन अंगणवाड्या मंजूर झाल्या आहेत. ज्या ठिकाणी या इमारतींचे बांधकाम केले जाणार आहे, ती जागा वन खात्याच्या अखत्यारित येत आहे. वन हक्क दावा अंतर्गत जागा मंजूर करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. परंतु, काही त्रुटी काढण्यात आल्या आहेत. त्रुटींची पूर्तता झाल्यावर अंगणवाडीसाठी जागा उपलब्ध होणार आहे. त्यानंतर इमारत बांधकामाचा मार्ग मोकळा होईल.**

**– निर्मला कुचिक, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, महिला व बालकल्याण विभाग**

**उपोषण स्थगित**

**कोरळवाडी व दाभोळवाडी आदिवासी वाड्यांमधील मंजूर अंगणवाडी इमारतीचे बांधकाम तात्काळ सुरु करणे व कोरळवाडी येथे बंद प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले होते. बांधकामासाठी लागणाऱ्या जागेत मान्यता मिळण्यासाठी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर केला आहे. पंधरा ते वीस दिवसांमध्ये मंजुरी देणार असल्याचे वन परिक्षेत्र अधिकारी सपना सोनार यांनी कळविले आहे. त्यामुळे तूर्तास उपोषणाला स्थगिती देण्यात आल्याची माहिती उपोषणकर्त्यांनी दिली आहे.**

## युद्धाचा परिणाम पेणच्या गणेशमूर्ती उद्योगावर

गणेशमूर्तींचा व्यापार मंदावला असून, परिस्थिती सुधारली नाही तर मूर्तीकार, रंगकाम करणारे कामगार आणि निर्यातदार यांच्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी, पेण तालुक्याच्या रोजगार व्यवस्थेवरही याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

## विकास निधी शंभर टक्के खर्च

उद्योग व खाणसाठी ०.२९, ऊर्जासाठी २६.५७ कोटी, नाविन्यपूर्ण योजनेसाठी ११.४६ कोटी, परिवहन ७८.५२ कोटी, पाटबंधारे व पूर नियंत्रणसाठी ४९.०५ कोटी, सामाजिक व सामूहिक सेवेसाठी १८७.२९ कोटी, सामाजिक आर्थिक सेवासाठी १६.९४ कोटी आणि सामान्य सेवेसाठी ३३.४५ कोटी असा एकूण ४८१ कोटीचा विकास आराखाडा तयार करण्यात आला होता.

जिल्हा विकास निधी अंतर्गत सर्व विभागांना दिलेला निधी मार्चअखेरपर्यंत खर्च झालाच पाहिजे, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्व विभागांना दिल्या होत्या. या निर्देशांचे बहुतांश विभागांनी पालन केले. त्यामुळे ३१ मार्चपूर्वीच सर्वच निधी खर्च करण्यात आला.

या कालावधीत महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या. त्यामुळे आचारसंहितेच्या कात्रीत विकास निधी सापडू नये म्हणून प्रशासनाने खबरदारी घेतली होती. अन्यथा विकास निधी समर्पित होण्याची धास्ती होती. मात्र, प्रशासनाने प्रयत्न करून सर्व कामे मार्गी लावली. जिल्हाधिकारी जावळे यांनी वेळोवेळी निधी विनियोगाच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यामुळे जिल्हा विकास आराखड्यातील शंभर टक्के निधी खर्च करण्यात यश आल्याचे सांगण्यात आले. पाच वर्षांमध्ये शंभर टक्के निधी खर्च करण्यामध्ये योगदान राहिले आहे. त्यामध्ये २०२१-२०२२ मध्ये २७५ कोटी, २०२२-२०२३ मध्ये ३२० कोटी, २०२३-२०२४ मध्ये ३६० कोटी, २०२४-२०२५ मध्ये ४३२ कोटी, २०२५-२०२६ मध्ये ४८१ कोटी रुपये असा निधी शंभर टक्के खर्च झाल्याचे सांगण्यात आले आहे.

## पालीत दूषित पाण्याचा पुरवठा

परिसरातील नळांना मागील महिनाभरापासून गढूळ पाणी येत आहे. नळाला पाणी आल्यावर सुरुवातीला मातीयुक्त पाणी येते आणि त्यानंतर थोडे स्वच्छ पाणी मिळते. अशुद्ध व मातीयुक्त पाण्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त झाले असून, यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

अंबा नदीत मोठ्या प्रमाणात सांडपाणी, कंपन्यांमधील प्रदूषित पाणी, घाण व कचरा मिसळल्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे. यामुळे नागरिक व जीवसृष्टीच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**नळाला अतिशय दूषित, दुर्गंधीयुक्त व मातीयुक्त पाणी येत आहे. पूर्ण शहरातच दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांना शुद्ध पाणी पोहोचवण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत.**

**– अरिफा पठाण, गृहिणी, पाली**

## मोरबे जलवाहिनीतून पाणीचोरी

जलवाहिन्या तोडण्यासाठी बंदोबस्ताचे मागणी केली होती.

याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस पथक आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागाचे कर्मचारी या ठिकाणी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी कारवाईसाठी गेले असता तेथील स्थानिक नागरिकांनी सदर अनधिकृत नळ जोडणी खंडित करण्यास विरोध केल्याने या दिवशी कारवाई करता आली नाही. या अनधिकृत नळ जोडण्यासाठी नवे मुंबई महानगरपालिकेच्यावतीने एप्रिल २०२४ ते एप्रिल २०२५ या कालावधीकरिता ८० लाख १२ हजार ५६० रुपये दंडाची रक्कम आकारली होती; परंतु अद्याप ती दंडाची रक्कम भरण्यात आलेली नाही.

## मयत महिलेवरही गुन्हा दाखल

या क्रमांकाची रुग्णवाहिका घेऊन पोयनाड करून अलिबागकडे जात होते. बुधवारी (दि. २५) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास पेझारी चेकपोस्ट पुढील पेट्रोल पंपासमोर आल्यावर एका पादचारी महिलेला जोरदार धडक लागली. या धडकेत तिच्या चेहऱ्याला, हाताला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे तिचा अपघाती मृत्यू झाला. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या गुन्ह्यात रुग्णवाहिका चालकासह मयत महिलेला आरोपी करण्यात आले आहे.

चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांकडे दुर्लक्ष केले. चालताना कोणतीही खबरदारी घेतली नसल्याने हा अपघात झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र म्हात्रे अधिक तपास करीत आहेत.

## जैवविविधता, ऐतिहासिक वारशाला धोका

बांधकाम सुरू असल्याचे दिसते. विशेष म्हणजे, पाचाड परिसरात टोलेजंग इमारती उभ्या राहत असताना स्थानिक महसूल प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. काही प्रभावशाली व नव्याने निवडून आलेल्या नेत्यांकडून कोणतीही परवानगी न घेता बांधकामांचा सपाटा लावण्यात आल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

यासंदर्भात स्थानिकांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी संबंधित अधिकारी कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि शिवभक्तांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## जसखारजवळ उड्डाणपूल खचला

आयात-निर्यात प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी उभारण्यात आलेला हा महत्त्वाचा उड्डाणपूल आता जीवघेणा ठरत आहे. दररोज जड वाहनांची वर्दळ असताना पुलाचा काही भाग खचणे ही केवळ तांत्रिक चूक नसून, सरळ-सरळ निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचाराचा परिणाम असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही पुलावर मलमपट्टी केल्याचे स्पष्ट दिसत आहे. म्हणजे, दोष माहिती असूनही तो झाकण्याचा प्रयत्न झाला का? असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे. या सर्व प्रकारावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जेएनपीए प्रशासनाने घेतलेली संशयास्पद शांतता ही त्यांच्या भूमिकेलाच प्रश्न विचारणारी ठरत आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, शासकीय यंत्रणेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही. ही बाब प्रशासनाच्या बेफिकीरीची पराकाष्ठा दर्शवते. करळ परिसरात राष्ट्रीय महामार्ग ४बी आणि राज्य मार्ग ५४ यांना जोडणाऱ्या या प्रकल्पामुळे पुन्हा एकदा कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जसखार गावाला वळसा घालत चौथ्या बंदराला जोडणारा हा मार्ग सुरू होऊन अवघ्या काही काळातच खचला आहे.

सध्या सुरक्षेच्या कारणास्तव या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली असून, तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र, ''आधी निकृष्ट काम करा आणि नंतर दुरुस्तीच्या नावाखाली पुन्हा निधी उकळा'' हा नेहमीचा खेळ इथेही सुरू असल्याची टीका नागरिक करत आहेत.या पुलाच्या बांधकामावेळीच वाद निर्माण झाले होते. काम सुरू असताना जसखार गावातील श्रद्धास्थान असलेल्या रत्नेश्वरी देवी मंदिराला तडे गेल्याचा आरोप स्थानिकांनी केला होता. त्या वेळीही प्रशासनाने दुर्लक्ष केले आणि आता त्याच निष्काळजीपणाचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

दरम्यान, काही दिवसांवरच रत्नेश्वरी देवीचा जत्रोत्सव येऊन ठेपला असून, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होणार आहे. पुलालगतच्या उद्यानामुळेही नागरिकांची वर्दळ वाढते. अशा परिस्थितीत एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? की पुन्हा चौकशी समिती नेमून वेळ मारून नेली जाणार?

मनसेचे स्थानिक पदाधिकारी मंगेश वाजेकर यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, हा सर्व प्रकार मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असून, दोषींवर कठोर कारवाईसाठी त्यांची भेट घेण्यात येणार आहे. फक्त ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून हा प्रकार दडपता येणार नाही. संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी संतप्त मागणी जनतेकडून आता जोर धरत आहे. आज पूल खचतो उद्या व्यवस्था कोसळली तर जबाबदार कोण? हा प्रश्न आता उरणकरांना पडला आहे.

## पेट्रोल-डिझेल खुल्या विक्रीवर बंदी

पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# नवी मुंबईतील ऑर्केस्ट्रा बार बंद

## हॉटेल चालक-मालक हैराण



। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबईतील सर्व्हिस बार आणि ऑर्केस्ट्रा बारचा मुद्दा आता सर्वत्र गरमागरमीचा झाला आहे. सर्व परवानगी घेऊन चालू असणारी हॉटेल अचानक बंद पडल्यामुळे याचा परिणाम नवी मुंबईतील हॉटेल उद्योगासह, ओला वाहक, रिक्षा चालक तसेच रात्री उशिरा चालणाऱ्या पान टपऱ्यांसह बुरजीपाव, चहावाले यांच्यापर्यंत जाणवत आहे.

नवी मुंबईतील २३ फेब्रुवारी पासून ऑर्केस्ट्रा बार पूर्णपणे बंद ठेवण्यात आले. हे कोणत्या नियमाला धरून ना कोणती लिखित ऑर्डर ना महाराष्ट्र सरकारचा फतवा. शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी अधिवेशनात पनवेल येथील रस्त्याकडील बारचा लखलखीत बार गोंगाट, वाहतूक अडथळा अशी मांडणी केली. अधिवेशनात बारचा उल्लेख करताच नवी मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली. कोणती ही लेखी ऑर्डर न काढताच नवी मुंबईतील बार बंद करण्याचा अलिखित फतवा निघाला.

नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार यांना परवानगी देत असताना महिला नोकर नामा हे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय शासकीय चलन भरून घेऊन परवाना देत असते. राज्य उत्पादन शुल्क आणि विभागीय स्तरावरील सर्व परवानगी घेऊन ही व्यवसाय चालू होते. मग ते बेकायदेशीर कसे? हा प्रश्न हॉटेल मालक उपस्थित करत आहेत. सर्व प्रकारची परवानगी घेऊन चालू असणारे बार तसेच ऑर्केस्ट्रा बार हे नेहमी अधिवेशन काळात बंद का होतात? हॉटेल बंद आहेत. मग परवाना नूतनीकरण करायचा कसा? हा प्रश्न हॉटेल चालकांना पडला आहे.

> रायगड मधील असणारे सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार यांना दारू विक्री परवानगी नोकर नामासह दिली असून बार बंद करा अथवा नोकर मनामधील कामगाराना काढून टाका असे कोणते ही आदेश राज्य उत्पादन कार्यालयाकडून दिले गेले नाहीत. दारू विक्री चालू ठेवण्यास आमची हरकत नाही.
> – रविकिरण कोल्हे, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगड

नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार बंद असतानाच महाराष्ट्रात सोलापूर, मुंबई मध्य, मुंबई पूर्व, मुंबई उत्तर तसेच मुंबई उपनगरे, ठाणे जिल्हा असेल. त्यामधील मीरा रोड, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, रायगड जिल्ह्यातील खोपोली रोडवरील असणारे ऑर्केस्ट्रा बार असतील त्यांना सूट का? हा ही प्रश्न निर्माण होतो.राज्यकर्त्यांना फक्त नवी मुंबईतील सर्व्हिस बार तसेच ऑर्केस्ट्रा बार वरच अधिवेशनात मुद्दा उचलायचा असतो का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नवी मुंबईतील किमान ४००० हून अधिक लोक कलाकार नवी मुंबई पोलीस दलाच्या एका निर्णयामुळे बेरोजगार झाले असल्याने दुहेरी धोरणाचा आरोप होत आहे. कोणत्या ही शासकीय यंत्रणेकडून लेखी खुलासा नाही मग बंद का? फक्त नवी मुंबईतून जाताना नेतेमंडळींना ऑर्केस्ट्रा बार दिसतात का? हा सवाल चालक मालक उपस्थित करत आहेत. महाराष्ट्र शासनाने नियमानुसार परवानगी दिलेली असतानाही नवी मुंबईतील सर्व बार अनेक दिवसांपासून बंद आहेत. यामुळे बारमधील कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांच्या कुटुंबांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहिले आहे. नवी मुंबईतील सर्व ऑर्केस्ट्रा बार प्रत्येक हॉटेल मागे परवानगीच मुळात लाखो रुपये भरून करमणूक कर म्हणून दिला आहे.

सर्व परवानगी या सर्व्हिस बार आणि ऑर्केस्ट्रा बार चालवणाऱ्या मालकांकडे आहेत. मग कारवाई का? नवी मुंबई पोलिसांकडून आलेल्या या अलिखित फतव्याचा आणि हजारो लोकांच्या पोटावर टाच येईल असा आदेश काढला कोणी हे ही कळायला मार्ग नाही. दुसरीकडे, बार मालक देखील प्रचंड अडचणीत सापडले असून 'कामगारांना पगार द्यायचा कुठून?' राज्य उत्पादन शुल्काची अवाढव्य रक्कम भरायची कशी, का कर्जाचा डोंगर उभा करून हा ही प्रश्न अनुत्तरित राहतो. कायदेशीर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चालणारे बार अचानक बंद का? असा सवाल त्यांना पडला आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे हॉटेल चालक-मालक अडचणीत आले आहेत.

# पनवेल वाहतूक शाखेची धडक कारवाई

## नाकाबंदीमुळे अवैध रिक्षाचालकांवर बसला अंकुश



। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहर वाहतूक शाखा आणि आरटीओ मार्फत गुरुवारी (दि. २) रात्री १० ते १२ या वेळेत नाकाबंदी व विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील, आरटीओचे पोलीस इन्स्पेक्टर भड आणि काळे यांच्या उपस्थितीत पार पडली.

या मोहिमेत पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व व पश्चिम परिसरातील रिक्षाचालकांची सखोल पडताळणी करण्यात आली. अवैध प्रवासी वाहतूक करणारे, फिटनेस व विमा कालबाह्य असलेले, विना परवाना (लायसन्स), विना युनिफॉर्म रिक्षाचालक / मालक व तीव्र प्रकाशाची लाईट असे विविध मोटर वेहिकल ॲक्ट कलम अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. नाकाबंदीदरम्यान कारवाईच्या भीतीने रिक्षांची संख्या कमी झाल्याने प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील यांनी तत्काळ एनएमएमटी विभागाशी संपर्क साधून अतिरिक्त बसची व्यवस्था केली. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित व वेळेवर त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचविण्यात आले. रात्रीच्या वेळी केलेल्या या तातडीच्या मदतीमुळे प्रवाशांनी वाहतूक शाखेचे कौतुक केले.

या मोहिमेत एकूण १२० रिक्षांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ३८ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. तसेच १ रिक्षा जप्त करण्यात आली असून, १ प्रकरणात मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यावर (ड्रंक अँड ड्राईव्ह) कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या उपस्थितीत पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार युवराज येळे, अमीर मुलानी, केशव निकम, संजय ओंबासे तसेच पोलीस शिपाई निलेश ठाकूर, महेश बोरेकर व नवीन पनवेल (पोलीस मित्र) यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

पनवेल वाहतूक शाखेमार्फत पुढील काळातही अशा प्रकारच्या धडक मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी सांगितले आहे.

# कांदा-बटाटा मार्केटमध्ये घाणीमुळे व्यापाऱ्यांचे आरोग्य धोक्यात

। पनवेल। प्रतिनिधी ।

नवी मुंबई एपीएमसी मार्केट वाशी येथील कांदा-बटाटा मार्केट आवारात गेल्या दोन दिवसांपासून साफसफाई न झाल्यामुळे गंभीर अस्वच्छतेची समस्या निर्माण झाली आहे. बाजारातील व पोकळी तसेच व आणि व विभागांमध्ये कचऱ्याचा प्रचंड साठा झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.कचरा कुंड्या पूर्णपणे भरून वाहत असून, सडलेले कांदे-बटाटे थेट रस्त्यावर पसरलेले आहेत. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, व्यापारी, कामगार तसेच येणाऱ्या ग्राहकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या अस्वच्छतेमुळे बाजारातील घटकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेषतः उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सडलेल्या भाजीपाला व कचऱ्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त आहे. अनेक व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या असून, तातडीने साफसफाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, बाजार समितीच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप व्यापाऱ्यांकडून केला जात आहे. नियमित स्वच्छता राखली जात नसल्याने अशा समस्या वारंवार निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर बाजार समितीने तात्काळ यंत्रणा हलवून संपूर्ण परिसराची स्वच्छता करावी, कचरा उचलण्याची प्रक्रिया नियमित करावी आणि आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी व्यापारी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नाल्याच्या कामासंदर्भात निवेदन



। कर्जत । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतमधील नाले हे मध्य रेल्वेच्या हद्दीतून जातात. तर राजबाग सोसायटीच्या मागच्या भागातील नाला हा थेट नेरळ पूर्व भागातून येतो. मात्र त्याच्या म ार्गात बदल केल्यामुळे नेरळ पूर्व भागातून जाणारे पाणी हे तिथेच साचत असल्याने, पावसाळ्यात निर्माण नगरी, मातोश्रीनगर आदी भागात पाणी साचून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते.

गंगानगर भागात गुडघाभर पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागते. यामुळे जनजीवन विस्कळीत होत असल्याने, याबाबत नेरळ जिल्हा परिषद गटाच्या सदस्या सुनीता मोरे व पंचायत समिती गणाचे सदस्य भगवान चंचे यांनी नेरळ ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर यांना सोबत घेत. थेट नेरळ रेल्वे स्थानकाचे स्टेशन मॅनेजर यांची भेट घेत. स्टेशन मॅनेजर यांना देखील नेरळ परिसरातील हि समस्या पटवून सांगत तसे निवेदन ही देण्यात आले आहे.

सदर गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेत स्टेशन मॅनेजर गुरुनाथ पाटील यांनी रेल्वेच्या अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख यांना फोन करत परिस्थिती समजावून सांगत. त्यावर मध्य रेल्वे अभियांत्रिकी विभागाचे अभियंता व नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर, जि.प. सदस्या सुनीता मोरे, पं.स. सदस्य भगवान चंचे व पंचायत समिती अभियंता यांच्या मा०ध्यमातून संयुक्त पाहणी दौरा घेण्याचे नक्की झाले आहे. या पाहणी दौऱ्यातून नक्की कुठे व कशा पद्धतीने काम करून या समस्येवर उपाय शोधात येईल हे निश्चित केले जाणार आहे. मुळात चंचे व मोरे यांच्या एका निवेदनावर मध्य रेल्वेने साकारत्मकता दाखवली हे विशेष त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या समस्येचा निकाल हा रेल्वेकडून लागणार का हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# गजानन पिसाट यांना देवाज्ञा

**खांब :** रोहा तालुक्यातील शेणवई गावचे गजानन विश्वनाथ पिसाट यांना वृद्धापकाळाने शेणवई येथील राहत्या निवासस्थानी देवाज्ञा झाली. निधना समयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवारी ( दि.६) तर उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि.९) शेणवई येथील निवासस्थानी करण्यात येणार आहेत.



# ग्रुप ग्रामपंचायत चांभार्लीची राष्ट्रीय पंचायत पुरस्कारासाठी निवड




। रसायनी । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय पंचायत पुरस्कारामध्ये, शाश्वत विकासाच्या नऊ संकल्पनांपैकी सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव या संकल्पनेअंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत चांभार्लीने देशात द्वितीय क्रमांक मिळवून नवा इतिहास रचला आहे.

या संकल्पनेत महाराष्ट्राला प्रथमच हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण राज्यभर ग्राम पंचायत चांभार्लीचे कौतुक होत आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली, रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यक्षम मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड, सहायक गटविकास अधिकारी कांबळे तसेच विस्ताराधिकारी विनोद चांदोरकर, शैलेश तांडेल यांच्या विशेष प्रयत्नांमुळे ग्रामपंचायतीला हे यश मिळाले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत चांभार्लीचे सरपंच प्रतिप पाटील, उपसरपंच स्वप्नील जांभळे, ग्रामपंचायत अधिकारी सीमा राठोड तसेच सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध विभागांचे अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याने सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव या संकल्पनेतील सर्व उपक्रम उत्कृष्टपणे राबविण्यात आले. शासनाच्या तपासणीसाठी आलेल्या पथकानेही गावाच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या पुरस्कारासाठी शासनाच्या वतीने राज्य समन्वयक अमीर शेख व श्रीधर कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# हापूसची आवक वाढताच भाव गडगडला

। पनवेल । प्रतिनिधी ।

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ बाजारात कोकणातून येणाऱ्या हापूस आंब्याची आवक वाढण्यास सुरुवात झाली असून, त्याचा थेट परिणाम भावांवर दिसून येत आहे. आवक वाढल्याने हापूसच्या किमतीत सुमारे २० टक्क्यांनी घसरण झाली असून, आता हे आंबे सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्यात येऊ लागले आहेत.

मागील आठवड्यापर्यंत हापूस आंब्याचे भाव तीन ते पाच डझनसाठी अडीच हजार ते सात हजारांदरम्यान होते; मात्र सध्या हेच भाव घसरून दोन हजार ते सहा हजारांपर्यंत आले आहेत. त्यामुळे किरकोळ ग्राहकांसह व्यापाऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे. येत्या काही दिवसांत आवक आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत असून, भाव आणखी कमी होण्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे.

मागील आठवड्यापासून बाजारात हळूहळू आवक वाढू लागली आणि भावात सुमारे १० टक्क्यांची घट झाली. त्यानंतर सोमवार (दि ३०)पासून आवक आणखी वेगाने वाढू लागली आहे. सोमवारीच बाजारात कोकणातून तब्बल ३४,६९० पेट्या हापूस आंब्यांची नोंद झाली आहे..तापमान वाढल्याचा परिणामसध्या कोकणात तापमान वाढत असल्याने आंबा जलद गतीने पिकत आहे.

## आठवडा बाजार हाउसफुल्ल | किमती वाढण्याचा भीतीने गर्दीत वाढ

# रायगडात आगोटीची लगबग

। रायगड । प्रतिनिधी ।

मॉन्सून सुरू होण्यास अद्याप दोन महिने शिल्लक असले तरी भाववाढीच्या शक्यतेमुळे गृहिणींनी पावसाळी बेगमीसाठी खरेदीची लगबग सुरू केली आहे. परिणामी जिल्ह्यातील विविध आठवडा बाजारात नागरिकांची मोठी गर्दी होत असून, बाजारपेठा गजबजून गेल्या आहेत.

पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे आठवडा बाजार नियमित भरवणे कठीण होते. त्यामुळे या काळासाठी आवश्यक असलेले कडधान्य, मसाले, सुकामेवा तसेच रामराज, पोयनाड, नागाव , सहाण व वायशेत येथील आठवडा बाजार सर्वांत मोठे मानले जातात. कांदा, लसूण, बटाटे, खोबरे, विविध कडधान्ये आणि सुक्या मच्छीच्या खरेदीसाठी येथे नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

मुंबईच्या वाशी बाजारपेठेप्रम ाणेच येथेही घाऊक व स्वस्त भावात वस्तू किरकोळ प्रमाणात उपलब्ध होत असल्याने ग्राहकांचा ओढा वाढला आहे.पावसाळा सुरू झाल्यानंतर हे आठवडा बाजार बंद होतात आणि कार्तिकी एकादशी (बोंबल्या विठोबा) नंतरच पुन्हा सुरू होतात.

### किमती वाढण्याची भीती

इंधनाचे भाव वाढण्याच्या भीतीने जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढण्याची शक्यता आहे. सुक्या खोबऱ्याचे भावही प्रतिकिलो ३०० रु.पर्यंत वाढलेले आहेत. याचबरोबर सर्वप्रकारची कडधान्ये व इतर जीवनावश्यक वस्तू घाऊक किमतीने मिळत असल्याने या बाजारात ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात.



### सुक्या मासळीची हमखास खरेदी

पावसाळ्यात समुद्र आणि खाडीत मासेमारीवर निर्बंध येत असल्याने कोळीबांधवांना मासळी पकडण्यासाठी जाता येत नाही. परिणामी ताज्या मच्छीचा पुरवठा कमी होतो आणि खवय्यांना सुक्या मच्छीवरच समाधान मानावे लागते. यामुळे पावसाळ्यापूर्वी सुक्या मच्छीची मोठ्या प्रमाणात साठवण करण्याची परंपरा कायम आहे. अलिबाग तालुक्यातील वडखळ येथील आठवडा बाजार हा सुक्या मच्छी खरेदीसाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. येथे स्थानिकांसह बाहेरील शेकडो व्यापारी विविध प्रकारची सुकी मच्छी विक्रीसाठी आणतात. या बाजारात अलीकडेच सुक्या मच्छीची मोठ्या प्रमाणात उलाढाल झाल्याचे दिसून आले.

> मे महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यात जास्तीत जास्त पावसाळी बेगमी साठवण्याचा प्रयत्न असतो, परंतु मागील वर्षी मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पाऊस पडला होता. मागील वर्षाच्या अनुभवावरून आम्ही लवकरात लवकर बेगमीसाठी धावपळ करीत आहोत. त्याचबरोबर किंमत वाढण्याची जास्त शक्यता आहे.
> –हिना बामणे, गृहिणी.

त्यामुळे पुढील पाच ते सहा महिन्यांची बेगमी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक या बाजारांकडे धाव घेत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# निवडक

## सहयोग पतसंस्थेत तानाजी गव्हाणे यांचा सत्कार

**अलिबाग:** महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह डिपार्टमेंट ऑडिटर्स असोसिएशन, नागपूरच्या अध्यक्षपदी तानाजी लक्ष्मण गव्हाणे यांची निवड झाल्याबद्दल सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेत त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. सदर सत्कार सोहळा पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अलिबाग येथील सेवानिवृत्त ऑडिटर संदीप गोठविरेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन गव्हाणे यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी ठाणे येथील लेखापरीक्षक अशोक मगर, एस. जे. मुळक, संजय राणे, दत्ता पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, संचालक निळकंठ केमकर, व्यवस्थापक वैभव बोर्लीकर तसेच संस्थेचा कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमात संदीप गोठविरेकर यांनी संघटनेचे महत्त्व अधोरेखित करताना गव्हाणे यांच्या संघटनात्मक कार्याचा आढावा मांडला. सत्काराला उत्तर देताना तानाजी गव्हाणे यांनी आपल्या निवडीचे श्रेय अशोक मगर यांना देत मगर कुटुंबीयांशी असलेल्या स्नेहबंधांचा उल्लेख केला. तसेच, मिळालेल्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटमध्ये आलेली मरगळ दूर करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी नियोजन सहयोग पतसंस्थेच्यावतीने करण्यात आले.



## पुनर्वसित गावांतील शाळा उभारणीचा प्रश्न


**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावांमध्ये शाळा उभारणीचा प्रश्न गंभीर बनला आहे. १० वर्षे उलटली तरीही शाळांचे काम पूर्ण न झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर २७ गाव प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा, वरचे ओवळे, उलवे, कोंबडभुजे, तरघर, गणेशपुरी आदी गावांतील पुनर्वसन क्षेत्रात नवीन शाळांची उभारणी अद्यापही झालेली नाही. त्यामुळे संविधानाने दिलेल्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा येत असल्याचे निवेदनात नमूद आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रत्येक गावात पहिली ते आठवीपर्यंत शिक्षणाची सोय असलेली सुसज्ज शाळा उभारणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेत किमान १८ खोल्या, स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष, ग्रंथालय, संगणक कक्ष, तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. भविष्यात नववी ते बारावीपर्यंत शिक्षणाची सुविधा सुरू करण्यासाठी नियोजन करावे, अशी मागणी केली. वरचे ओवळे पुनर्वसन क्षेत्रात शाळा नसल्याने विद्यार्थ्यांना दूर जावे लागत असून, त्यासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या वेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, कार्याध्यक्ष रुपेश धुमाळ, रवींद्र पाटील, मनखुश नाईक, अनिल केणी, रोशन घरत, अमित मढवी व इतर सदस्य उपस्थित होते. मंगेश वाकडीकर यांनी याप्रश्नी संबंधित यंत्रणेशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्याचे संस्थेच्यावतीने सांगितले.

## श्रीवर्धन व्यापारी मित्र मंडळाची सभा

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन व्यापारी मित्र मंडळाची वार्षिक सभा उत्साह, एकजूट आणि व्यापारी बंधुत्वाचा अद्भुत संगम घडवत अत्यंत दिमाखात पार पडली. नितीन पतंगे यांच्या रमणीय रिसॉर्टवर आयोजित करण्यात आलेल्या या सभेला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, ज्यामुळे संपूर्ण वातावरणात सकारात्मक ऊर्जा आणि आत्मीयता भरून राहिली होती. सभेचे अध्यक्षस्थान नितीन पतंगे यांनी भूषवले. यावेळी उपाध्यक्ष रवी पटेल, सचिव राजेंद्र जैन, खजिनदार सुनील दर्गे तसेच कार्यकारिणी सदस्य प्रकाश रिकामे, श्रेयस तोडकर, दुधाराम राठोड, राजू तन्ना, मितेश तन्ना, रितेश खोत, आताऊल्ला बुरुड, फाईक महाडि, धर्मेश पटेल यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात उपाध्यक्ष रवीशेठ पटेल यांच्या प्रभावी व प्रेरणादायी प्रास्ताविकाने झाली. त्यांनी मंडळाच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करत सभासदांचे मनापासून स्वागत केले आणि एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर खजिनदार सुनील दर्गे यांनी मागील वर्षाचा सविस्तर अहवाल आणि पारदर्शक आर्थिक विवरण सादर केले. या अहवालाला सभासदांनी एकमताने मंजुरी देत मंडळाच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला. कार्यकारिणी सदस्य प्रकाश रिकामे यांनी आपल्या मनोगतातून मंडळाने राबवलेल्या विविध सामाजिक व व्यापारी उपक्रमांचा आढावा घेतला आणि आगामी काळात अधिक जोमाने काम करण्यासाठी सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले.सभेतील एक विशेष आकर्षण म्हणजे जेष्ठ सभासदांचा सन्मान सोहळा. हार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आलेल्या या सन्मानामुळे सभागृहात कृतज्ञता, आदर आणि भावनिक वातावरण निर्माण झाले. यामुळे मंडळातील परंपरा आणि मूल्यांची जपणूक अधोरेखित झाली. या प्रसंगी जितेंद्र सातनाक, चंद्रकांत उंदीरकर, दिलीप शेठ तोडकर, राजेंद्र भोसले, राजू धारिया आणि दिगंबर महाडिक यांनी आपले विचार मांडत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी भविष्यातील उपक्रमांसाठी शुभेच्छा देत नव्या कल्पनांना पाठिंबा दर्शवला.

## लिलावती पारंगे यांचे निधन

**रायगड :**अलिबाग तालुक्यातील महाजने येथील लिलावती दामोदर पारंगे यांचे शुक्रवारी (दि.२७) मार्च रोजी दुपारी वृध्दापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्या ७९ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, सुन, जावई व नातवंडे असा परिवार आहे. लिलावती पारंगे या स्वभावाने प्रेमळ होत्या. गावांमधील धार्मिक, सामाजिक कार्यात त्यांचे योगदान होते. शुक्रवारी (दि. २७) दुपारी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास त्यांचे राहत्या घरी निधन झाले.महाजने येथील स्मशानभूमीमध्ये सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा अशा सर्वच क्षेत्रातील मंडळी, नातेवाईक, ग्रामस्थ, महिला मंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. लिलावती पारंगे यांचे पिंडदान अर्थात उत्तरकार्य मंगळवारी(दि.७) एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता, त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती पारंगे कुटूंबियांकडून देण्यात आली.



# आंबा शेतकऱ्यांचे पाप

आंबा शेतकऱ्यांचे पाप असे आहे की ते कोकणात राहतात. नुकसान झाले तरी फार ओरडा करीत नाहीत. गुपचूप सहन करतात. सतत मोर्चे काढणे, आंदोलने करणे, राजकीय नेत्यांमार्फत भाषणबाजी करणे असे करत नाहीत. आणि सध्याचा काळ असा आहे की बोलणाऱ्यांचे चिंचोके सोन्याच्या भावाने विकले जातात. पण न बोलणाऱ्याकडे कोणी लक्ष देत नाही. कोकणात यंदा आंबा आणि काजू पिकांचे खूप नुकसान झाले आहे. बहुतेक ठिकाणी ९० टक्के आंबा गेला आहे. जेमतेम दहा टक्के पीक हाताशी लागेल अशी शक्यता आहे. तरीही कोकणात हा प्रश्न पेटलेला वगैरे नाही. कांदा, ऊस यांचे प्रश्न लगेच पेटतात. रस्त्यावर येतात. टोमॅटोवाले शेतकरी रस्ते अडवतात. टोमॅटो रस्त्यावर फेकतात. पण कोकणातले शेतकरी गळलेल्या कैऱ्या रस्त्यावर वगैरे टाकून आंदोलने करीत नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे कोणाचे लक्ष जात नाही. मध्यंतरी राजू शेट्टी यांनी सिंधुदुर्गात आंबा शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. गेल्या कित्येक वर्षात निघालेला हा पहिला मोर्चा होता. तोही कोल्हापूरच्या शेट्टी यांना येऊन काढावा लागला. यात सहभागी लोकांची संख्या मोठी होती. एकूण लोकांचा संताप लक्षात घेऊन नितेश राणे वगैरे लोक साळसूदपणे त्या मोर्चाला हजर राहिले. एरवी, राणे यांनी अशा विरोधकांना शिव्या दिल्या असत्या. त्यांना कदाचित हिंदूविरोधी देखील ठरवले असते. पण आपलेच सगळे मतदार संतापलेले आहेत हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून ते मोर्चाला गेले. पण नितेश यांचे खरे काम सरकारात आहे. तिथे त्यांनी आंबा शेतकऱ्यांचा प्रश्न लावून धरायला हवा. प्रत्यक्षात ते जेवढ्या जोरात मुसलमानांना शिव्या देतात, त्यांच्यावर बहिष्काराची भाषा करतात तितक्या जोरात कधी आंब्याच्या शेतकऱ्यांबद्दल बोलताना दिसलेले नाहीत. बाकीचे कोकणातले मंत्री म्हणजे उदय सामंत, योगेश कदम आणि भरत गोगावले. पण तेही गप्प आहेत. रायगडमध्ये आणखी एक मंत्रीणबाई आहेत आहेत आणि एका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व खासदार आहेत. पण ते तर वेगळ्याच घडामोडींमध्ये आणि भानगडींमध्ये अडकलेले आहेत.

## तोंडाला पाने

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. राजू शेट्टी यांनी एका हेक्टरला म्हणजे अडीच एकरला पाच लाख रुपये इतकी मदत देण्याची मागणी केली होती. राज्यात सगळे मिळून साधारण सव्वा लाख हेक्टरवर आंब्याचे पीक आहे. म्हणजे पाच लाखांपर्यंत भरपाई द्यायची झाल्यास सरकारला सहा हजार कोटी रुपये खर्च आला असता. देशातल्या श्रीमंत म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याला सहा हजार कोटी काही भारी नाहीत. त्यापेक्षा किमान चौपट पैसे तर अपात्र असलेल्या लाडक्या बहिणींच्या खिशात फडणवीस, शिंदे आणि मंडळींनी गेल्या दोन वर्षात टाकले आहेत. कालच जी आकडेवारी आली त्यानुसार ६८ लाख बहिणींनी केवायसी केलेले नाही किंवा त्या केवायसीमध्ये अपात्र ठरल्या. त्यांच्यामुळे आता बारा हजार कोटी रुपये वाचणार आहेत. म्हणजेच गेल्या दोन वर्षात सुमारे २४ हजार कोटी रुपये त्या पात्र नसताना खर्च झाले आहेत. या बहिणींमध्ये शिंदे, फडणवीसांच्या पक्षाच्या कार्यकर्त्या किती याचा शोध घेतला पाहिजे. मुद्दा असा की, एकीकडे मते मिळवण्यासाठी बेफाट उधळपट्टी करणारे सरकार राज्याला निर्यातीतून महसूल मिळवून देणाऱ्या आंब्यासारख्या पिकाच्या नुकसानीची भरपाई द्यायला मात्र तयार नाही. राज्य विधिमंडळ अधिवेशनाच्या अगदी शेवटाला सरकारने अखेर भरपाई जाहीर केली. हेक्टरला २२ हजार रुपये. म्हणजे एका एकरला साधारण नऊ हजार रुपये. आज आंब्याच्या एका फवारणीला कदाचित इतके पैसे पुरत नसतील. म्हणजेच फडणवीस सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला चक्क पाने पुसली. ज्या शेतकऱ्यांनी विमा घेतला आहे त्यांना थोडीफार जास्त मदत मिळेल. पण तीही साधारण एकरी १५ हजारपेक्षा अधिक नाही. आज एकट्या रायगड जिल्ह्यात सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्रावर आंबा पीक आहे. बहुतेक शेतकऱ्यांना केवळ पाच-दहा टक्के आंबाच हाताशी लागेल अशी अवस्था आहे. याबाबतची सरकारी सर्वेक्षणे झाली आहेत. त्यांचे अहवाल पाठवल्याचे अधिकारी सांगतात. पण नुकसान दहा टक्के असो की ९० टक्के मदत किती द्यायची आहे हे सरकारने आधीच ठरवून टाकलेले असावे अशीच सध्याची स्थिती आहे.

## शिंदेगट, भाजपचा उपयोग काय?

कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत चर्चा झाली असे म्हणतात. त्यावर ही मदत वाढवून द्या असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे मंत्री हळूच पत्रकारांना सांगतात. पण ते जर खरे असेल तर खुद्द मुख्यमंत्रीच बाहेर येऊन तसे का सांगत नाहीत असा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे शिंदेसेनेचे याबाबतचे मौन. कोकणात विधानसभेला मतदार ठाकरे यांच्या सेनेकडून शिंद्यांच्या सेनेकडे गेला. पण एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत आंब्याच्या प्रश्नाबाबत ठाम भूमिका घेतली किंवा आग्रही मागणी केली असे दिसत नाही. शिंदे यांचे सगळे लक्ष ठाण्याकडे आणि त्यातून उरले तर सातारा किंवा नवीन महाबळेश्वर होते आहे तिकडेच जास्त असते. शिवाय साताऱ्यात जिल्हा परिषदेत इतका मार पडूनही शिंदे सेनेला भाजपसमोर काहीच करता आलेले नाही. साधे, ज्यांच्या पोलिसांनी शंभूराज देसाईंना मारले त्यांच्या जिल्हा प्रमुखांवर म्हणजे जिल्हा पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर कारवाई करा ही मागणीही शिंद्यांना मंजूर करून घेता येऊ शकलेली नाही. त्यामुळे हे असले वीर कोकणातल्या आंब्याच्या शेतकऱ्यांच्या बाजूने काय उभे राहणार हे दिसते आहेच. भाजपवाल्यांना कोकणात हातपाय पसरायचे आहेत. रवींद्र चव्हाण सारख्या फेऱ्या मारत असतात. सिंधुदुर्गात पंचायत व पालिकांसाठी तर त्यांनी शिंदे सेनेच्या विरोधात निवडणुका लढवल्या होत्या. पण आंब्याच्या प्रश्नावर काही भूमिका घ्यावी असे त्यांना वाटत नाही. आंब्याच्या शेतकऱ्याला वर्षाला खते, फवारण्या असा दोन-चार लाख रुपये खर्च येतो. एक हंगाम गेला तर तो सर्व खर्च अंगावर पडतो. गेल्या वर्षी पाऊस खूप झाला व बराच काळ लांबला. त्यानंतर बहुतेक ठिकाणी कलमांना प्रचंड मोहोर आला. पण थोड्याच काळात तो गळून पडला. नंतर लांबलेली थंडी आणि अलिकडचा तीव्र उन्हाळा यामुळे मोहोर व नंतर कैऱ्यांची गळ मोठ्या प्रमाणात झाली. याशिवाय, रोगांचा प्रादुर्भाव ही कायम ची डोकेदुखी होऊन बसली आहे. त्यामुळे कितीही नाही म्हटले तरी रासायनिक फवारण्या अपरिहार्य बनल्या आहेत. दिवसेंदिवस त्यांचा खर्च वाढत चालला आहे. ही एक नैसर्गिक आपत्तीच आहे. त्याची जबाबदारी सामुहिक आहे. त्याला वाढते शहरीकरण, प्रदूषण, वाहनांची संख्या इत्यादी अनेक कारणे आहेत. पण हा तोटा सहन करण्याची एकेकट्या शेतकऱ्यांमध्ये शक्ती नसते व तशी अपेक्षाही नाही. सरकारनेच या प्रसंगी त्यांच्या पाठीशी उभे राहणे अपेक्षित आहे. पण हे घडत नाही. अर्थात, यापूर्वी सोयाबीन, कापूस अशा शेतकऱ्यांनाही हाच अनुभव सतत आला आहे. यंदा तो कोकणातील आंबा शेतकऱ्यांच्या वाट्याला येत आहे.

विचार

# रेल्वे स्थानके परिवर्तनाच्या प्रक्रियेत

***एके काळी मंद प्रकाश असलेले प्लॅटफॉर्म्स, गर्दीने गच्च भरलेले कॉन्कोर्स आणि मर्यादित प्रवासी सुविधा अशी ओळख असलेली रेल्वे स्थानके आता उत्साही, जागतिक दर्जाची शहरी प्रवेशद्वारे म्हणून नव्याने उभी राहत आहेत. हा बदल केवळ रंगरंगोटी, नवीन बाक किंवा सौंदर्यवृद्धीपुरता मर्यादित नाही, तर स्थानकांचे डिझाइन, संचालन आणि शहराशी असलेले एकत्रीकरण या सर्व बाबींमध्ये मूलभूत बदल घडवून आणणारा आहे.***

प्रा. सुखदेव बखळे

भारतातील रेल्वे स्थानकांचा विकास आता केवळ प्रवासी चढ-उतार करण्याच्या ठिकाणांपुरता मर्यादित राहिलेला नाही. आधुनिक शहरी नियोजनाच्या संकल्पनेनुसार ही स्थानके बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब) म्हणून विकसित होत आहेत. या प्रक्रियेमुळे रेल्वे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक होत असून रेल्वेची प्रतिमाही बदलत आहे. 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' म्हणजे एका ठिकाणी विविध वाहतूक साधनांची प्रभावी जोडणी. रेल्वे स्थानकाला केंद्रबिंदू मानून बस, मेट्रो, टॅक्सी, रिक्षा, सायकल आणि पादचारी मार्ग यांचे एकत्रित नियोजन केले जाते. भारतात या संकल्पनेला चालना देण्यासाठी 'अमृत भारत स्टेशन योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत देशभरातील १३०० हून अधिक स्थानकांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत स्थानके केवळ वाहतूक केंद्र न राहता शहरातील महत्त्वाचे सार्वजनिक आणि व्यावसायिक केंद्र बनवण्यावर भर दिला जात आहे. पूर्वी रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यावर पुढील वाहतुकीसाठी प्रवाशांना बराच वेळ लागायचा. आता बस, मेट्रो किंवा टॅक्सीची सुविधा स्थानकाच्या परिसरातच उपलब्ध होत असल्यामुळे प्रवास सुलभ झाला आहे. आधुनिक स्थानकांवर वातानुकूलित प्रतीक्षागृहे, स्वच्छ स्वच्छतागृहे, डिजिटल माहिती प्रणाली, फूड कोर्ट, शॉपिंग क्षेत्र, एस्कलेटर आणि लिफ्ट अशा सुविधा उपलब्ध होत आहेत. सीसीटीव्ही, 'स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टीम', गर्दी व्यवस्थापन तंत्रज्ञान आणि आधुनिक प्रकाशयोजना यामुळे स्थानक परिसर अधिक सुरक्षित झाला आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभता रॅम्प, ब्रेल साईन, लिफ्ट आणि विशेष सुविधा यामुळे दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रवास अधिक सोपा झाला आहे.

आधुनिक स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची प्रतिमा मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पूर्वी रेल्वे स्थानक म्हणजे गर्दी, अस्वच्छता आणि अव्यवस्था असे चित्र डोळ्यासमोर येत असे. आता आधुनिक वास्तुकला, स्वच्छ परिसर, डिजिटल सेवा आणि व्यावसायिक व्यवस्थापनामुळे स्थानके आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देणारी ठिकाणे बनत आहेत. या बदलाचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे भोपाळमधील राणी कमलापती रेल्वे स्थानक. हे स्थानक विमानतळासारख्या सुविधांसाठी प्रसिद्ध झाले असून आधुनिक रेल्वे स्थानकाचा आदर्श नमुना मानले जात आहे. यामुळे भारतीय रेल्वेची जागतिक स्तरावर सकारात्मक प्रतिमा तयार होत आहे. रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचा कार्यक्रम देशभर वेगाने पुढे जात आहे. 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत शेकडो स्थानकांचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी स्थानकांच्या इमारतींचे आधुनिकीकरण, प्लॅटफॉर्म सुधारणा, पार्किंग व्यवस्था, प्रवेशद्वार आणि वाहतूक व्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील परळ, माटुंगा, चिंचपोकळी, लासलगाव आणि धुळे स्थानकांचा विकास करण्यात आला आहे. पुणे, शिवाजीनगर, हडपसर, खडकी ही रेल्वे स्थानके भविष्यात पूर्ण विकसित 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' बनण्याची अपेक्षा आहे. रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळत आहे. स्थानक परिसरात व्यापारी संकुले, हॉटेल, रिटेल दुकाने आणि कार्यालये विकसित होत आहेत. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत आहे.

भविष्यात रेल्वे स्थानके अधिक स्मार्ट, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित असतील. सौर ऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना आणि पर्यावरणपूरक बांधकाम यावर भर दिला जाणार आहे. स्मार्ट तिकीट प्रणाली, मोबाइल ॲपद्वारे माहिती, 'एआय' आधारित गर्दी व्यवस्थापन आणि डेटा आधारित देखभाल प्रणाली यांचा वापर वाढविण्यात येणार आहे. स्थानकांचा विकास शहराच्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांशी जोडून एकात्मिक वाहतूक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशभरात रेल्वे स्थानके आता बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब) आणि व्यावसायिक संकुले म्हणून विकसित केली जात आहेत. त्यात हवामानानुकूल सार्वजनिक जागांचीही संकल्पना आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय रेल्वे तसेच खासगी भागीदारांनी मोठ्या प्रमाणावर स्थानक पुनर्विकास कार्यक्रमांना वेग दिला असून, प्रवाशांना उत्तम सेवेचा अनुभव देण्याबरोबरच रेल्वेच्या जमिनीतील व्यावसायिक क्षमता उलगडणे हा ही उद्देश आहे. रेल्वे स्थानकांच्या या रूपांतरणामागे डिसेंबर २०२२ मध्ये रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेली 'अमृत भारत स्टेशन स्कीम' ही राष्ट्रीय योजना प्रमुख प्रेरक शक्ती ठरत आहे. ६ ऑगस्ट २०२३ रोजी या योजनेंतर्गत देशभरातील ५०८ स्थानकांच्या पुनर्विकासासाठी भूमिपूजन करण्यात आले. या योजनेचा हेतू स्थानकांचे केवळ तात्पुरते सौंदर्यवर्धन न करता 'शहर केंद्र' म्हणून विकसित करणे हा आहे.

डिसेंबर २०२५ पर्यंत ठरवलेल्या १,३३७ स्थानकांपैकी १५५ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून या योजनेचा देशव्यापी विस्तार स्पष्टपणे दिसून येतो. या योजनेंतर्गत प्रवेश व निर्गमन मार्ग, प्रतीक्षागृहे, स्वच्छतागृहे, प्लॅटफॉर्म आणि शेड्स यांचे आधुनिकीकरण केले जात आहे. आवश्यकतेनुसार लिफ्ट, एस्कलेटर, मोफत वाय-फाय, सुधारित दिशादर्शक फलक, फूड कोर्ट, किऑस्क, मुलांसाठी खेळण्याच्या जागा आणि माहिती प्रणाली उपलब्ध करून दिल्या जात आहेत. काही स्थानकांवर कार्यकारी विश्रांतीगृहे (एक्झिक्युटिव्ह लाउंज) आणि व्यावसायिक बैठकींसाठी जागाही असतील. 'वन स्टेशन, वन प्रॉडक्ट स्कीम'अंतर्गत स्थानिक उत्पादने किऑस्कद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जातील तसेच हरित क्षेत्र वाढवणे आणि स्थानकांचा एकूण देखावा सुधारण्यावरही भर दिला जात आहे. या पुनर्विकसित स्थानकांची एक महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यांच्या रचनेत स्थानिक संस्कृती आणि वारशाची प्रेरणा दिसून येते. उदाहरणार्थ अहमदाबाद येथील स्थानकाची प्रेरणा मधेरा येथील सूर्य मंदिरामधून घेतली आहे. द्वारका येथील स्थानक द्वारकाधीश मंदिराची छटा दर्शवते; तर बालेश्वर स्थानकाची रचना जगन्नाथ मंदिरावर आधारित आहे. गुरगाव स्थानकात 'आयटी-थीम'चा वापर करण्यात आला असून कुंभकोणम येथे चोळा वास्तुशैलीचे प्रतिबिंब दिसते.

मे २०२५ मध्ये या परिवर्तन प्रक्रियेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. त्या वेळी देशभरातील १०३ पुनर्विकसित स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सहारणपूर (उत्तर प्रदेश), ओर्चा (मध्य प्रदेश), परळ (मुंबई) तसेच मुनीराबाद आणि धारवाड (कर्नाटक) या स्थानकांचा समावेश होता. या कार्यक्रमाने रेल्वेने पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाला मिळालेला वेग अधोरेखित केला. वाढीव अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रकल्प अंमलबजावणीतील गती, प्रवासी सुविधा आणि व्यावसायिक विकास यांचा समन्वय साधणारी नव्या प्रकारची दृष्टी यामुळे ही गती शक्य झाली आहे. पुनर्विकसित स्थानकांपैकी राणी कमलापती हे केरळमधील रेल्वे स्टेशन सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या मॉडेलवर उभारलेले जागतिक दर्जाचे उदाहरण मानले जाते. जर्मनीतील हेडलबर्ग या स्थानकाच्या धर्तीवर उभारलेले हे स्थानक भारतातील पहिले 'वर्ल्ड-क्लास' रेल्वे स्थानक म्हणून ओळखले जाते आणि येथे विमानतळासारखा प्रवासी अनुभव मिळतो. येथे कव्हर्ड पार्किंग, २४ तास वीजपुरवठा, वातानुकूलित लॉबी, सुव्यवस्थित किरकोळ व्यापार क्षेत्र, एस्कलेटर, लिफ्ट, हॉटेल, कन्वेन्शन सेंटर, वाहन प्रदर्शन कक्ष आणि अगदी सुपरस्पेशालिटी रुग्णालयापर्यंत विविध सुविधा उपलब्ध आहेत. या स्थानकाला 'असोचेम'कडून 'जेम ५-स्टार सस्टेनेबिलिटी' प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे.

काही स्थानके पूर्णपणे नव्याने उभारली जात आहेत, तर अनेक ठिकाणी मध्यम स्तरावरील आधुनिकीकरणाचे काम केले जात आहे. तथापि, या नव्या पिढीतील स्थानकांचे दोन मूलभूत घटक स्पष्टपणे दिसतात. उत्तम सुविधा आणि पायाभूत रचनेद्वारे प्रवासी आराम वाढवणे आणि किरकोळ व्यापार, फूड कोर्ट आणि संरचित पार्किंगद्वारे व्यावसायिक क्षमता वाढवणे. पुनर्विकास कार्यक्रमाचा विस्तार होत असताना त्याच्या यशासाठी शाश्वतता आणि डिजिटलायझेशन यांचे प्रभावी एकत्रीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. उष्णतेच्या लाटा, पूर आणि पाण्याची टंचाई यासारख्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या देशात हवामान-संवेदनशील स्थानक डिझाइन आता अपरिहार्य बनले आहे. सौर ऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, नैसर्गिक थंडावा देणारी रचना, पावसाच्या पाण्याचे संकलन, शून्य-निचरा मलनिस्सारण प्रणाली आणि स्थानिक वनस्पतींवर आधारित हरित क्षेत्र याद्वारे पर्यावरणीय परिणाम कमी करता येतील आणि दीर्घकालीन संचालन खर्चही घटू शकतो. एकूणच, भारतातील स्थानक पुनर्विकास हा केवळ इमारती सुधारण्याचा कार्यक्रम नाही, तर भविष्यासाठी सज्ज आणि शाश्वत वाहतूक केंद्रे उभारण्याचा व्यापक प्रयत्न आहे. या परिवर्तनाचा प्रवास पुढे नेताना सर्वसमावेशक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, कार्यक्षम आणि देशाच्या व्यापक शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत राहणे अत्यावश्यक ठरणार आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# अस्तित्वासाठीची झुंज पडतेय तोकडी

सुयोग आंग्रे

समाजाला वर्गांमध्ये विभागले गेलेले पाहण्याची आपल्याला सवय झाली आहे. दलित, आदिवासी, सवर्ण, हिंदू, मुस्लीम इत्यादी विविध वर्ग आपल्या समाजाकडे पाहण्याच्या पद्धतीवर वर्चस्व गाजवतात. आपण अनेकदा या स्थिर वर्गांद्वारे समाज समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि असे गृहीत धरतो की सामाजिक वास्तव या सीमांमध्ये पूर्णपणे सामावलेले आहे, परंतु या श्रेणींमध्ये देखील असे अनेक सामाजिक गट असू शकतात, जे या निश्चित श्रेणींमध्ये पूर्णपणे समाविष्ट नसतील असे आपल्याला वाटत नाही. आम्ही हे देखील समजून घेऊ इच्छित नाही की या श्रेणी नेहमीच कठोर आणि कायमस्वरूपी नसतात, परंतु कधीकधी लवचिक आणि बदलण्यायोग्य देखील असतात. सामाजिक जीवनाची जटिलता कधीकधी या श्रेणींच्या सीमांना आव्हान देत आल्याचे आपण पाहिलेदेखील आहे. प्रत्यक्षात, समाजाची रचना इतकी सोपी नाही की ती केवळ काही निश्चित श्रेणींमध्येच पूर्णपणे समजली जाऊ शकते. दलित आणि जमाती हे दोन वर्ग विशेषत: आपल्या राजकारणाने आणि प्रशासकीय यंत्रणेने निर्माण केले आहेत. वसाहतींच्या जनगणनेदरम्यान, प्रथमच, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या श्रेणी तयार करण्यात आल्या आणि त्यात अनेक विविध सामाजिक गटांचा समावेश करण्यात आला. वसाहतवादी राजवटीची रणनीती ही होती की समाजाला वेगवेगळ्या वर्गात विभागून प्रशासन सोपे करायचे आणि काही वेळा विभाजनाच्या रेषा आखूनही. परिणामी, असे बरेच समुदाय राहिले ज्यांना या श्रेणींमध्ये स्थान देण्यात आले असूनही, त्यांची सांस्कृतिक ओळख वेगळ्या पद्धतीने समजून घेणे आणि त्यांचे विश्लेषण करणे सुरूच आहे. उदाहरणार्थ, अनेक दलित जाती, दलित प्रवर्गात नोंदणीकृत असूनही, स्वतःला आदिवासी वैशिष्ट्ये मानतात. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये राहणारा मुसहर समुदाय प्रशासकीयदृष्ट्या दलित श्रेणीमध्ये नोंदणीकृत आहे, परंतु त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्व-प्रतिमेमध्ये ते स्वतःला अनेक आदिवासी वैशिष्ट्ये मानतात. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशातील अनेक भागात कोल आणि खरवार या समुदायांना प्रशासकीय दृष्टिकोनातून अनुसूचित जातीमध्ये ठेवण्यात आले आहे, ज्यांना अनेक ठिकाणी आदिवासी मानले जाते. आदिवासी संस्कृतीचा ठसा त्यांच्या दैनंदिन जीवनात, विधी, उपासना पद्धती आणि सांस्कृतिक व्यवहारात दिसून येतो. प्रशासकीय वर्गीकरणापेक्षा सामाजिक वास्तव अधिक जटिल आणि बहुआयामी असल्याचे ही परिस्थिती दर्शवते. या दोन श्रेणींमध्येही, असे अनेक सामाजिक गट आहेत जे पूर्णपणे येथे नाहीत आणि पूर्णपणे तेथे नाहीत. ते सामाजिक संरचनेत एक प्रकारचे मध्यवर्ती स्थान व्यापतात. सिद्धांतवादी अशा गटांना 'मध्यम गट', 'मध्यवर्ती ओळख असलेले समुदाय' किंवा 'सीमित ओळख' असलेले समूह म्हणतात. समाजाच्या मुख्य प्रवाहात असूनही, हे समुदाय कधीकधी ओळख आणि अधिकारांच्या पातळीवर अस्पष्ट स्थितीत राहतात. उत्तर प्रदेशात असाच एक समूह आहे - वंटंगिया समुदाय, जो मुख्यतः महाराजगंज आणि गोरखपूर परिसरातील जंगलात राहतो. जंगलात सखूची झाडे विशिष्ट पद्धतीने लावणे हे त्यांचे मुख्य काम होते. हे समुदाय या भागात कधी आणि कसे आले हे स्पष्ट नाही, पण ब्रिटिश राजवटीच्या काळापासून या कामाशी त्यांचा संबंध आहे हे मात्र निश्चित. प्रदीर्घ काळापासून हा समाज प्रशासकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून दुर्लक्षित आहे. त्यांची जमीनही फार काळ स्वतःची नव्हती. ते ज्या वस्त्यांमध्ये राहत होते त्यांना कायदेशीर मान्यता मिळाली नाही. त्यांना मतदानाचा अधिकारही नव्हता, सरकारी योजनांचा लाभही त्यांना पद्धतशीरपणे मिळवता आला नाही. जेव्हा एखाद्या समुदायाला ओळख आणि वास्तव्याचा वैध आधार नसतो, तेव्हा विकासाच्या योजनाही त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. योगी आदित्यनाथ संसदेपासून रस्त्यावर लढले, तेव्हा वंटंगिया गावांना महसूल गावांचा दर्जा मिळाला आणि मतदानाचा अधिकार मिळाला. मग सरकारी घरांच्या योजना, पेन्शन, आरोग्य सुविधा आणि इतर कल्याणकारी धोरणे त्यांच्यापर्यंत पोहोचू लागली. अशा प्रकारे ते हळूहळू विकासाच्या प्रवाहात सामील होऊ शकले आणि त्यांना लोकशाहीचा सन्मानही मिळू लागला. खरे तर समाजात असे अनेक गट आहेत, जे दोन प्रस्थापित वर्गांमध्ये वसलेले आहेत आणि ज्यांची ओळख पूर्णपणे स्पष्ट नाही. अशा उपेक्षित व हरवलेल्या समाजाची ओळख करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे ही कोणत्याही संवेदनशील प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. यासाठी आपण तयार वर्गांच्या दबावाखाली न राहता समाजातील गुंतागुंतीचे वास्तव नव्या सामाजिक संशोधन आणि अभ्यासातून समजून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. राजकारण्यांनीही पुढे येऊन 'उपेक्षितांमधील उपेक्षित' गटांची ओळख, विकास आणि सन्मान यासाठी लढले पाहिजे. त्यासाठी प्रशासन, धोरणे आणि ज्ञानाची नवी दृष्टी विकसित करावी लागेल, जेणेकरून समाजातील अशा अदृश्य किंवा दुर्लक्षित समूहांना ओळख, सन्मान आणि विकासाची संधी उपलब्ध करून देता येईल. अन्यथा असे गट विकासाच्या प्रवाहात मागेच राहतील आणि विकास आणि लोकशाही चेतना या गटांपर्यंत पोहोचणे कठीण होईल. खऱ्या अर्थाने लोकशाही असणाऱ्या देशामध्ये आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याची अग्नीपरिक्षा या समाजांना द्यावी लागते यापेक्षा वेगळा दैवदुर्विलास नाही. या घटकातील अनेक विचारवंत आणि बुद्धिवंतांनी आपली ओळख निर्माण करीत आपल्या समाजाची ओळख जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे असे असताना देखील आजच्या स्पर्धात्मक युगात या सामाजिक समुहांना आपली ओळख टिकवून ठेवण्यासाठी आपल्याच समाजाबरोबर संघर्ष करावा लागत आहे.

लोकसंसद

## ट्रम्प यांची धरसोड वृत्ती जगाला नुकसान करणार

गेले महिनाभर अमेरिका-इस्राएल व इराण यांचे युद्ध सुरु आहे. या युद्धात ट्रम्प यांची भूमिका सतत बदलती आहे. कधी ते नाटो राष्ट्रांची मदत मागतात तर कधी त्याची गरज नाही असे भासवितात. तेहरान मधील अणुऊर्जा प्रकल्पाबाबत सुविधा नष्ट करण्याची धमकी देणे व लगेच काही तासात तो हल्ला पुढे ढकलणे. अमेरिकेचा काही राज्यात ट्रम्प विरोधी आंदोलनाने वातावरण ढवळून निघाले. काही दिवसापूर्वी हॉर्मुझ समुद्रधुनीचे रक्षणासाठी युरोपिअन राष्ट्रांची मदत मागितली होती तर दुसऱ्या बाजूला आम्हाला मदतीची गरज नाही आम्ही सार्वभौम आहोत असेही सांगितले. खुद्द अमेरिकेत सुद्धा ट्रम्प विरोधी वातावरण आहे. एक सर्वेक्षणानुसार ६१ टक्के नागरिकांनी ट्रम्प यांच्या विरोधी मत नोंदविले आहे तर ३७ टक्के लोकांनी समर्थन दिले आहे. एकूणच ट्रम्प यांना अमेरिकेत सुद्धा निर्भेळ सपोर्ट नाही. नाटो राष्ट्रांनी तर विरोध प्रदर्शित केला आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा हे युद्ध केव्हा संपणार? या युद्धामुळे जगभरात तेलाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक देशात किमती वाढल्या आहेत. काही देशांनी यावर काही उपाय सुद्धा योजले आहेत ट्रम्प आता युद्ध विराम घेणार का? कारण या युद्धाचा परिणाम खुद्द अमेरिकेसह जगाला होत आहे. ट्रम्प यांच्याकडे कोणतीही ठोस भूमिका दिसत नाही. खरे तर इराणने त्यांना जेरीस आणले आहे. इराणचे सुद्धा खूप नुकसान झाले आहे. जगातील कोणत्याही राष्ट्राने ट्रम्प यांना पाठिंबा दिलेला नाही. ट्रम्प यांनी युद्ध विरामाची घोषणा करून त्याची त्वरित अंमलबजावणी करणे जरूर आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी

मराठ्यांच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासाठी आजचा दिवस काळा दिवस ठरला. ३ एप्रिल १६८० रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडवर अखेरचा श्वास घेतला. सततच्या धावपळीमुळे, लढायांमुळे ते आजारी पडले आणि त्यातच त्यांच निधन झालं. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवरायांचा जन्म झाला. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी आपल्या सवंगड्यांसोबत तोरणा गड घेतला आणि स्वराज्याचं तोरण बांधलं. महाराष्ट्रात आदिलशाही, निजामशाही आणि मुघलांनी महाराष्ट्रात गोंधळ घातला होता, शेतकऱ्यांना लुटलं होतं, इथल्या आया-बहिणींची आब्रू लुटली होती. अशा वेळी या सत्तांच्या विरोधात शिवरायांनी जिवाला जीव देणारी सवंगडी निवडली आणि रायरेश्वरच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेचा संकल्प सोडला. वडील शहाजीराजे आणि आई जिजामाता यांच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांनी हे महाराष्ट्रावर असलेलं गुलामीचं जोखड उखडून फेकून दिलं आणि खऱ्या अर्थाने रयतेचं राज्य स्थापन केलं. इथल्या शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, अन्यथा शेतकरी म्हणतील यांच्यापेक्षा तो गनिम बरा... अशा आशयाचा आदेश त्यांनी मावळ्यांना दिला होता. त्यावरून त्यांना 'जाणता राजा' का म्हणतात याची प्रचीती येते. शिवरायांनी ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक केला आणि रयतेचं स्वराज्य स्थापन झाल्याची दवंडी फिरवली. भारतातील सर्वश्रेष्ठ राजांमध्ये शिवरायांचे नाव सर्वात वरती घेतलं जातं. वरती पुण्यापासून ते दक्षिणेकडे अगदी तंजावरपर्यंत त्यांनी मराठ्यांचा दरारा प्रस्थापित केला. सर्वधर्म समभाव हे तत्व खऱ्या अर्थाने शिवरायांनी आचरणात आणलं आणि मराठ्यांचं स्वराज्य हे खऱ्या अर्थाने सुराज्य केलं. आज ३ एप्रिल. सह्याद्रीचा कडा हळहळला, अरबी समुद्र अस्वस्थ झाला आणि अवघ्या महाराष्ट्राच्या काळजात एक पोकळी निर्माण झाली. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक ऐतिहासिक नाव नाही, तर ती एक ऊर्जा आहे. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेणारा हा राजा, आयुष्यभर रयतेच्या सुखासाठी झटला. त्यांनी केवळ मातीचे किल्ले जिंकले नाहीत, तर गुलामगिरीच्या मानसिकतेतअडकलेल्यासामान्यमाणसाला 'माणूस' म्हणून जगण्याचा सन्मान आणि जिद्द दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन हे आजही जगातील व्यवस्थापन तज्ज्ञांसाठी अभ्यासाचा विषय आहे. स्वराज्यात कोणावरही अन्याय होणार नाही, शेतकरी सुखी राहील आणि व्यापाराची भरभराट होईल, ही त्यांची मुख्य दूरदृष्टी होती. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा प्रसंग असो किंवा इतर शत्रूंच्या स्त्रियांचा, महाराजांनी नेहमीच परस्त्रीला मातेसमान मानले. 'स्त्री ही राज्याची अब्रू आहे,' हे मूल्य त्यांनी रुजवले. पर्यावरण आणि आरमारावरही काम केले. 'गडकिल्ले हीच राज्याची मुख्य ओळख,' हे ओळखून त्यांनी जलदुर्ग उभारले आणि भारतीय आरमाराचा पाया रचला. महाराजांनी झाडे कापण्यावर घातलेली बंदी त्यांच्या पर्यावरणप्रेमाची साक्ष देते. ३ एप्रिल १६८० रोजी महाराजांचे निधन झाले तेव्हा त्यांचे वय केवळ ५० वर्षांचे होते. इतक्या कमी आयुष्यात त्यांनी जे कार्य केले, ते करायला इतरांना कित्येक शतके लागली असती. महाराज देहाने गेले, पण त्यांनी मागे सोडलेले स्वराज्य, शौर्य आणि विचार आजही जिवंत आहेत. आज आपण जेव्हा त्यांना अभिवादन करतो, तेव्हा केवळ घोषणा देऊन चालणार नाही. भ्रष्टाचारमुक्त समाज आणि स्त्रियांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे, हेच शिवरायांचे खरे स्वराज्य असेल. शेवटी इतकेच सांगेन, 'देहाने गेले जरी महाराज, तरी विचाराने काळजात आहेत, शिवरायांचे हे स्वराज्य, आजही जगात महान आहे.' अशा या रयतेच्या राजाला, थोर पराक्रमी छत्रपतींना माझे कोटी कोटी प्रणाम! जय भवानी, जय शिवाजी!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३ एप्रिल
१)श्री.अरविंद वासुदेवराव कोहीरकर अलिबाग दि.३-४-१९४३
२)श्री.प्रसाद हरिश्चंद्र पाटील चेंढरे, अलिबाग दि.३-४-१९५८


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# खरातची नार्को टेस्ट करा

## • हर्षवर्धन सपकाळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण अत्यंत गंभीर असून या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन चौकशी केली तरच यातील अनेकांचे खरे चेहरे उघडे पडतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीच्या नावाखाली मलमपट्टी न करता अशोक खरातची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.




टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, महायुती सरकारमधील अनेक मंत्री, आमदार यांनी अशोक खरातकडून पुजा करून घेतल्या आहेत, त्याचे तीर्थ घेतले आहे. राज्यात अंधश्रद्धा विरोधी कायदा असताना राज्यातील मंत्रीच जर अशा प्रकारे अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे उद्योग करत असतील, तर पुरोगामी महाराष्ट्राला ते शोभणारे नाही. हा प्रकार संविधानाची पायमल्ली करणारा आहे म्हणून अशोक खरातच्या दरबारात ज्या मंत्री, आमदार, नेत्यांनी हजेरी लावून त्याचा लाभ घेतला, त्या सर्वांवर अंधश्रद्धा विरोधी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संदर्भातील प्रश्नावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांच्या फोटोवर अशोक खरातने फुली मारली होती, अशी माहिती समोर येत आहे. हा प्रकार अतिरेकी त्यांच्या टार्गेटवर फुली मारतात तसाच आहे. तसेच, अजित पवार यांच्या बंगल्याबाहेरही काही तरी अघोरी पुजा केल्याचा प्रकार उघड झाला होता. कोणाची खूर्ची खाली करावी व कोणाला त्या खुर्चीवर बसवावे यासाठी सुद्धा अघोरी पुजा केल्याचे समजते, हे सर्व गंभीर असून त्यावर कारवाई झाली पाहिजे, असेही सपकाळ म्हणाले. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी जैन मुनींच्या आशिर्वादाने गळा ठिक झाल्याच्या वक्तव्याबद्द विचारलेल्या प्रश्नावर बोलताना सपकाळ म्हणाले की, महापौर रितु तावडे यांनी नवा शोध लावला आहे, याबद्दल त्यांना नोबल पारितोषिक देऊन सन्मान केला पाहिजे, असेही सपकाळ म्हणाले.

## मैला साफसफाईसाठी अत्याधुनिक वाहन

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहे अष्टमी शहरात वाढते शहरीकरण आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे सोसायटीतील मैला साफसफाईसाठी लागणारे मैला टँकर नगर पालिकेकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असे. इतर ठिकाणी भाड्याने आणलेले मैला टँकर परवडत नसल्याने नाईलाजास्तव दामदुप्पट भाडे देऊन टँकर आणावे लागत असे. नागरिकांची गैरसोय दूर व्हावी, याकरिता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या विशेष प्रयत्नाने रोहा अष्टमी नगर पालिकेला स्वतःच्या मालकीचे मैला साफसफाईकरिता अत्याधुनिक मैला टँकर उपलब्ध झाले.



नगर परिषदेकडे स्वतःचे वाहन उपलब्ध झाल्यामुळे काम अधिक प्रभावीपणे करता येईल. तसेच, हे वाहन पुढे सोसायट्या व इतर ठिकाणी भाडेतत्त्वावर देण्याचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असणार असल्याची माहिती नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी दिली. यावेळी उपाध्यक्ष व आरोग्य सभापती अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, गटनेते महेंद्र गुजर, सभापती राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, महेश कोलटकर, रवींद्र चाळके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक अजीत मोरे, प्रशांत कडू, माझ सवाल, अभियंता ओंकार भुरण, अधिकारी श्रीनिवास पाटील, निलेश चाळके आदी उपस्थित होते.

## पळसाई मातेचा पालखी सोहळा

**नागोठणे :** रोहा तालुक्यातील नागोठण्याजवळील पळस येथील श्री पळसाई मातेचा चैत्र पालखी सोहळा गुरुवारी (दि.२) साजरा करण्यात आला. यावेळी पळस गावातील नागरिकांत, विशेष करून महिला व तरुण वर्गात उत्साहाचे वातावरण होते. चैत्र पालखी सोहळ्यानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व विविध रंगी फुलांची सजावट करण्यात आली होती. तर गावात सर्वत्र रांगोळ्या काढून पताका लावून आकर्षक सजावट करण्यात आली होती. नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्धी असलेल्या तसेच भक्तगणांना देवीची तशी प्रचीती येत असल्याने संपूर्ण रायगड बरोबरच ठाणे, मुंबई, पुणे येथून दरवर्षी येणाऱ्या भाविकांची वर्दळ



वाढतच असल्याचे अलीकडील काही वर्षांपासून पहावयास मिळत आहे. मुंबई व इतरत्र ठिकाणी कामानिमित्त असलेली परिसरातील मंडळी तसेच माहेरवाशिणी या न चुकता चैत्र पालखी सोहळ्यासाठी व नवरात्रोत्सवासाठी येथे येतात.

## प्रकाश आंबेतकर यांचे निधन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील विळे गावचे रहिवासी डॉ. प्रफुल प्रकाश आंबेतकर यांच्या वडिलांचे शुक्रवार दि.२७ मार्च रोजी त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने आंबेतकर कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार तसेच विळे ग्रामसंस्थांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर विळे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय अंत्यविधीला उपस्थित होता. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.५ एप्रिल उद्धार पाली येथे होणार असून उत्तरकार्य मंगळवार दि.७ एप्रिल रोजी राहत्या घरी विळे येथे होणार आहेत.



## वाशी येथे बगाडाची परंपरा कायम

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील वाशी गावामध्ये सर्वात मोठी यात्रा भरते. या यात्रेमध्ये वर्षानुवर्षे बगाडाची प्रथा व देवकाठींची प्रथा पहायला मिळते. आई जगदंबेच्या यात्रेमध्ये खारेपाटासह तालुक्यातील भाविक यात्रेच्या दिवशी आपले नवस फेडण्यासाठी ढोल ताशाच्या गजरात येत असतात आणि आपला नवस फेडतात. या यात्रेमध्ये मोठया प्रमाणात खाऊची, खेळण्याची दुकाने तसेच मनोरंजनाची दुकाने सुध्दा पहायला मिळतात. परंतु या सर्वांबरोबर यात्रेचे प्रमुख आर्कषण म्हणजे बगाडाची जुनी परंपरा आणि देवकाठीची अनोखी प्रथा होय. जगदंबा मातेच्या प्रांगणात गलस्तंभावर भला मोठा लाकूड तराजू समान जोडला जातो आणि दोन्ही बाजूला दोर बांधून नवस केलेली व्यक्ती बगाडाला दोराच्या सहाय्याने टांगली जातात. नंतर त्या माणसांना गोल फिरविले जाते.

## बँकिंग, विमा क्षेत्र विषयावर प्रशिक्षण

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अकाउंटिंग अँड फायनान्स विभाग व करियर कट्टा विभागाच्या वतीने महाविद्यालयात बँकिंग, वित्त आणि विमा क्षेत्र (सर्टिफिकेट प्रोग्राम इन बँकिंग, फायनान्स अँड इन्शुरन्स) या विषयावर चाळीस दिवसांचा पूर्णवेळ प्रमाणपत्र कोर्स आयोजित करण्यात आला होता. ४० दिवसांच्या या कोर्समध्ये विद्यार्थ्यांनी बँकिंग, विमा व वित्त या क्षेत्राविषयी ज्ञान प्राप्त केले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रम समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे हे होते. त्यांनी कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन




केले. या कोर्समध्ये संवाद कौशल्य, आर्थिक साक्षरता, विमाचे महत्व त्याचबरोबर, सार्वजनिक वागणुकीचे कौशल्य व समूह चर्चा इत्यादी स्किल विद्यार्थ्यांना या कोर्समधून मिळाले असल्याचे सांगितले. तर आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून मोठ्या व्यवसायाची स्वप्न पाहिली पाहिजे व सातत्याने स्वतःला प्रेरित करून यश प्राप्त केले पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एच.के. जगताप यांनी केले व या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा उद्देश सांगितला. प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात रिमझिम गोंड व जय कोळी यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

## वाढदिवसानिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी ३० मार्च २०२६ रोजी आपला वाढदिवस विविध कार्यक्रमांसह साजरा केला. या दिवशी त्यांनी आपला वाढदिवस परहूर येथील श्री समर्थ वृद्धाश्रमातील वृद्ध महिला व पुरुष बांधवांसह केक कापून साजरा केला. तसेच, सामाजिक बांधिलकी म्हणून वृद्धाश्रमातील वृद्धांना लागणारे कांदा, बटाटा, तांदूळ, तेलाचे डबे व इतर जीवनावश्यक साहित्य व काही प्रमाणात आर्थिक मदत वृद्धाश्रमाचे संस्थापक ॲड. जयेंद्र गुंजाळ यांच्याकडे सुपूर्द केली.


या कार्यक्रमाला मुनवली येथील ज्येष्ठ नागरिक दिलीप मोंढे, सामाजिक कार्यकर्ते सतिश घाडी, जयेश ठकरूळ, गीतेश ठकरूळ, महेश नागावकर, निकेश अनमाने, रोशन पुजारी, साची घाडी, पवित्र नागावकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सचिन घाडी यांना राजकीय व सामाजिक तसेच विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी फोनवरून, काहींनी सोशल मीडिया तसेच काहींनी प्रत्यक्ष भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यामध्ये विशेषतः राजिप माजी सदस्य काका ठाकुर, शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखाताई पाटील यांनीसुद्धा त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## हनुमंत मोरे यांना मातृशोक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील जेष्ठ पत्रकार हनुमंत दत्तारामराव मोरे यांच्या मातोश्री सावित्रीबाई दत्तारामराव मोरे (८६) यांचे रविवार दि.२९ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्यावर सोमवारी सकाळी परखंदे शिंदीवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी तालुक्यातील सर्वच स्तरातील मान्यवर उपस्थित होते. सावित्रीबाई यांच्या पश्चात पाच मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.




## न्हावे गावात स्नेहसंमेलनाचा जल्लोष

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील न्हावे येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात पार पडले. गावातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. याच दिवशी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत न्हावे, नवखार आणि सोनखार गावांतील महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

सायंकाळी स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, कोळीगीते, समूह नृत्य आणि नाट्य सादरीकरणातून आपल्या कलागुणांचा अप्रतिम आविष्कार सादर केला. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त टाळ्यांची दाद मिळाली. लहानग्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा आणि प्रज्ञाशोध परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.


**रिअल इस्टेट गुंतवणुकीची नवी दिशा** | **डॉ. सुनील मांजरेकर यांचा पुढाकार**

# थायलंडच्या फुकेतमध्ये मराठी संस्कृतीची छाप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

निसर्गसंपन्न आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या थायलंडमधील फुकेतमध्ये पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती मंदिराची हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली आहे. मराठी संस्कृतीचा जागतिक स्तरावर विस्तार करण्याचा एक अनोखा उपक्रम साकार झाला आहे.

दुबईस्थित उद्योगपती आणि गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे ग्लोबल अध्यक्ष आणि मूळ अलिबागकर असलेले डॉ. सुनील व्ही. मांजरेकर यांच्या पुढाकारातून भारतीय विशेषतः महाराष्ट्रीयन नागरिकांसाठी फुकेतमध्ये घर खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. त्यांच्या एसक्यूसीसी प्रॉपर्टीज एलएलसी (दुबई, यूएई) आणि फुकेट रिअल इस्टेट डेव्हलपमेंट (थायलंड) यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प उभारले जात आहेत.

फुकेतच्या या रम्य समुद्रकिनाऱ्यालगत आणि निसर्गरम्य वातावरणात उभे राहणारे हे प्रकल्प आधुनिक जीवनशैली, सुरक्षितता आणि जागतिक दर्जाच्या सुविधा देणारे आहेत. त्यामुळे पर्यटन, व्यवसाय आणि स्थिर उत्पन्न या तिन्ही दृष्टीकोनातून गुंतवणूकदारांसाठी हा प्रकल्प विशेष ठरत आहे.

'फुकेत९' ही कंपनी २००४ पासून फुकेतमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत असून, विकास, बांधकाम आणि व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत विश्वासार्ह नाव म्हणून ओळखली जाते.

कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये हॉटेल्स, कॉन्डोमिनियम्स आणि लक्झरी व्हिला यांचा समावेश असून सर्व प्रकल्पांसाठी व्यावसायिक प्रॉपर्टी मॅनेजमेंट सुविधा दिल्या जातात.

मुंबईतील जेडब्ल्यू मॅरियट, सहार येथे आयोजित कार्यक्रमात 'फुकेत९'च्या संस्थापक मिस पापाचसॉर्न मीपा (Kae) यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

फुकेतमधील दगडूशेट गणपती मंदिराच्या निर्मितीमागील कथा प्रेरणादायी आहे. या मंदिरात होणाऱ्या षोडशोपचार पूजा, आरती आणि भजनात परदेशी नागरिकांचा सहभाग पाहून भारतीय संस्कृतीचे जागतिक आकर्षण स्पष्ट होते. या मंदिराची निर्मिती मीपा यांच्या वडिलांनी केली असून, स्वतः त्यांचा मंदिरातील दररोजच्या सेवा कार्यात विशेष सहभाग असतो.

'फुकेत९'चा फुल-सायकल ॲप्रोच हा या प्रकल्पाचा मुख्य आधार असून, सखोल मार्केट रिसर्चपासून ते टर्नकी डेव्हलपमेंट आणि व्यवस्थापनापर्यंत सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे गुंतवणूकदारांना स्थिर आणि विश्वासार्ह परतावा मिळण्यास मदत होते. कंपनीकडून मोफत कन्सल्टेशन सेवा उपलब्ध असून, ग्राहकांना योग्य मालमत्ता निवडण्यासाठी तसेच वैयक्तिक प्रोजेक्ट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले जाते.

मुंबईत पार पडलेल्या या विशेष परिषदेला महाराष्ट्रातील विविध शहरांमधून उद्योग-व्यावसायिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली होती. ही महाराष्ट्रातील उद्योजक आणि नागरिकांसाठी सुवर्ण संधी असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून देण्यात आली.

> **फुकेत हे केवळ पर्यटनस्थळ नाही, तर भारतीयांसाठी सुरक्षित आणि फायदेशीर गुंतवणुकीचे नवे केंद्र आहे. मराठी संस्कृतीची जोड आणि जागतिक दर्जाच्या सुविधांमुळे हा प्रकल्प गुंतवणूकदारांसाठी विशेष ठरेल.**
> **- डॉ. सुनील व्ही. मांजरेकर**


# निवडक

## दहिवली येथे मरीआई देवीची यात्रा

**नेरळ :** नेरळमधील दहिवली गावातील श्री मरीआई देवीच्या यात्रेला सुरूवात झाली. नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मरीआई देवीचा हनुमान जयंतीनिमित्त पालखी सोहळा आणि त्यानंतर शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी ही यात्रा भरते. सीकेपी प्रभू लोकांचे पूर्वीचे दहिवली गाव हे तेथील मरीआई देवीच्या जागृत स्थानामुळे प्रसिद्ध आहे. दोनशे वर्षांपासून या देवीची ओटी भरण्यासाठी लोकांचा राबता असतो, बोललेला नवस पूर्ण होतो, अशी आख्यायिका असलेल्या दहिवली गावातील मंदिरात चैत्र पौर्णिमेला यात्रा भरते. दोन दिवस चालणाऱ्या यात्रेत भाविक मरीआईला केलेला नवस फेडण्यासाठी मोठ्या संख्येने येत असतात.



मारुती मरीआई देवस्थानकडून यात्रेचा कार्यक्रम वर्षानुवर्षे राबवत आले आहेत. नामदेव घाटे यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी दोन दिवसांचा उत्सव मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ, तरुण साजरा करतात. त्यांना स्थानिक दहीवली तर्फे वरेडी ग्रामपंचायतकडून सहकार्य मिळते. या यात्रेत अनेक दुकाने थाटण्यात आली. तसेच, मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन दहीवली गावात नेरळ पोलिसांकडून बंदोबस्तदेखील ठेवण्यात आला. तर दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायतकडून मंदिर परिसर सुशोभीकरण स्वच्छता मोहिमेवर विशेष लक्ष देण्यात आले.

## वाशी गावच्या वरसुआईची यात्रा

**चिरनेर :** पेण तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशी गावातील आई भवानी जगदंबा वरसुआईची यात्रा मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडली. पेण तालुक्यातील वाशी या गावी १२ एकर जमिनीत पसरलेल्या विस्तीर्ण तळ्याच्या किनारी आई भवानी जगदंबेचे सुंदर, नेत्रसुखद शिवकालीन जागृत देवस्थान आहे. शेजारीच श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी आई भवानी जगदंबा वरसुआईचे दर्शन घेतल्याचे अनेक पुरावे इतिहासात आहेत.



उंबर्डे गावची वज्रादेवी, रावे गावची रायबादेवी, श्री गावची भवानी माता, अक्कादेवी या आईच्या एकणू सात बहिणी आहेत, असे मानले जाते. आई जगदंबा वरसुआईचे दर्शन घेण्यासाठी तसेच यात्रेतील मनमोहक रूप बघण्यासाठी भक्त येतात. मंदिराच्या समोर मुख्य कमान असून पेशवेकालीन दोन दीपमाळ असून दुपारी मानाच्या देवकाठ्या उभारल्या जातात.


(गणेश चोडणेकर)

## कोटेश्वरी मातेच्या यात्रेला प्रारंभ

**आगरदांडा :** मुरुडच्या प्रवेशव्दाराजवळ श्री कोटेश्वरी मातेच्या यात्रेला प्रारंभ झाला. यादिवशी महिलांनी सकाळपासून कोटेश्वरी देवीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने ग्रामदैवत श्री कोटेश्वरी देवीच्या यात्रा चैत्र शुद्ध चतुर्दशीला मोठी यात्रेचे आयोजन केले जाते. या यात्रेला, अलिबाग, रेवदंडा, मुंबई, पुणे, ठाणे व शहरांसह पंचक्रोशी भागातील शेकडो भाविक या यात्रेत सहभागी झाले होते. यात्रेत २५ ते ३० दुकाने थाटली असून यामध्ये मिठाई, खेळणी, खाऊ, हार-फुलांसह आदी दुकाने थाटली होती.

## हरीश भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार



**उरण :** विष्णुदास भावे नाट्यगृह सभागृह वाशी, नवी मुंबई येथे सारथी सेवा संस्थाद्वारे सेंट मेरीज जे. एन. पी. शाळेचे शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. रस्ता सुरक्षा अभियान, गणपती विसर्जन व इलेक्शन ड्युटीसाठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून ड्युटी केल्याबद्दल, अपघातग्रस्तांना मदत तसेच, दरवर्षी रक्तदान केल्याबद्दल, शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्च पास्ट संचलनाबरोबरच वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण दल याबद्दल माहिती दिल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या विशिष्ट पुरस्काराबद्दल त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक राजेश अल्फोंस यांनी देखील कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजाची कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सेवा करण्याचा हरीश धर्मा भोंडकर नेहमी प्रयत्न करत असतात व इतरांनाही प्रेरित करतात. त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक ठिकाणी त्यांचा मानसन्मान सुद्धा झाला आहे. शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## अशोक पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा

**चिरनेर :** चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील हे ३३ वर्ष सेवा बजावत, नियत वयोमानानुसार सेवेतून ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी सुरुवातीच्या काळात अलिबागच्या कोकण एज्युकेशन सोसायटीत २४ वर्ष सेवा बजावली. तर पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीत २०१६ मध्ये रुजू होऊन, त्यांनी नऊ वर्ष, नऊ महिने उत्तम सेवा बजावली. अशोक पाटील यांचा सेवापुर्तीचा सत्कार सोहळा दि.२५ मार्च राजी चिरनेर शाळेत आयोजित करण्यात आला होता. यावेळी सत्कारमूर्ती अशोक पाटील व त्यांच्या सहचारणी सपना पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, साडी चोळी व भेटवस्तू देऊन अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या कुटुंबीयांतर्फे सत्कार करण्यात आला.

# निवडक

## रोहा पोलीस यंत्रणा सतर्क

**सुतारवाडी** : रायगड जिल्ह्यात सध्या चोरट्यांनी हैदोस घातला असून या भुरट्या चोरांना जेरबंद करण्यास पोलिसांना यश आले आहे. त्यातच रोहा तालुक्यासाठी नव्यानेच रुजू झालेले प्रभारी पोलीस निरीक्षक सुयश कुमार सिंग यांनीही आपल्या धाडसाची चुणूक दाखविली असून येथील भुरटे चोर व अवैध धंदे करणाऱ्यांना जेरबंद केले आहे. त्यामुळे इतरांचे धाबे दणाणले आहेत. सध्या जिल्ह्यात प्राथमिक, माध्यमिक कॉलेजच्या परीक्षा आता अंतिम टप्प्यात आल्या असून मे महिन्यापासून शाळा महाविद्यालयांना सुट्ट्या लागणार आहेत. सुट्ट्या लागल्या की शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आपल्या गावी जात असतात. यावेळी ते त्यांचे घर कुलूप लावून बिनधास्तपणे गावी जात असतात. नेमका याच संधीचा फायदा घेऊन भुरटे चोर घराचे कुलूप तोडून आतील किमती वस्तू किंवा सामान चोरून नेत असतात. त्यामुळे सुट्टीत गावाकडे गेलेल्या शिक्षकांचा जीव टांगणीला लागतो. त्यासाठी रोहा पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून भुरट्या चोरांचे धाबे दणाणले आहेत.

## 'सिंह गर्जला रणी' नाट्याचे आयोजन

**चिरनेर** : उरण तालुक्यातील मोठेभोम येथील श्री हनुमान नाट्य मंडळाच्यावतीने 'सिंह गर्जला रणी' या ऐतिहासिक नाट्य कलाकृतीचे सादरीकरण शनिवारी (दि.४) करण्यात येणार आहे. गुरुवर्य वसंतदादा चिर्लेकर हे या नाट्यप्रयोगाचे प्रेरणास्थान आहेत. तर, नाटकाची निर्मिती व व्यवस्थापन ग्रामस्थ मंडळ मोठेभोम यांची असून, सहनिर्मिती घनश्याम पाटील, समीर नारंगीकर, किशोर केणी, नवनीत नारंगीकर, दिलीप पाटील, बबन पाटील, सचिन घबाडी, भारती सुनील पाटील, श्याम नामदेव पाटील, अनिल जोशी यांची आहे. नाटकाचे लेखन मदन राजवाडेकर यांचे आहे. तर, दिग्दर्शन विजय केणी यांचे असून, सहदिग्दर्शन सुनील पाटील, चंद्रशेखर पाटील यांचे आहे. सूत्रधार रोहण पाटील असून, मोठेभोम प्राथमिक शाळेसह साहिल केणी, राजेश पाटील, शरद केणी, निलेश ठाकूर, दत्तात्रेय म्हात्रे यांचे नाट्यप्रयोगास विशेष सहकार्य लाभले आहे. निर्मिती साह्य सदानंद पाटील यांचे आहे. तसेच, या नाटकात बबन पाटील, अनंत पाटील, संग्राम ठाकूर, विजय केणी, चंद्रशेखर पाटील, सुनील पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अभिजीत पाटील, अशितोष ठाकूर, सर्वेश पाटील, निलेश पाटील, अर्चना पाटील, श्रावणी म्हात्रे, राजेश पाटील, रितेश पाटील, साई ठाकूर, उदय पाटील, अतुल पाटील, संगम नारंगीकर, साई पाटील, कमलाकर पाटील, विवेक पाटील, साहिल केणी, दवेश नारंगीकर आदी कसलेले कलाकार आपल्या अभिनयाचे रंग उधळणार आहेत.

## कवी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आपटा** : अंनिसचे जिल्हा स्तरीय कवी संमेलन रविवारी (दि.२९) पार पडले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी व कोमसापचे विश्वस्त प्रा.एल.बी.पाटील हे होते. तर, उद्घाटक मोहोपाड्याच्या सरपंच उमा मुंढे या होत्या. यावेळी उमा मुंढे यांनी सांगितले की, श्रद्धा असावी, पण अंधश्रद्धा नसावी. प्रमुख पाहुणे प्रा.एल बी.पाटील यांनी, त्यांची इव्हाण या गायलेल्या कवितेने हास्याची लकेर उसळली. त्यानंतर रायगड जिल्ह्यातून विविध ठिकाणांहून आलेल्या २४ कवींनी अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक आशयाच्या कविता सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली. परीक्षक डॉ.राजेंद्र राठोड व महेंद्र पाटेकर यांनी काटेकोरपणे परीक्षण करून ३ क्रमांक व विशेष उल्लेखनीय २ क्रमांक निश्चित केले. तसेच, या दोन्ही परीक्षकांनी देखील त्यांच्या दोन कविता सादर केल्या. त्यांनाही रसिकांची दाद मिळाली. या कवी संमेलनात प्रथम क्रमांक अनिल सोनवणे, द्वितीय क्रमांक महेंद्र नाईक व तृतीय क्रमांक प्रतिभा रननवरे यांनी प्राप्त केला.



## खड्डे भरण्याच्या कामांना सुरुवात

**नेरळ** : येथील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवण्याचे व गतिरोधक टाकण्याचे आवाहन स्थानिकांनी केले होते. त्यावर जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे आणि कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांनी नेरळ विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून नेरळ गावातील बहुसंख्य रस्त्यावर खड्डे बुजविण्यासाठी व गतिरोधक टाकण्याची कार्यवाही पूर्ण केली. राजिपच्या नेरळ संकुल प्राधिकरण मधील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवावेत, अशी मागणी नेरळ ग्रामस्थांकडून सुरू होती. त्याचवेळी काँक्रिट रस्त्यावर लावण्यात आलेले फायबर गतिरोधक निघून गेल्याने वाहने सुसाट वेगात जात होती. ही बाब लक्षात घेऊन नेरळ गावातील रस्त्यांवर गतिरोधक टाकण्यात यावा, अशी मागणी स्थानिकांनी जि.प. सदस्य सुनीता मोरे आणि पं.स. सदस्य भगवान चंचे यांच्या कडे केली होती. त्यानुसार त्यांनी जि.प.कडे पत्र व्यवहार केला आणि नेरळ संकुल प्राधिकरण कडून ही कार्यवाही व्हावी, अशी मागणी केली. त्यानंतर प्राधिकरण कडून दोन बोझर डांबर नेरळ मध्ये पोहचली. पहिल्या दिवशी खांडा, मोहाची वाडी, बाजारपेठ,पाडा, टेप आळी, ग्रामपंचायत कार्यालय परिसर इत्यादी भागातील रस्त्यावरील खड्डे बुंजवून गतिरोधक टाकण्यात आले. दुसऱ्या दिवशी नेरळ पूर्व भागातील निर्माण नगरी, पाडा मातोश्री नगर आणि कोल्हार रस्त्यावर खड्डे भरण्याची आणि गतिरोधक बनवण्याची कामे पूर्ण करण्यात आली.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमध्ये दवाखान्यात कामाला नर्स/रिसेपशनिस्ट व ड्रायव्हर पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चर** ऑफिसमध्ये कॉम्प्युटर्सचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७०८२७८२९/९४२२०९४१५१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# जुने माणगाव चौकात गतिरोधकांची गरज

## ● जीव धोक्यात घालून पादचाऱ्यांचा प्रवास ● अपघातांच्या मालिकेमुळे भीतीचे वातावरण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी आणि वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जुने माणगाव येथील तिनबत्ती चौक पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे या चौकात दररोज जीव धोक्यात घालून नागरिकांना रस्ता ओलांडावा लागत आहे. काही जण गंभीर जखमी होत आहेत, तर काहींना आपला जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसवावेत, अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरील तिनबत्ती चौकाची रचना अत्यंत धोकादायक ठरली आहे. काळ नदीच्या पुलानंतर असलेला तीव्र उतार आणि गोव्याच्या दिशेने येताना कोणत्याही प्रकारचे वेग नियंत्रण साधन नसल्याने वाहनांचा वेग अनियंत्रित होतो. परिणामी, क्षणात अपघात घडतात आणि निरपराध नागरिकांना त्याची किंमत जीव गमावून चुकवावी लागते. अनेकदा झालेल्या अपघातांनंतरही संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. गतवर्षी स्थानिक रहिवासी रफिक जामदार या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर नागरिकांचा संताप अनावर झाला होता. त्यांनी महामार्ग रोखून आंदोलन करत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांनी गतिरोधक बसवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजपर्यंत त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. परिणामी, अपघातांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

या परिसरातून दररोज हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवास करतात. जिल्हा न्यायालय, द.ग. तटकरे महाविद्यालय, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालय, गीता तटकरे नर्सिंग कॉलेज तसेच विविध माध्यमांच्या शाळा याच भागात असल्यामुळे सुमारे ५ हजार विद्यार्थी या मार्गावरून ये-जा करतात. या लहानग्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. महामार्ग अरुंद असल्यामुळे आणि वाहतुकीचा प्रचंड ताण असल्यामुळे या चौकात सतत कोंडी होत असते. काही वेळा तर वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढतात. अशा परिस्थितीत एखादा अपघात झाला तर परिस्थिती आणखी भीषण बनते. ज्येष्ठ वकील व विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ यांनीही या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवण्याची गरज अधोरेखित केली आहे.

सध्या काळ नदीवरील नवीन पुलाचे काम सुरू असल्याने वाहतुकीवर अधिक ताण निर्माण झाला आहे. त्यातच या महत्त्वाच्या चौकात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त नसल्याने शिस्तीचा अभाव जाणवतो. तीनबत्ती चौक ते ढालघर फाटा या एक किलोमीटरच्या पट्ट्यात वारंवार कोंडी होत असून नागरिकांना तासनतास अडकून पडावे लागत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि पालकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे. जर तात्काळ गतिरोधक बसवले नाहीत, तर आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. त्यामुळे आज गरज आहे ती केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या कृतीची. कारण प्रत्येक दिवसासोबत एखाद्या निष्पाप जीवाचा प्रश्न या चौकात उभा राहत आहे. प्रशासनाने वेळेत निर्णय घेतला, तर अनेकांचे जीव वाचू शकतात. अन्यथा ही वेदनादायी साखळी कायम राहण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## उरण शहरातील शौचालयांची दुरवस्था

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील मुख्य रहदारीच्या ठिकाणी शौचालयाची कमतरता जाणवत असल्याने विशेषतः महिलांची गैरसोय होत आहे. तर, शहरात असणाऱ्या शौचालयांची स्वच्छतेअभावी दुरवस्था झाली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे नागरिकांना नाक दाबून शौचालयास जावे लागत असल्याने त्यांच्यात संतापाची भावना उमटू लागली आहे.




उरण शहरामध्ये मासळी बाजार, विमला तलाव, देऊळ वाडी व पेन्शनपार्क या चार ठिकाणी सार्वजनिक शौचालय आहेत. मात्र, उरण शहराच्या मुख्य प्रवेश द्वारापासून गांधी चौकपर्यंत एकही शौचालय नाही. त्यामुळे या गजबजलेल्या ठिकाणी शौचालय नसल्याने विशेषतः महिलांची गैरसोय होत आहे. तसेच, जी चार शौचालय आहेत त्यापैकी काही शौचालयांचे दरवाजे मोडक्या अवस्थेत आहेत. तेथील लाद्या देखील उखडलेल्या अवस्थेत आहेत. तर, काही ठिकाणी पाणी नसल्याने अस्वच्छता पसरुन घाणीचे साम्राज्य पसरले असुन रोगराईला आमंत्रण दिले जात आहे. त्यामुळे या घाणीमधून प्रांतविधीला जायचे कसे, हा प्रश्न नागरिकांना पडत असून त्यांना नाक दाबून शौचालयामध्ये जावे लागत आहे. एकंदरीत स्वच्छतेच्या नावाखाली लाखों रुपयांचा खर्च करणारी उरण नगरपरिषद शासनाच्या स्वच्छता अभियानाला हारताळ फासत असल्याचे दिसून येत आहे.

## पोलीस प्रशासनाची संयुक्तिक बैठक

**। खांब । प्रतिनिधी ।**

महिला व बालविकास विभाग व महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत ओम साई प्रेरणा लोकसंचालीत साधना केंद्र, नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प महिला आर्थिक विकास महामंडळ, माविम मित्र मंडळ आणि पोलीस प्रशासन यांची संयुक्तिक बैठक मंगळवारी (दि.३१) व्यवस्थापक शामीम चौधरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली रोहा पोलीस ठाणे येथे संपन्न झाली. यावेळी महिला बचत गट सहयोगिनी शामल खांडेकर, संजीवनी पोटफोडे, महिला पोलीस कर्मचारी पेडवी, प्रेषित भांड आदी उपस्थित होते.

## किल्ले भिवगड येथे स्वच्छता मोहीम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत जवळील वदप गौरकामत परिसरात असलेला भिवगड हा ट्रेकर्ससाठी आकर्षणाचे केंद्र आहे. ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धनाचा ध्यास घेतलेल्या राजा शिवछत्रपती परिवार अंतर्गत रायगड विभागाच्यावतीने किल्ले भिवगड (भिमगड) येथे ९१ वी विभागीय स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



राष्ट्रगीत, परिवार ध्येयमंत्र, शिवप्रेरणा मंत्र आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या गारद वंदनेने दुर्गम भागात राष्ट्रभक्तीचे चैतन्य पसरले. या मोहिमेत शिवप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गडावरील पाण्याच्या टाक्यांमधील गाळ काढून गड परिसर प्लास्टिक मुक्त केला. तसेच, गडावरील पायऱ्यांचे अवशेष आणि गुहांच्या स्वच्छतेकडेही विशेष लक्ष देण्यात आले.

## दिशा जाधवला डॉक्टर पदवी प्राप्त

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक क्षेत्रात आपल्या शिक्षणासोबतच भविष्यात जी काही उत्तुंग स्वप्ने रंगवली आहेत. त्यासाठी अधिकाधिक महत्व देऊन आणि विशेष म्हणजे आई-वडिलांच्या स्वप्नांची पूर्तता करून बी.डी.एस.परीक्षेत उत्तीर्ण होऊन दिशा जाधव हिने डॉक्टर पदवी प्राप्त केली आहे. त्यामुळे तिच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.



माथेरानची कन्या दिशा हिने खेड-रत्नागिरी येथील योगिता डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटलमध्ये शिक्षण घेऊन बी.डी.एस.परीक्षा उत्तीर्ण केली. सुरुवातीला तिचे शालेय शिक्षण माथेरान व बदलापूर याठिकाणी झाले होते. माथेरान सारख्या दुर्गम भागातील या कन्येने माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शालेय जीवनात नेहमीच हुशार आणि अभ्यासक्रमात अग्रेसर भूमिका त्यांनी पार पाडली आहे. तिचे वडील योगेश जाधव हे शिक्षक असून आई प्रगती जाधव या उच्चशिक्षित महिला आहेत. पालकांचे आणि शिक्षकांच्या उत्तम मार्गदर्शनामुळे आपण जिद्दीने ह्या बी.डी.एस. परीक्षेत उत्तीर्ण झालो आहोत. कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि मेहनत घेतल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नसल्याचे देखील दिशा जाधव यांनी सांगितले.

## १ एप्रिलपासून शाळांना सुरुवात

**पनवेल** : १ एप्रिलपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून, शाळांच्या परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दीर्घ सुट्टीनंतर विद्यार्थी पुन्हा शाळेत परतल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी पनवेलमधील शाळेच्या प्रवेशद्वारावर शिक्षकांनी 'वेलकम बॅक टू स्कूल' असे फलक लावून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे हसतमुखाने अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. पालकही स्वतः मुलांना शाळेत घेऊन येताना दिसले. लहान विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह असून, नव्या वर्गात जाण्याची उत्सुकता त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती.

## माथेरानमध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता प्रादुर्भाव

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये सध्या भटक्या कुत्र्यांचा वाढता प्रादुर्भाव चिंतेचा विषय ठरत आहे. मुख्य बाजारपेठ तसेच प्रमुख रस्त्यांवर ठिकठिकाणी कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर बसलेले किंवा मुक्तपणे फिरताना आढळतात. विशेषतः लहान मुले किंवा ये-जा करणाऱ्या नागरिकांवर हल्ला करण्याचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.




स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील काळात मोकाट कुत्रा चावल्याच्या सुमारे ५०हून अधिक घटना नोंदवण्यात आल्या असून या सर्व प्रकरणांची नोंद माथेरानमधील बी.जे. हॉस्पिटलमध्ये झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी दर तीन वर्षांनी निर्बिजीकरण (स्टेरिलायझेशन) करणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, या प्रक्रियेला अनेकदा प्राणीमित्र संघटनांकडून विरोध केला जातो किंवा स्थानिक पातळीवर दुर्लक्ष केले जाते. दुसरीकडे नागरिकांचे म्हणणे आहे की, वाढत्या कुत्र्यांच्या संख्येमुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नगरपरिषदेने आणि संबंधित यंत्रणांनी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर प्राणीमित्र संघटनांनीही पुढाकार घेऊन निर्बिजीकरण मोहिमेत सहकार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे बोलले जात आहे.

## यश संपादनासाठी जिद्द आवश्यक | डॉ. राज कल्याणी यांचे प्रतिपादन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जीवनात यश मिळवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अथक परिश्रमाने अभ्यास करून यश प्राप्त करावे व गुणवत्तेची कास धरावी. जेणेकरून जीवनात आपल्याला उचित ध्येय गाठता येते. शालेय जीवनात अभ्यासाकडे सर्वाधिक लक्ष देणे गरजेचे आहे. मीही सर.एसए. हायस्कूलमध्ये शिकत असताना जिद्द व चिकाटी सोडली नाही. खुप मेहनत घेतली आणि यश संपादन केले. आज मी डॉक्टर आहे. माझा



(छायाचित्रः गणेश चोडणेकर)

मुलगा डॉ. मयुर तुमच्या अंजुमन सायन्स कॉलेजमध्ये ११ वी, १२वी शिकला. त्यावेळी त्यानीही जिद्द, चिकाटी व अथक परिश्रम घेतले आणि डॉक्टर झाला. तुम्ही देखील अथक परिश्रम घेऊन आपले स्वतः चे विश्वविक्रम बनवा आणि पुढे जा. जेणेकरुन भविष्यात आपण देखील मोठे अधिकारी बनाल, असे प्रतिपादन मुरूड शहरातील ज्येष्ठ डॉ. राज कल्याणी यांनी केले.

नुकताच मुरूड जंजिरा अंजुमन इस्लाम हायस्कूल आणि विज्ञान-कला कनिष्ठ महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव व कला कनिष्ठ महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव समारंभ पार पडला. यावेळी ते बोलत होते. या समारंभला ॲड. अन्वर हुसेन, डॉ. मंगेश पाटील, ॲड. मोहन तांबडकर, डॉ. मकबुल कोकाटे, रहिम कबले, डॉ. शकील परदेशी, डॉ. वसीम पेशमाम, अंजुमन डीग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. साजिद शेख, अल्ताफ मलीक आदिंसह विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

## मूल्यांकन समितीकडून आगाराची पाहणी

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ आणि सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत मुरुड एसटी आगाराला मूल्यांकन समितीकडून भेट देण्यात आली. यावेळी पालघर विभागीय विभाग नियंत्रक कैलास पाटील, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी विजय पवार, प्रवासी मित्र अमर पडवळ व आगार प्रमुख राहुल शिंदे यांच्या समवेत पाहणी करण्यात आली. या मूल्यांकन समितीकडून बस स्थानकाची स्वच्छता, बसस्थानक व्यवस्थापन, स्त्री/पुरुष प्रसाधनगृहाची स्वच्छता, हरित बस स्थानक, बसेसची स्वच्छता, विद्यार्थी पास, बसस्थानक इमारतीची रंगरंगोटी, वाहक व चालक यांच्यासाठी असलेले विश्रांतीगृह, बस स्थानकातील मार्गदर्शक सूचना फलक याची पाहणी केली. यावेळी आवश्यक त्या योग्य सूचनाही यावेळी समितीकडून आगार व्यवस्थापक, बस स्थानक वाहतूक नियंत्रक नेस्टर वेगस तसेच उपस्थित कर्मचाऱ्यांना करण्यात आल्या.

### १४ रिक्तपदांसाठीचा कार्यक्रम जाहीर | २८ एप्रिल रोजी मतदान

# तळ्यात ग्रामपंचायत पोटनिवडणुकीची घोषणा

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील एकूण ६ ग्रामपंचायतींमधील १४ रिक्तपदांसाठी निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. काही सदस्यांच्या निधनामुळे व काही सदस्य अपात्र ठरल्यामुळे या जागा रिक्त झाल्या आहेत. या पोटनिवडणुका दि.२८ एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत पार पडणार आहेत. तर दि.२९ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून तळा तहसिल कार्यालयात मतमोजणी पार पडणार आहे.

तळा तालुक्यातील रहाटाड, चरईखुर्द, भानंग, मांदाड, निगुडशेत, तळेगाव या ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांसाठी निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. काही सदस्यांच्या निधनामुळे व काही सदस्य अपात्र ठरल्यामुळे एकूण १४ जागा रिक्त झाल्या आहेत. या पोटनिडणुकीसाठी उमेदवारांची नामनिर्देशन पत्र लेखी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधीमार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दि.७ ते १३ एप्रिल रोजी (दि.११ व १२ एप्रिल वगळून) सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत तळा तहसिल कार्यालयाच्या पहिला मजल्यावरील ग्राम न्यायालयात स्वीकारली जाणार आहेत. दि.१५ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. त्यांनतर दि.१७ एप्रिल रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ निर्धारित करण्यात आली आहे. त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजल्यानंतर निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. निवडणूक लढविण्यास आल्यास त्यासाठीचे मतदान दि.२८ एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. त्यानंतर दि.२९ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून तळा तहसिल कार्यालयच्या पहिला मजल्यावरील ग्राम न्यायालयात मतमोजणी पार पडणार आहे. अशाप्रकारे १४ जागेवर पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे काही ग्रामपंचायतींमध्ये सत्ताधारी गटाला आपली सत्ता टिकवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.




### ग्रामपंचायतीचे आरक्षण

रहाटाड प्रभाग क्रमांक १ अनुसूचित जमाती महिला, चरइखुर्द प्रभाग क्रमांक १ अनुसूचित जमाती महिला व अनुसूचित जाती, प्रभाग क्रमांक २ अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक ३ ना.मा.प्र. महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, मांदाड प्रभाग क्रमांक १ अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक २ सर्वसाधारण महिला, भानंग प्रभाग क्रमांक २ सर्वसाधारण महिला, निगुडशेत प्रभाग क्रमांक २ अनुसूचित जाती महिला, तळेगाव प्रभाग क्रमांक २ सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ३ सर्वसाधारण महिला.

# जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

## • उष्माघातापासून बचावासाठी पशुसंवर्धन विभाग सज्ज

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

राज्यात विशेषतः कोकण किनारपट्टीला आणि रायगड मध्ये पारा वाढू लागल्याने माणसांप्रमाणेच पशुपक्षी आणि जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे पशुधनाची वाताहत होऊ नये, यासाठी रायगड जिल्हा पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली असून पशुपालकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना आणि उपाययोजना जारी केल्या आहेत. पशुपालकांनी आपल्या जनावरांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी केले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत उष्णतेच्या ताणामुळे जनावरांची भूक मंदावते, परिणामी दुग्ध उत्पादनावर मोठा परिणाम होतो. विशेषतः म्हशींना त्यांच्या काळ्या रंगामुळे आणि शरीरातील कमी घामग्रंथींमुळे गायींच्या तुलनेत अधिक त्रास होतो. हा धोका टाळण्यासाठी जनावरांना थंड वातावरणात चारा देणे, युरिया प्रक्रिया केलेला चारा आणि मुरघासचा वापर करणे फायदेशीर ठरते. तसेच, जनावरांचे नियमित लसीकरण आणि जंतनाशक औषधोपचार पूर्ण करून घेण्याचे निर्देश विभागाने दिले आहेत.

जनावरांच्या आहारात मिठाचा वापर वाढवावा आणि पिण्याच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स मिसळावेत. दुधाळ जनावरांना संतुलित पशुखाद्यासोबत खनिज मिश्रणे द्यावीत. पक्ष्यांच्या बाबतीत त्यांच्या खुराड्यांमध्ये तापमान नियंत्रक व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच, मृत जनावरांची विल्हेवाट लावताना ती सार्वजनिक ठिकाणे किंवा जलसाठ्यांपासून दूर लावावी, अशा सुचनाही देण्यात आल्या आहेत.



### प्रभावी उपाययोजना

गोठ्याची उंची जास्त असावी. छप्पराला पांढरा चुना लावावा किंवा त्यावर पालापाचोळा टाकावा. गोठ्याभोवती ओले बारदाणे किंवा शेडनेट लावावेत. जनावरांना मुबलक थंड पाणी द्यावे. गोठ्यात हवा खेळती राहण्यासाठी पंखे किंवा फॉगर्सचा वापर करावा. बैलांकडून शेतीची कामे केवळ सकाळी किंवा संध्याकाळी करून घ्यावीत. भर उन्हात मशागत टाळावी. गोठ्याचा परिसर थंड ठेवण्यासाठी सभोवताली सावली देणारी झाडे लावावीत.

> “उष्माघातापासून होणारे पशुधानाचे नुकसान टाळण्यासाठी रायगड पशुसंवर्धन विभाग सज्ज आहे. पशुसंवर्धन विभागाने याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, कृपया त्याची पशुपालकांनी अंमलबजावणी करावी, जेणेकरून उष्माघात टाळता येईल. तरीसुद्धा जिल्ह्यात कोणतीही अशी बाब आढळून आल्यास तात्काळ नजीकच्या तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय किंवा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१/श्रेणी २ यांना संपर्क करून बाधित जनावरांवर उपचार करून घ्यावेत.”
>
> -डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड.

# वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम



। माणगाव । प्रतिनिधी।

वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळी आणि प्रेरणादायी पद्धत दाखवत मंगेश बाबुराव बुटे सर यांनी समाजसेवेचा सुंदर आदर्श घालून दिला आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे रुग्णांच्या सेवेसाठी आवश्यक वैद्यकीय साहित्याची मोलाची देणगी दिली. उपजिल्हा रुग्णालयाच्या कर्तव्यदक्ष अधीक्षक अरुणा पोहरे यांच्या मागणीनुसार बुटे यांनी २ एमएलचे १०००, ५ एमएलचे १००० आणि १० एमएलचे २०० अशा एकूण २२०० इंजेक्शन सिरिंज रुग्णालयाला भेट दिल्या. या साहित्यामुळे रुग्णालयातील दैनंदिन उपचार प्रक्रिया अधिक सुलभ होणार असून, अनेक गरजू रुग्णांना याचा थेट लाभ मिळणार आहे. या प्रसंगी अधीक्षक अरुणा पोहरे, डॉ. प्रथमेश शिंदे, डॉ. विशाल पवार, शर्मिला, अनिल तेटगुरे, जय खाडे व खाडे बंधू उपस्थित होते. मंगेश बुटे यांचा हा उपक्रम केवळ वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि सेवाभाव अधोरेखित करणारा ठरला आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) अर्चना मनिष चव्हाण २) समीर प्रकाश वरेरकर यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २१ | १७ | २८-००-०० | २८०-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
४१०२०१ मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत जमीन मालक श्री. आशिष वसंत कोल्हे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सिटी सर्व्हे नं. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|
| ६६९/अ | २४६.०० | 'अ' |

तरी वरील बिनशेती मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्बंध व बोजारहीत आहेत असे समजून, माझे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०३/०४/२०२६

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड -४१०२०१.

## जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, आणि हितधारकांस सुचित करण्यात येते की, मौजे शहाबाज, ता. अलिबाग जि.रायगड येथील खाली नमुद केलेल्या जमीन बाबत मे. दिवाणी कोर्ट अलिबाग येथे दिवाणी दावा दि. २४/२०२५ हा प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे अप्पर कलेक्टर अलिबाग यांच्याकडे आर.टी.एस. अपिल नं. ५५२ /२०२५ असे प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे सदर ७/१२ दप्तरी असणारे यशवंत टेमकर यांचे वारसांची नोंद ७/१२ सदरी करणे बाबत उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे आर.टी.एस. अपिल २५/२०२५ याचा निकाल आमचे अशिल स्मिता उमेश म्हात्रे यांच्या बाजुने झालेला असुन त्यांची नावे ७/१२ मध्ये नमुद केलेली नाहीत. त्यामुळे सदर मिळकतीचे प्रकरण दोन्ही कोर्टात प्रलंबीत असल्यामुळे सदर मिळकती बाबत कोणीही कुळधारक, खरेदीखत, गहाणखत, तारणखत किंवा कोणत्याही प्रकारचा रजिस्टर अथवा नोटरी दस्त तसेच, भाडेकरार करू नये मात्र मिळकतीबाबत कोणीही खरेदीखत अथवा साठेकरार केला असेल तर तो आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व सदर मिळकतीबाबत कोणीही टोकन दिले असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत टोकन घेणाऱ्या व्यक्तीस परत करावे.

जर कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला असल्यास त्या संदर्भातील कागदपत्र घेवुन वरील पत्त्यावर भेट घ्यावी. मात्र न आल्यास सदर ७/१२ मध्ये नोंद झाल्यानंतर कोणतीही हरकत आमच्या आशिलावर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**अनिता यशवंत टेमकर, अलका यशवंत टेमकर, आकाश यशवंत टेमकर, खाते क्र. ३२२ सामाईक खाते**

| अ.क्र. | गट क्र. | ला.यो.क्षेत्र | पो.ख.क्षेत्र | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | १०४ | ०.६४.८० | ०.०९.६० | ०.७४.४० |
| २ | १०७ | ०.८१.२० | ०.०६.६० | ०.८७.८० |
| ३ | ११३ | ०.३८.७० | ०.०२.५० | ०.४१.२० |
| ४ | ८५ | ०.३८.८० | ०.११.२० | ०.५०.०० |
| | एकुण | ०.२३.५० | ०.२९.९० | ०.५३.४० |

अलिबाग
दि. ३१/०३/२०२६

सही
**ॲड. सचिन एकनाथ नाईक**
**जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड**

# क्षयरोग दिनानिमित्त सीएमई सत्र

**अलिबाग** : जागतिक क्षयरोग दिनानिमित्ताने मेडिकोव्हर हॉस्पिटल, खारघर येथे क्षयरोग (टीबी) विषयक कंटिन्यूइंग मेडिकल एज्युकेशन (सीएमई) सत्र संपन्न झाले. या सत्राचे आयोजन व प्रकल्पांतर्गत मेडिकोव्हर हॉस्पिटल आणि नॅशनल ट्युबरक्युलोसिस एलिमिनेशन प्रोग्रामच्या सहकार्याने, जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड यांच्या समन्वयाने करण्यात आले होते. कार्यक्रमास डॉ. उषा नाईक डॉ.प्राची नेहुलकर यांचे मार्गदर्शन लाभले. सत्रात सुमारे ३५ डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी डॉ.ज्योती सालवी यांनी मार्गदर्शक तत्त्व आणि क्षयरोग प्रतिबंधक उपचार या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच खासगी क्षेत्रासाठी क्षयरोग सेवाफ या विषयावर विकास कुरणे यांनी माहिती देत खासगी डॉक्टरांची भूमिका, निक्षय प्लेटफॉर्मचा वापर व वेळेत निदान-उपचाराचे महत्त्व अधोरेखित केले.

# कनिष्ठ महाविद्यालयाची कार्यकारिणी जाहीर



। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा माणगाव येथील शैक्षणिक संकुलनात मंगळवारी (दि.३१) मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रा. भानुदास एन. बिरादार यांनी विजय मिळवत पुन्हा एकदा अध्यक्षपदावर विराजमान झाले. त्यांनी एकूण १०८ मते मिळवून प्रतिस्पर्धी उमेदवाराचा तब्बल ५७ मतांनी पराभव केला. व सलग दुसऱ्यांदा रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान त्यांना मिळाला. निवड प्रक्रिया अशोक दादा साबळे विद्यालयाच्या सभागृहामध्ये पार पडली होती.

ॲड. राजीव साबळे, कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ॲड. विनोद घायाळ आदी सर्व संचालकांच्या व शिक्षक सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

नव्या पदाधिकाऱ्यांची निवडही जाहीर करण्यात आली. त्यानुसार उपाध्यक्षपदी प्रा. किशोर एस. पाटील व प्रा. दत्ता एस. देवकर, सरचिटणीसपदी प्रा. शामसुंदर एस. किर्तने, सहसचिवपदी प्रा. नमिता जी. वानखेडे व प्रा. सचिन एच. लोखंडे, खजिनदारपदी प्रा. एच. एल. घोळवे, तर जिल्हा समन्वयकपदी प्रा. निवांत बी. केदार यांची निवड करण्यात आली. तसेच विविध तालुक्यांसाठी अध्यक्षांचीही निवड जाहीर करण्यात आली असून, अलिबाग, पेण, मुरुड, पनवेल, उरण, कर्जत, सुधागड, खालापूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, महाड, माणगाव, रोहा व पोलादपूर या तालुक्यांचे प्रतिनिधी निश्चित करण्यात आले आहेत. या सभेस महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे समन्वयक मुकुंद आंदळकर, रविंद्र भदाणे, जगदिश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक प्रक्रिया आंदळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निरीक्षक म्हणून भदाणे तर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जगदिश पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शब्बीर हज्जू यांनी केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकतीच्या मिळकत पत्रिका सदरी मालक व कब्जेदार म्हणून ही श्रीमती सुनिता शंकर फडके यांची नोंद आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी असून, सदर मालकांच्या मालकी हक्काची व कब्जेउपभोगाची असलेली मिळकत आहे, असे सदर मालकांनी कथन केले आहे. सदर मिळकतीचा विकास करण्यासंबंधी सदर मालकांनी आमचे अशिलांसोबत व्यवहाराची बोलणी केलेली असून, त्या अनुषंगाने मालकी हक्क तपासण्याचा भाग म्हणून प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन:** तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका पेण, मे. सह दुय्यम निबंधक साहेब, पेण नगर परिषद यांचे हद्दीतील, मौजे पेण येथील बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गाव | नगर भूमापन क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| पेण | १३६९ | १२६.२० | ए |

वरील वर्णनातील जमिन मिळकत व त्यावरील घर मिळकत जिचा मालमत्ता क्र. PENN00002202, जुना मालमत्ता क्र.W4Z2002220 व मॅन्युअल मालमत्ता क्र. ४/१४३ असा आहे, अशी मिळकत पाणी नळ कनेक्शन, बांधकाम, वीज, दगड, वीट, माती, तरू, तृष्ण, काष्ठ, पाषाण, झाड-झाडोरा, सर्व वस्तूंसहित, जाणेयेण्याचे वहिवाटेचे व इजमेंटच्या वापरण्याचे सर्व हक्कासहित दरोबस्त व वर्तमानात प्राप्त झालेला वा भविष्यात प्राप्त होणारा संपूर्ण एफएसआय, उडता एफएसआय, टीडीआर, डीसीआर यासह मिळकत दरोबस्त असे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा, काहीही हक्क, दान, गहाण, भाडेकरार, बक्षिसपत्र, लीन, लीज, चार्ज, मालकी, वहिवाट, जाणे-येणेचा मार्ग, सामाईक मालकी हक्क, कोर्ट कचेरीचा वाद, जामीन कद्दा अथवा याआधी केलेला साठेकरार, बयाणा पावती अथवा इतर कोणत्याही प्रकारचा वा कसलाही हक्क वा हितसंबंध असल्यास वा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून त्यांनी ७ (सात) दिवसांच्या आत कागदपत्रानिशी आमच्या पत्त्यावर आम्हास समक्ष भेटून लेखी हरकत देऊन लेखी पोहोच घ्यावी.

अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व बोजा नाही व यदाकदाचित असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून या मिळकतीच्या अनुषंगाने सदर मालकांच्या मालकी हक्काचा दाखला देण्यात येईल. प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीस कोणीही परस्पर कोणत्याही वर्तमान पत्रात कोणत्याही स्वरुपाची हरकत प्रसिद्ध करू नये व अशी परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर हक्काचा दाखला दिल्यावर मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची दखल घ्यावी.

ठिकाण : पेण
दिनांक : ०३/०४/२०२६

सही/-
**ॲड. निषाद प्रकाश म्हात्रे**
पत्ता: १, महालक्ष्मी वैभव, चिंचपाडा रोड, पेण,
ता. पेण, जि. रायगड
मो. नं. ९६३७२६२५६९

## जाहीर नोटिस

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद मिळकती ह्या खरेदी देणार जमीन मालक यांचे मालकी व कब्जे वाहिवाटीच्या आहेत. या मिळकतीस येथून पुढे सदर मिळकती असे संबोधण्यात आले आहे. सदर मिळकती ह्या आमचे अशील हे खरेदी देणार जमीन मालक यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी घेत आहेत. सबब प्रस्तुत नोटिसीद्वारे कळवण्यात येते की सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, बँकेचा अथवा संस्थेचा अथवा कंपनीचा वारसा, गहाण, विक्री, विक्रीचा करार, इनाम, भाडेपट्टा, तारण, हवाला, विश्वस्त, देखभाल असा अथवा अन्य कुठल्याही प्रकारे कोणत्याही कायदेशीर बोजा अथवा हक्क हितसंबंध असेल व त्यामुळे सदर व्यवहारास हरकत असेल तर अशा व्यक्तींनी, बँकांनी अथवा संस्थांनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसहित खालील नमूद माझ्या पत्त्यावर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी अथवा प्रत्यक्ष भेटून नोंदवाव्या अन्यथा कोणाचेही काही हितसंबंध किंवा हरकती नाहीत असे समजण्यात येईल व आमचे अशील सदरू खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी व पोटतुकडी, ता. कर्जत जि. रायगड येथील गाव मौजे पोही ग्रामपंचायत हद्दीतील ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमुद मिळकती मधील संपूर्ण क्षेत्र-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४४/१९/अ | ०-२९-००<br>०-०१-०० | ०.२५ |
| | एकूण ०-३०-०० | |

सदर मिळकती व त्याबाबत असलेले सर्व हक्क व अधिकारासह.
येणेप्रमाणे जाहीर नोटिस आहे.

कर्जत
ता. ०३/०४/२०२६

**मोहित प्रभाकर दळवी**
वकील उच्च न्यायालय
पत्ता- ०५, १ ला मजला, सखाराम भुवन,
टी.एच.कटारिया मार्ग, माहीम मुंबई ४०००१६.
मो. क्र. ८०८२६५०१६३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौरकामत आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक गायत्री संतोष गांवकर यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६/४/ब | ००-३०-०० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी गायत्री संतोष गांवकर यांच्या मालकीचे ००-०४-५० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ०-०५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३ एप्रिल २०२६

**ॲड. स्वप्नील सदानंद पाटील**
बी. ए. एल. एल. बी.
पत्ता- भालिवडी, पोस्ट - गौळवाडी,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ८७७९९३३८७२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे जिते ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| सुनिल कुमार दिनबंधू हिंगड | ५४/१ | ०-१९-० पैकी स्वतःचे हिस्साचे असलेले क्षेत्र ०-०३-५ | ०.३७ |
| | ५३/३ | ०-०४-० | ०.०९ |
| | ५३/१ब | ०-७०-५६ पो.ख.०-०२-३९ | ८.४० |

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिन मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर जमिन मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. - राहुल वसंत म्हात्रे, रा. ६७-२, विठ्ठल मंदिर जवळ, ओवे गाव, खारघर, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १५/४/अ | ०.९८.००<br>पो.ख. ०.९७.०० | ०.५२ | श्रीमती शांताबाई काशिनाथ सोनावळे, वगैरे एकुण ४. |
| | एकुण १.९५.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०३/०४/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## SRM E-TENDER NOTICE No. 01/2026-27

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors.

| SRM e-Tender No. | RFx No. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 01/2026-27 | 7000039507 | Providing 5 nos of Multi Tasking Skilled Labour at EHV CCCM Division Panvel & EHV CCCM Sub Division, Kalyan for FY 2026-27. Period (01.05.2026 to 31.03.2027) | 17,52,297.25 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in**. **Contact person:** Shri Prashant H. Kanade, Executive Engineer (Civil), Mobile No.: 9545535278. Shri Dinesh G. Rathod, Dy. Executive Engineer (Civil), (I/C) Panvel. Telephone Nos. (022) 27480325 / Mob. No. 8554989447 & Shri Rushikesh A. Jadhav, Head Clerk, Mobile No. 9769130569, EHV CCCM Division, Panvel.

**Sd/-**
**Executive Engineer (Civil).**
**EHV CCCM Division, M.S.E.T.C.L., Panvel**

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका | ०३ गुलमोहर झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क मधील लायन्स गार्डन ते पी.डब्ल्यु डी. ऑफिस ते जुने कोर्ट ते बंदर नाका (प्लॉट नं.५०/३३ ते प्लॉट नं.३४, ३६/१, ५२०) येथे पावसाळी गटार बांधणे कामात ०३ झाडे बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

PMC-PARK-/१२२/२०२६-PTAD

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल संजय तुकाराम म्हसेपाटील हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक विवेक चैतण्या कोका, विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-कळंब, ता- सुधागड, जि - रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्राचे एकक आर.चौरस मीटर | आकार |
|---|---|---|
| १०/ब/प्लॉट नंबर १२ | बिनशेती प्लॉट, एकूण क्षेत्र ३-५४-०० | ३५-४० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-पाली सुधागड
दि. ०३/०४/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय - कळंब रोड कॉर्नर, जवळ
हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५





# जिल्ह्यात 'पवनपुत्र हनुमान की जय'चा जयघोष

**जिल्ह्यात हनुमान जन्मोत्सव गुरुवारी (दि.२) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी विधीवत पुजेनंतर मंदिरे खुली करण्यात आली होती. आरती झाल्यानंतर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण व शहरी भागातील ग्रामस्थ मंडळांनी ठीक-ठिकाणी मंदिरांना आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट केली होती. रात्री आठनंतर मिरवणूक काढण्यात आल्या होत्या. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीम पथकांच्या सादरीकरणामुळे मिरवणुकीत मोठी रंगत आली होती. 'पवनपुत्र हनुमान की जय'च्या घोषणांनी संपूर्ण जिल्हा न्हाऊन निघाला होता. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हयामध्ये पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.**



● हनुमानजयंतीनिमित्त खारआंबोली गावच्या मंदिरात हनुमानाचा जन्मकाळ साजरा झाला. मंदिराभोवती शासन काठी पारंपारिक वाड्यात नाचवण्यात आले लहानमुलांनी देखील काट्या बनवल्या. (छायाचित्र : सुधीर नाझरे)



● हनुमानजयंतीनिमित्त तेलवाडे गावच्या मंदिरात जन्मकाळ साजरा झाला. किर्तनाचा गावकऱ्यांनी लाभ घेतला.



● हनुमान जयंतीनिमित्त अलिबाग जवळील वाडगाव येथील हनुमान मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. (छायाचित्र : समीर मालोदे)



● पंचमुखी हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त भक्तांची गर्दी. (छायाचित्र- राजेश डांगळे)



● चिरनेर जवळील कोप्रोली गावातील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव भक्ती भावात संपन्न झाला. या निमित्ताने जन्माचा पाळणा गाणाऱ्या महिला. (छायाचित्र : श्रीनिवास काजरेकर)



● आक्षी-ताड येथील हनुमान मंदिरात मोठ्या उत्साहात हनुमान जनमोत्सव साजरा करण्यात आला. यनिमित्त ग्रामस्थांनी मंदिराचा गाभारा वेगवेगळ्या फुलांनी सजवला होता. (छायाचित्र: संतोष राऊळ)



● परहूर पाडा येथील हनुमान मंदिर ट्रस्टच्या हनुमान मंदिराच्या मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. (छायाचित्र: सुजल पाटील)

# रोह्यात मारुतीरायांच्या दर्शनासाठी रांगा

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या रोहा तालुक्यात महनुमान जयंतीफ्चा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. चैत्र महिन्याच्या शुभ मुहूर्तावर तालुक्यातील सर्वच हनुमान मंदिरांमध्ये जन्मोत्सवाचा सोहळा पार पडला. यावेळी हजारो भाविकांनी मारुतीरायांच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.



रोहा शहरातील मुख्य मारुती मंदिर, अष्टमी येथील पुरातन मंदिर, तसेच वरसे, धाटाव, किल्ला, कोलाड, सुतारवाडी, चणेरा या परिसरातील हनुमान मंदिरांना आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. पहाटे ५ वाजल्यापासूनच मंदिरांमध्ये विधीवत पूजा, अभिषेक आणि आरतीला सुरुवात झाली. बरोबर सूर्योदयाच्या वेळी पाळणा हलवून आणि गुलाल-फुलांची उधळण करून मबजरंग बलीफ्चा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. बोला जय हनुमानच्या गजराने लहानग्यांनी आकर्षक वेशभूषा करून उत्सवाचा आनंद लुटला. या उत्सवाचे औचित्य साधून तालुक्यात ठिकठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन, प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मंदिरांमध्ये स्थानिक भजनी मंडळांनी पहाटेपासूनच विठ्ठल-रुक्मिणी आणि हनुमंताच्या नामाचा गजर सुरू केला. दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

संध्याकाळच्या सुमारास काही ठिकाणी भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीम पथकांच्या सादरीकरणामुळे मिरवणुकीत मोठी रंगत आली होती. मंदिरा बाहेर हार, नारळ, फुगे, आईस्क्रीमची दुकाने सुद्धा होती. तालुक्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातही हनुमान जयंतीचा उत्साह ओसंडून वाहात होता. गावागावातील हनुमान मंदिरांना ग्रामस्थांनी एकत्र येऊन सजवले होते.शेतीकामाची लगबग असली तरी, बळीराजाने आपल्या आराध्य देवतेच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी मोठी गर्दी केली होती. हनुमान जयंतीच्यानिमित्ताने सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. प्रशासनाच्या वतीने आणि पोलीस दलाच्या वतीने सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता,ज्यामुळे हा सोहळा शांततेत पार पडला.

'सियावर रामचंद्र की जय' आणि 'पवनपुत्र हनुमान की जय'च्या घोषणांनी संपूर्ण रोहा तालुका भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

## काशिदमध्ये हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

पर्यटनात प्रसिद्ध असलेल्या मुरुड तालुक्यातील काशिद येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. स्वच्छ सुंदर विलोभनीय समुद्र किनारा लाभलेल्या काशिद गावातील हे मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून मानले जाते. सन.२०२३ मध्ये लोकवर्गणीतून,सर्वांच्या सहकार्याने संकल्प करून, पुनर्बांधणी करुन आकर्षक असे मंदिर उभारण्यात आले आहे. येथील हनुमान मंदीरात हनुमान जन्मोत्सव उत्साहानिमित्ताने ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी श्रीहनुमान जन्मोत्सव, हनुमान पाळणा, आरती, तसेच जयहनुमान प्रासादिक भजन मंडळाने सुश्राव्य बहारदार भजन सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे औचित्य साधून मनोरंजनात्मक पडद्यावरील जय श्री राम चित्रपट सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी काशिद ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## खांदा वसाहतीत महिलांचे कीर्तन


**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री हनुमान जयंतीनिमित्त खांदा वसाहत येथील हनुमान मंदिरामध्ये भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळपासूनच मंदिरात भाविकांची वर्दळ वाढली असून संपूर्ण परिसर भक्तिमय



वातावरणाने दुमदुमला होता. यावेळी मंदिरात विशेष पूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे महिला वर्गाकडून पारंपरिक पद्धतीने कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे उत्सवाला अधिक रंगत आली. भक्तांनी कुटुंबासह दर्शन घेत नवस फेडले, तर मंदिर परिसरात शिस्तबद्ध व्यवस्था ठेवण्यात आली होती. हनुमान जयंतीचा उत्साह आणि भक्तीभावामुळे परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

## मुरुडमध्ये हर-हर महादेवचा गजर



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड जुनी पेठ येथील श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील हनुमान मंदिरात जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्याने गुरुवारी सकाळी हनुमनाच्या मुर्तीस अभिषेक महापुजा करुन हनुमानतला पाळण्यात घालुन हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

मुरुड शहरांसह पंचक्रोशीत भागातील तेलवडे, खारअंबोली, शिघ्रे येथे जन्मोत्सवानिमित्य भव्य यात्रा उत्सवाचे आयोजन केले होते.

१०० वर्षांची परंपरा असणाऱ्या मुरुड तालुक्यातील खारआंबोली गावात हनुमान जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. हनुमानाचे प्रशस्त मंदिर असून या देवस्थानची प्रतिष्ठापना १९२३ मध्ये झालेली आहे. हनुमान जयंतीनिमित्त दरवर्षी मोठ्या संख्येने नागरिक व ग्रामस्थ यात्रेसाठी येत असून मानाच्या काठ्यांना आदराने बोलवण्याची प्रथा आहे. यावेळी हर हर महादेवचा गजर करीत एकदरा, मिठागर, नांदला, कोंड आंबोली, वरची वावडुंगी, शिघ्रे आदिवासीवाडी तिसले वाडी, अशा अनेक मानकरी गावातून मिरवणुकीत वाजत-गाजत महादेवाचा गजर करीत मानाच्या काठ्या यात्रेत येतात. खार आंबोलीच्या वीर बजरंग व्यायामशाळेचे व्यायामपटू दांडपट्टा, मल्लखांब, लाठी, छाटी असे शारीरिक कसरतीचे प्रयोग सादर करतात.

## उरणमध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तसेच उरण शहर, रांजणपाडा, पागोटे, कोप्रोली, दिघोडे, गोवठणे, मोठे भोम, भेंडखळ, करंजा, चिरनेर, कळंबुसरे, विंधणे, वेश्वीसह तालुक्यातील इतर गावांमधील मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची गर्दी पहायला मिळत होती. यावेळी लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सगळ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

उरण तालुक्यातील उरण शहर, रांजणपाडा, पागोटे, कोप्रोली, दिघोडे, गोवठणे, मोठे भोम, भेंडखळ, करंजा, चिरनेर, कळंबुसरे, विंधणे, वेश्वी सह इतर गावांमधील मंदिरात हरिपाठ, भजन, कीर्तन, हनुमान चालीसा, प्रवचन सह इतर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पहाटेपासूनच भाविकांची गर्दी मंदिर परिसरात पहायला मिळत होती.

## बार्डीगावच्या मंदिरात मारुतीरायाच्या दोन मुर्त्या

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील बार्डीगावच्या मंदिरात मारुतीरायाची दोन मूर्त्या का ? असा प्रश्न आजच्या पिढीला पडत आहे. एक मुर्ती गावची व एक मूर्ती सोनारांची असे सांगितले जाते. बाबुराव निघोजकर व चुलते हरिश्चंद्र निघोजकर आणि वयोवृद्ध ग्रामस्थांकडून माहिती मिळाल्या प्रमाणे सन १९४०, ते स्वातंत्र्य पूर्व काळात बार्डी गावाला आग लागली होती. त्या काळात घरे जुनी केमळीची (कुडाची) होती. त्यामुळे आग गावभर पसरली त्याची झळ मंदिराला बसली. मग मूर्ती ग्रामस्थांनी नदीच्या पाण्यात नेऊन ठेवली.



काही महिने मंदिरात मूर्ती नसल्याने व मूर्ती तर पाहिजे तीही नवीन, मग बार्डीत राहणारे ग्रामस्थ बाबुराव निघोजकर (सोनार) व हरिश्चंद्र निघोजकर (सोनार) या बंधूनी नवीन मुर्ती व रामाच्या पादुका स्वखर्चाने आणून विधीवत प्राणप्रतिष्ठा करुन मारुतीरायाची स्थापना केली. परंतु काही महिने गेल्यावर नदीतील मारुतीराया ग्रामस्थाच्या स्वप्नात येऊ लागले मलाही मंदिरात यावयाचे आहे. पाण्यात राहायचे नाही. मग ग्रामस्थांनी एक शुभ दिवस पाहून सन्मानाने पावला पावलावर श्रीफळ वाढवून मारुतीरायांना पुन्हा मंदिरात आणून विधीवत पूजा करुन स्थापना केली. नदीतून आणताना मूर्तीच्या चेहरे जवळ दुभंगली गेली ग्रामस्थानी क्षमा मागुन ती आजपर्यंत मोठ्या भक्तीभावाने पूजा, हनुमान जयंती व पालखी काढून मोठ्या आनंदाने उत्सव, साजरा करण्यात येत आहे. तसेच मध्यांतरी सन २०१२/१३ रोजी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला.

## परहूरपाड्यात हनुमान मंदिराचा वर्धानपन दिन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

परहूर पाडा हनुमान मंदिर ट्रस्टच्या हनुमान मंदिरा मंदिराचा पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात गुरुवारी (दि.२) एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. सकाळी श्रींची विधिवत पूजा करण्यात आली. मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त मंदिराच्या ज्यांनी सढळ हस्ते मदत केली त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. मंदिराचे जुने विश्वस्त परशुराम पाटील तसेच जनार्दन घरत यांच्या सत्कार करण्यात आला.

रात्रौ श्रीच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यादरम्यान घरोघरी सुहासिनी औक्षण करून पूजा केली. यात महिला, युवती सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वस्त, मंडळाचे पदाधिकारी, महिला मंडळ, युवक मंडळ, भगिनी, भाविक ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य केले. याप्रसंगी परशुराम पाटील, रघुनाथ घरत, बळीराम भोसले, जनार्दन घरत, विनोद खोपकर, सुधीर पाटील, दत्ताराम बायंगुळकर, सुनिल बुरुमकर, हेमंत घरत, लक्ष्मण पाटील, अभिमन्यु नाईक, प्रकाश खोपकर, राजेंद्र नाईक, विकास खोपकर, विजय रामाने, अनंत भोसले, हरिश्चंद्र पाटील, शरद भोसले, कमलाकर घरत, संजय जोशी, सुनिल पाटील, मधुकर ठाकुर, निलेश कदम, मुकुंद नाईक, सुभाष पाटील आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेलवडे सुहासिनींच्या हस्ते पाळणा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील तेलवडे या गावातील मंदिरात गुरुवारी पहाटे हनुमान जन्मोत्सव तेलवडे, मुरुड, लक्ष्मीखार येथील शेकडो ग्रामस्थ भक्तांच्या उपस्थितीत साजरा झाला. यंदा हनुमान जन्मोत्सवाचे १२६ वे.वर्ष आहे. गावातील ग्रामस्थ राजन नाक्ती, दर्शन मिठागरी, रविंद्र नाक्ती आदी यांचे हस्ते हनुमानाची पहाटे विधिवत अभिषेक, पूजा-अर्चा व आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. हनुमान मूर्तीला पाळण्यात ठेवून सुहासिनींच्या हस्ते पाळणा घेण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्य साधून रोहा येथील मंदार भावे यांचे हनुमान चरित्रावर सुश्राव्य किर्तनाचा



लाभ भाविकांनी घेतला. तेलवडे ग्रामस्थांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. पहाटे जन्मकाळ, आरती नंतर प्रसाद देण्यात आला. हनुमान जयंतीनिमित्ताने गावातून पालखी काढण्यात आली. यानिमित्ताने यात्रेचे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळी निलेश तांबडकर यांच्यासहअनेक ग्रामस्थांनी प्रसादाचा लाभ घेतला.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028






## राशीभविष्य

- **मेष** : नातेवाईकांशी वाद होतील. उधारी वसुलीला त्रास होईल. काही त्रासदायक गोष्टी घडतील.
- **वृषभ** : ज्येष्ठांचा आशीर्वाद मिळेल. धार्मिक गोष्टीत मन रमेल. मनाजोगी कामे होतील.
- **मिथुन** : काही कामात अडथळे निर्माण होतील. शब्द जपून वापरा. मन चंचल बनेल.
- **कर्क** : आर्थिक प्रश्न सुटेल. आवडत्या पाहुण्यांची सरबराई करावी लागेल. आनंदी दिवस.
- **सिंह** : संततीच्या मागण्या वाढतील. कोणाच्या वादविवादात पडू नका. तब्येतीस जपा.
- **कन्या** : नवी योजना कार्यान्वित कराल. श्रेष्ठांचा आशीर्वाद मिळेल. प्रवासाचा आनंद घ्याल.
- **तूळ** : वादविवाद टाळा. काही घटना मनाविरुद्ध घडतील. मित्रांपासून सावध रहा.
- **वृश्चिक** : सरकारी कामे मार्गी लागतील. अचानक धनप्राप्तीचे योग. संततीचे हट्ट पुरवाल.
- **धनु** : काही वाईट अनुभव येतील. आर्थिक चणचण जाणवेल. जेष्ठांकडून त्रास जाणवेल.
- **मकर** : तुमच्या लिखाणास प्रसिद्धी मिळेल. मेहनतीचे चीज होईल. आप्तांच्या गाठीभेटी होतील.
- **कुंभ** : कामात अडथळे येतील. किरकोळ अपघातापासून सावध असावे. चीजवस्तू सांभाळा.
- **मीन** : सहकाऱ्यांची साथ मिळेल. कामात मन रमेल. नातेवाईकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल.

स्टाईल स्टेटमेंट

## ट्रेंडी वेस्ट कोट

उन्हाळ्यात स्टायलिश दिसण्यासाठी शॉर्ट वेस्टकोटचा पर्याय आहे. हे वेस्टकोट भारतीय आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही प्रकारच्या पेहरावांवर कॅरी करता येतात. वेस्टकोटमध्ये वेगवेगळ्या प्रिंट्सची चांगलीच चलती आहे. फ्लोरल, फ्रिंज्ड, ट्रायबल, जिओमॅट्रिकल, एम्ब्रॉयडरी आणि राजस्थानी प्रिंट्सवाले वेस्टकोट्स तुम्ही ट्राय करू शकता. एक वेस्ट कोट तुम्ही वेगवेगळ्या पद्धतींनी कॅरी करू शकता. शर्ट, कुर्ता, वन पीस, गडद रंगाचे ड्रेस यावर वेस्टकोट शोभून दिसतात. सलवार कमीजवर दुपट्ट्याऐवजी छानसा वेस्ट कोट घालता येईल. ट्रेंडी वेस्ट कोट मॅक्सी ड्रेसची रंगत वाढवू शकतात. जयपुरी वेस्ट कोट कुर्ती किंवा टॉपवर सहज घालता येतात. प्लेन कुर्ती किंवा टॉपसोबत हे रंगीबेरंगी वेस्ट कोट छान दिसतात. सौम्य रंगाचे पेहराव असतील तर त्यावर शिफॉनचे फ्लोरल प्रिंटवाले वेस्ट कोट घाला. रात्रीच्या कार्यक्रमासाठी झगमगीत म्हणजे शिमरी वेस्ट कोट कॅरी करा. गडद रंगाच्या कपड्यांवर हे वेस्ट कोड घाला. कॅज्युअल आउटिंगसाठी डेनिम वेस्ट कोट आहेत. फॉर्मल लूकसाठी पांढऱ्या शर्टवर लोकरीच्या पातळ धाग्यांपासून बनवलेले वेस्ट कोट ट्राय करा. ऑफिससाठी हा लूक बेस्ट आहे.

## ३ एप्रिल

दिनविशेष

- १६८० : छत्रपती शिवाजी महाराजांचं निधन.
- २०१४ : परवेझ मुशर्रफ खुनी हल्ल्यातून बचावले.
- २०१५ : जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्री म्हणून पीडीपीच्या मेहबूबा मुफ्ती यांचा शपथविधी.
- २०१७ : गानसरस्वती किशोरी आमोणकर यांचं निधन.
- २०१८ : दहशतवादी हाफीज सईदच्या राजकीय पक्षाला अमेरिकेने दशशतवादी संघटना ठरवलं.

सफर देशांची

## मध्य अमेरिकेतला निकाराग्वा

निकाराग्वा हा मध्य अमेरिकेतला सर्वात मोठा देश. हाँड्युरस आणि कोस्टारिका हे निकाराग्वाचे शेजारी. या देशात सारख्या चक्रीवादळं, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक अशा नैसर्गिक आपत्ती येत असतात. 'मॅनाग्वा' ही या देशाची राजधानी. 'गोल्ड कॉर्दोबा' हे चलन. स्पॅनिश, इंग्रजी या इथल्या प्रमुख भाषा. या देशाच्या पूर्व किनारपट्टीलगत 'मॉस्किटो कोस्ट' नावाचा भाग आहे. इथे दक्षिण अमेरिकेतल्या सर्वाधिक पावसाची नोंद होते. मॅनाग्वा हा इथला गोड्या पाण्याचा तलाव आहे. या तलावात शार्क मासे आढळतात. बुल शार्क मासे अटलांटिक महासागरातून रिओ सॅन जुआन नदीपर्यंतचा प्रवास करतात आणि मग या तलावात येतात. शार्क गोड्या पाण्यातल्या वातावरणाशी पटकन जुळवून घेतात. निकाराग्वामध्ये विविध प्रकारचे प्राणी आढळतात. माकडं, जंगली अस्वलं, जॅग्वार, बोआ कॉन्स्ट्रिक्टर हे प्राणी इथे पहायला मिळतात. मॅनाटिस आणि समुद्री कासवांचाही या देशात वावर आहे. इथे जवळपास ७० संरक्षित वनक्षेत्र आहेत. त्यामुळे नामशेष होत चाललेल्या प्राण्यांचे अधिवास यामुळे टिकून राहिले आहेत. इथल्या एका अभयारण्यात १२ प्रजातींचे विषारी साप आहेत. त्यांना संरक्षण देण्यात आलं आहे.

### पंचांग

**शुक्रवार, ३ एप्रिल २०२६**
विश्वावसूनासंवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ. १ **(गुड फ्रायडे)**,
चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : मघा, योग : गंड,
सूर्योदय ६.३३, सूर्यास्त ६.५१

### फॉरवर्ड्स

**ताल्लुक़ नस्ल देख़ क़र बनाया करो ज़नाब...**

**तालीम नें दिमाग़ तराशें हैं... जमीर नहीं...!**

आरोग्यमंत्र

## पचनाचा त्रास होतोय?

वेळी-अवेळी खाणं, गरजेपेक्षा जास्त खाणं, खाण्यात पचनास त्रासदायक अशा खाद्यघटकांचा समावेश असणं या सगळ्यामुळे पचनासंबंधी बऱ्याच तक्रारी संभवतात. मात्र घरगुती उपायांनी हा त्रासही कमी होऊ शकतो. उदाहरणार्थ खारट पदार्थ खाल्ल्यामुळे पोटाला होणारा त्रास तसंच अस्वस्थता नारळपाण्यामुळे कमी होते.



✻ कलिंगड, स्ट्रॉबेरी, अननस, संत्रं, मोसंबी यासारखी पाण्याचं प्रमाण जास्त असणारी फळं खाल्ल्याने आराम मिळू शकेल. या फळांमुळे शरीरातले विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते तर फळांमधल्या फायबरमुळे पचनाची क्रिया सुधारते, शरीरातली जीवनसत्त्वं तसंच खनिजांसारखे घटक टिकून शरीराला ऊर्जा मिळते.

✻ फायबरयुक्त पण हलका आहार घ्यायचा असेल तर ओटमील हा उत्तम पर्याय आहे. पेपरमिंट किंवा ब्लॅक टी ही घ्या. अनारोग्यदायी पदार्थ खाल्ल्याने पोट दुखत असेल किंवा पोटात गोळे येत असतील तर दोन वेळा काळा चहा प्या. या चहात कॅफेन नसल्याने तो आरोग्यदायी असतो. या चहामुळे शरीरातला वात कमी होतो.

✻ अतिखाण्यानंतर दुसऱ्या दिवशी अंडी खा. अंड्यात उच्च दर्जाची प्रथिनं आणि अमिनो ॲसिड्स असतात. यामुळे शरीरात साठलेले विषारी घटक बाहेर पडतात. सोबत पालक, मटार, ब्रोकोली, टोमॅटो यांसारख्या भाज्या खाता येतील.

### वेगळ्या वाटा

वैद्यकीय क्षेत्रात काही तरी वेगळं करण्याची इच्छा असेल तर तंत्रज्ञ म्हणून काम करता येईल. वैद्यकीय क्षेत्रातले तंत्रज्ञ डॉक्टरांचा आधारस्तंभ असतात. रक्तपेढीतले तंत्रज्ञ, निदान करण्यासाठी रक्त घेणारे प्रशिक्षित तज्ज्ञ म्हणजे फ्लेबॉटोमिस्टस अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात. वैद्यकीय क्षेत्रातले तंत्रज्ञ प्रशिक्षित असतात. हे तज्ज्ञ वैद्यकीय प्रयोगशाळा तसंच रक्तपेढ्यांमध्ये काम करतात. दात्यांकडून गोळा केलेलं रक्त ट्रान्सफ्युजन आणि ट्रान्समिशन या प्रक्रियांसाठी साठवून ठेवण्याचं काम ही मंडळी करतात. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## उत्तम व्यवस्थापक होण्यासाठी...

व्यवस्थापन हा कोणत्याही क्षेत्रातला अत्यावश्यक भाग असतो. योग्य व्यवस्थापनाने संस्थेतली सगळी कामं सुकर होतातच, शिवाय प्रगतीचा वेग वाढण्यासही मदत होते. विशेष म्हणजे सध्याच्या बदलत्या आणि आधुनिक काळातही व्यवस्थापनाचं महत्त्व कायम आहे. किंबहुना ते वाढत आहे. साहजिक या क्षेत्रात कारकिर्दीच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत. यशस्वी व्यवस्थापनात अनेक बाबींचा समावेश होतो. त्यामुळेच या विषयाचं योग्य प्रशिक्षण घेणं गरजेचं ठरतं. या शास्त्राचा अभ्यास करून पदवी घेतलेल्यांचं प्रमाण मागणीच्या मानानं बरंच कमी आहे. त्यामुळेच या अभ्यासक्रमाकडे ओढा आणखी वाढायला हवा. परिस्थितीचं नेमकं आकलन हे यशस्वी व्यवस्थापनामागील रहस्य असतं. त्याचबरोबर त्या त्या क्षेत्रात होत असलेले बदल, त्यात भविष्यात होऊ शकणाऱ्या सुधारणा, नवनवीन तंत्रज्ञान, वाढती स्पर्धा या बाबींची माहिती असणंही गरजेचं आहे. थोडक्यात यशस्वी व्यवस्थापनाच्या दृष्टीने कल्पकता आणि दूरदृष्टी हे गुण महत्त्वाचे ठरतात. तुमच्याकडेही ते असतील हे क्षेत्र तुमच्यासाठी योग्य आहे हे ओळखा.



खेचाखेची

### ... म्हणून हल्ला

**मिडिया** : तुम्ही इराणवर हल्ला का केला?

**ट्रम्प** : इराणकडे अण्वस्त्रे आहेत अशी आम्हाला शंका आहे.

**मिडिया** : मग तुम्ही उत्तर कोरियावर हल्ला का करत नाही?

**ट्रम्प** : कारण त्यांच्याकडे खरोखरच अण्वस्त्रे आहेत.

### वेगळं काही

अमेरिकेतल्या टफ्ट्स विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी स्मार्ट धाग्यांपासून कपडे तयार केले आहेत. वातावरणात अमोनिया, हायड्रोजन क्लोराइडसारखे घातक वायू असतील तर त्यांचा रंग बदलतो. कपड्यांचा रंग बदलल्यामुळे माणसाला वातावरणातल्या वायूंमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीव होते आणि बचावासाठी उपाययोजना करणं शक्य होतं. वातावरणात घातक वायूंचं प्रमाण जास्त असेल तर कपड्यांचा रंग खूप गडद होतो. हे कपडे स्मार्टफोनशी कनेक्ट करता येतात. खाणीत काम करणाऱ्या कामगारांना वायूगळतीमुळे त्रास होण्याची शक्यता असते. मात्र वेळेत सूचना मिळाली तर त्यांचे प्राण वाचवणं शक्य होत असल्याने हा शोध महत्त्वाचा मानला जात आहे.

माय स्पेस

## कामाचा ताण येतोय?

तणाव हे सध्याच्या कार्यशैलीचं बायप्रोडक्ट आहे असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. पण म्हणून तणावाकडे दुर्लक्ष करुनही चालणार नाही. कारण तसं केल्यास याचं रुपांतर क्रॉनिक तणावात होण्याची शक्यता असते. म्हणूनच कामाचा अतिताण जाणवत असेल तर काही बाबी लक्षात घ्याव्या.




पहिली बाब म्हणजे कामाबद्दल अतिविचार करण्यापेक्षा योग्य नियोजनावर भर द्यावा. काही वेळासाठी ब्रेक घेणंही उत्तम ठरतं. या काळात स्वत:साठी वेळ द्या. वेळेत काम संपवण्यात नेमक्या कोणत्या अडचणी येतात याची नोंद घ्या. कामाचा प्राधान्यक्रम ठरवताना गफलत होत नसल्याची खात्री करा. कोणत्या कामाला किती वेळ पुरेसा आहे, याचा अंदाजही तुम्ही घेऊ शकता. यासाठी ऑफिसमध्ये गेल्यानंतर आज किती कामं उरकायची आहेत याचा अंदाज घ्या. त्यानंतर नियोजनाप्रमाणे काम संपवण्यास सुरुवात करा. काम सुरु करताना वेळ कुठे वाया जातो हे तपासून बघा. कामाला उशीरा सुरुवात करणं, सोशल मीडियावर वेळ घालवणं, सहकाऱ्यांशी गप्पा मारणं हे तुमच्या कामातील कच्चे दुवे असू शकतात. काही प्रमाणात या सर्व बाबी गरजेच्या असल्या तरी यासाठी विशिष्ट वेळेची मर्यादा असणं गरजेचं असतं.

## सुडोकू ८६


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ४ | ८ | | | | ७ | |
| ५ | | ९ | | ६ | | ८ | | |
| २ | | ८ | ९ | | ७ | | ५ | |
| | | ६ | ३ | | | | | ५ |
| ८ | ५ | | | | | | ३ | ७ |
| ३ | | | | | ८ | ४ | | |
| | ८ | | ७ | | १ | ९ | | २ |
| | | २ | | ८ | | ७ | | ३ |
| | ६ | | | | ९ | ५ | १ | ८ |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८५चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १ | ५ | ९ | ८ | ३ | २ | ४ | ६ |
| ३ | ६ | ४ | ५ | ७ | २ | १ | ९ | ८ |
| ९ | ८ | २ | ४ | ६ | १ | ३ | ७ | ५ |
| ८ | ३ | ६ | ७ | ९ | ५ | ४ | २ | १ |
| ४ | ५ | १ | २ | ३ | ८ | ९ | ६ | ७ |
| २ | ७ | ९ | ६ | १ | ४ | ८ | ५ | ३ |
| ५ | ९ | ८ | १ | ४ | ६ | ७ | ३ | २ |
| ६ | ४ | ३ | ८ | २ | ७ | ५ | १ | ९ |
| १ | २ | ७ | ३ | ५ | ९ | ६ | ८ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक ८६



**आडवे शब्द :-**
१) जिव्हाळी लागलेली जखम, एखाद्याच्या रहस्याचा स्फोट
५) स्वामी स्वरुपानंदांच्या समाधीचे कोकणातील गाव
८) सद्वर्तनी
१०) वाईट कृत्य केले नसेल तर भिण्याचे काही कारण नाही या अर्थाची एक म्हण
१४) फुरसत
१६) कापणे (इं.)
१७) कबूतर
१९) ताकद
२०) पुन्हा
२२) मनात येणे, स्फुरणे
२४) नांगर
२५) मडके
२६) जाजम, सतरंजी
२८) अमावस्या (ग्रा.)
३०) अतिशयोक्ती करणे (वा.प्र)
३३) वेडा (इं.)
३४) प्रत्येक दिवशी
३६) अभिनेता
३७) उपयोग
३८) जन्मभर
३९) एक चतुर्थांश भाग
४०) मतदारांची सूची
४३) ऐतिहासिक लिखाण
४६) गज, वारण
४७) नवऱ्याची दुसरी भार्या
५०) पुरुष
५१) खोडसाळ, दुष्ट, खट्याळ
५२) समतल
५३) दारू पिण्याची जागा
५५) पाकळी, सैन्याचा भाग
५६) कडोसरी
५८) तरुण आणि शूर
६०) वालुकामय जमीन
६१) सोन्याचा कस
६२) पृथ्वी
६४) जोराने आवळणे
६५) अर्धा
६६) विपुलता
६९) खुंटी
७०) कल, शरीराचा तोल, डौल
७१) इंद्राच्या पत्नीचे एक नाव
७२) माणूस
७३) श्रीमंत, दैववान
७४) पाण्याचे थेंब थेंब पडणे

**उभे शब्द :-**
१) घोडदळातील एक अधिकारपद
२) भित्रा
३) किंमत
४) चोपडी
५) झाडाची पाने
६) पारंब्या असलेले झाड
७) बाजूला होणे
८) स्वाक्षरी
९) नोकर
११) पैसे देण्यास असमर्थ असलेला
१२) सोडणे, देणे
१३) अपशकुन
१५) माराची उमटलेली खूण
१७) पदर
१८) बातमी
२०) फुलातील रज, पुकेसर
२१) पूजेचे ताट
२२) वाळणे
२३) खंदक
२४) भारवाहक
२५) संकट, खटपट
२७) वल्लभभाई पटेलांना लोकांनी दिलेली पदवी
२८) उदबत्ती
२९) कमळ
३१) हिंदीत जनावर
३२) जातीतील पोटभाग
३३) पाप
३५) जन्मापासून
३७) खटला दाखल करणारा
३८) संगमरवरी दगड
४०) अभिप्राय
४१) लाकडी जिना
४२) जोंधळ्याचा दाणा
४५) कालपुरुष
४६) दु:खित होणे
४८) बडबड
४९) नमन, वंदन
५०) डोळे
५२) सरसकट
५४) बरोबर आलेला फौजफाटा
५५) दु:ख, वेदना
५७) कडक, घट्ट, निबर
५९) झकास
६०) दिवस
६३) माल, वस्तू
६४) भीती, साशंकपणा
६७) डाकिण, राक्षशीण
६८) वल्लरी
६९) बासरी
७०) निद्रा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




## निवडक

### नांगरवाडीत रंगणार क्रिकेटचा थरार

**रायगड :** रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोहन धुमाळ पुरस्कृत रामराज विभाग प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ओव्हर आर्म टेनिस क्रिकेट मर्यादीत षटकांचा सामना तीन दिवस रंगणार आहे. नांगरवाडी येथील श्री धावीर मैदानात हा क्रिकेटचा थरार दिवस रात्र पहावयास मिळणार आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी(दि.३) होणार आहे. यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल पाटील आदी मान्यवर उपस्थित असणार आहेत. रविवारी ५ एप्रिलपर्यंत या क्रिकेटचा आनंद प्रेक्षकांना घेता येणार आहे. या तीन दिवसीय दिवस - रात्र क्रिकेट स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात असून ग्रामस्थ व महिला मंडळ, श्री धावीर क्रिकेट संघ नांगरवाडी, रामराज विभाग क्रिकेट संघ, मोहन धुमाळ मित्र मंडळाकडून स्पर्धेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. या स्पर्धेचे माध्यम प्रायोजक म्हणून कृषीवल काम पाहणार आहे.

### राज मोरेची सलग दुसऱ्यांदा निवड

**खांब :** जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राज ज्ञानेश्वर मोरे याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर पुन्हा एकदा राज्य पातळीवर झेप घेतली आहे. त्याची सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र राज्य निवड चाचणीसाठी रायगड संघात निवड झाली आहे. राज मोरे याची क्रीडा वाटचाल सातत्यपूर्ण यशाने भरलेली




आहे. सन २०२० मध्ये किशोर गटात त्याने जय बजरंग रोहा संघाला रायगड जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत अंतिम विजेता बनवण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर कुमार गटात कर्णधार म्हणून दोन वेळा संघाला विजेतेपद मिळवून दिले, ज्यामुळे त्याचे नेतृत्वगुण अधोरेखित झाले.त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत २०२५ मध्ये रायगड जिल्हा कुमार गट संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली. पुढे त्याने महाराष्ट्र कुमार गट संघात स्थान मिळवत राज्य पातळीवर आपली छाप पाडली.नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत त्याने पुन्हा एकदा प्रभावी खेळ सादर केला. या कामगिरीच्या जोरावर त्याची प्रथम ४० खेळाडूंमध्ये निवड झाली आणि त्यानंतर अंतिम २२ खेळाडूंमध्ये स्थान मिळवत जिल्हा सराव शिबिरासाठी निवड झाली.यानंतर आता नाशिक येथे दि. २ ते ६ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या ७३ व्या वरिष्ठ गट पुरुष कबड्डी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघात त्याची निवड झाली आहे. राज मोरे याची ही यशस्वी वाटचाल म्हणजे मेहनत, शिस्त आणि जिद्दीचे उत्तम उदाहरण असून जय बजरंग रोहा संघ व रोहा तालुक्याचा अभिमान अधिक उंचावला आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### कुस्तीत अमेघाची 'रूपेरी' कामगिरी



**उरण :** सोलापूर येथे झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत उरण तालुक्यातील खोपटे गावची पैलवान अमेघा अरुण घरत हिने ५९ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल तिला रौप्यपदक देऊन गौरविण्यात आले. उरणच्या अमेघा घरतने राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकून यश मिळविले आहे.महाराष्ट्र राज्य कुस्ती संघाचे सचिव योगेश दोडके, भारत केसरी योगेश बोंबाळे, लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलांचे संस्थापक अध्यक्ष रूपेश पावशे यांनी अमेघाचे कौतुक केले. याप्रसंगी तिच्यावर संपूर्ण रायगडमधील कुस्तीपटूंचाच नव्हे तर सामान्य जनतेचा ही शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे. कारण एक मुलगी असून या कुस्ती क्षेत्रात आपले नावलौकिक केले आहे. उरणची अमेघा हिचे सर्वत्रच कौतुक होत आहे. आजकालच्या जगात मुली कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. त्याचेच एक उत्तम उदाहरण जगासमोर ठेवत उरण तालुक्यातील अमेघा घरतने हा मान मिळविला आहे. महिला

# लखनौमध्ये दिल्लीचा विजय

## अक्षर, राहुल शून्यावर बाद, रिझवी-स्टब्सच्या जोडीने केली कमाल

**। लखनौ । वृत्तसंस्था ।**

एकाना स्टेडियमवर लखनौ सुपर जायट्स आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये सामना रंगला. सामन्याचे नाणेफेक हे कर्णधार दिल्ली कॅपिटल्सने जिंकले आणि लखनौला प्रथम फलंदाजीसाठी मैदानात बोलावले. प्रथम फलंदाजी करताना लखनौने १४२ धावा केल्या आणि दिल्लीला १४३ धावांचे लक्ष्य दिले. लक्ष्यप्राप्ती करताना दिल्लीकडून फक्त समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्सला उल्लेखनीय कामगिरी करता आली. या दोघांच्या जोरावर दिल्लीने ६ विकेट्सने सामना जिंकला.




समीर रिझवीच्या नाबाद अर्धशतकामुळे आणि ट्रिस्टन स्टब्ससोबतच्या ११९ धावांच्या अभेद्य भागीदारीमुळे दिल्ली कॅपिटल्सने लखनौ सुपर जायंट्सचा सहा गडी राखून पराभव केला. आयपीएल २०२६च्या पाचव्या सामन्यात, दिल्लीने १४२ धावांचे लक्ष्य १७ चेंडू शिल्लक असतानाच पूर्ण केले. रिझवीने ४७ चेंडूंमध्ये नाबाद ७० धावा केल्या, तर स्टब्स ३९ धावांवर नाबाद राहिला.

लखनौच्या वेगवान गोलंदाजांनी दिल्लीच्या आघाडीच्या फळीला २६ धावांत बाद केली. केएल राहुलला पहिल्याच चेंडूवर मोहम्मद शमीने बाद केले. नितीश राणा १५ने धावा केल्या पण मोहसिन खानने त्याला बाद केले. प्रिन्स यादवने त्याच षटकात पथुम निस्संका (१) आणि अक्षर पटेल शून्यावर बाद केले. यामुळे दिल्लीची परिस्थिती बिकट झाली होती. मात्र, इम्पॅक्ट प्लेअर्स म्हणून मैदानात आलेल्या रिझवी आणि स्टब्सने डाव सावरला. सुरुवातीला त्यांनी थोडा वेळ घेतला, पण नंतर ते आक्रमक खेळू लागले. यांपैकी रिझवी सर्वात धोकादायक होता. त्याने मोठे फटके मारून सामना लखनौच्या हातून काढून घेतला.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना, लखनौने नवीन सलामीची जोडी निवडली. कर्णधार ऋषभ पंत मिचेल मार्शसोबत फलंदाजीला आला. हा डाव अयशस्वी ठरला. ऋषभ दुर्दैवाने धावबाद झाला. मार्शचा फटका त्याच्या समोर आला, गोलंदाज मुकेश कुमारच्या हाताला टच करुन गेला आणि यष्टी उडाल्या. त्यावेळी ऋषभ क्रीजच्या बाहेर होता. एडन मार्कराम ११ धावा करून अक्षरच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. आयुष बोदानी एकही धाव काढू शकला नाही आणि नटराजनच्या गोलंदाजीवर बाद झाला. निकोलस पूरनलाही केवळ आठ धावा करता आल्या.

कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर यष्टीमागे झेलबाद होण्यापूर्वी मार्शने तीन षटकार आणि दोन चौकारांसह ३५ धावा केल्या. समद आणि मुकुल चौधरी (१४) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला आणि संघाला १०० धावांच्या पुढे नेले. कुलदीपच्या फिरकी गोलंदाजीने मुकुलचा डाव संपवला. समदने २५ चेंडूंत तीन चौकार आणि एका षटकारासह ३६ धावा केल्या. १८.४ षटकांत डाव सर्वबाद झाला. मुकेश कुमार आणि विप्रज निगम वगळता दिल्लीच्या सर्व गोलंदाजांनी बळी घेतले.

### नुवान तुषाराची कोर्टात धाव

**नवी दिल्ली :** मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज नुवान तुषाराने एक खळबळजनक पाऊल उचलले. आयपीएलमध्ये खेळण्यासाठी नुवान तुषाराने श्रीलंकेच्या क्रिकेट बोर्डाविरोधात कायदेशीर लढाई सुरू केली आहे. आयपीएल खेळण्यासाठी खेळाडूकडे ना-हरकत प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. परंतु, श्रीलंकेच्या बोर्डाने तुषाराला प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यानंतर त्याने हा निर्णय घेतला आहे.नुवान तुषाराला मुंबई इंडियन्सने त्याच्या मलिंगा स्टाईल गोलंदाजीमुळे संघात स्थान दिले.

मात्र, श्रीलंकेच्या देशांतर्गत क्रिकेटमधील काही अटी किंवा राष्ट्रीय कर्तव्याचे कारण देत श्रीलंकेच्या क्रिकेट बोर्डाने त्याला आयपीएलसाठी आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. बोर्डाच्या या निर्णयामुळे त्याचे आयपीएलमधील करिअर आणि आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे त्याने श्रीलंका क्रिकेट बोर्डाविरोधात न्यायालयात धाव घेतली.

## संतोष बंगाळे यांना सुवर्णपदक

**। तळे । प्रतिनिधी ।**

पंढरपूर तालुक्यातील सोलापूर जिल्ह्यातील अजनसोंड या छोट्याशा गावातील सुपुत्र, पोलीस उपनिरीक्षक संतोष वसंत बंगाळे यांनी राष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद अशी कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. नागपूर येथे दिनांक २९ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या ६९ व्या ऑल इंडिया पोलीस ड्युटी मीट २०२६ या प्रतिष्ठित स्पर्धेत त्यांनी उत्कृष्ट कौशल्य, धैर्य आणि चिकाटीच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.



देशभरातील विविध राज्यांमधून आलेल्या उत्कृष्ट आणि प्रशिक्षित पोलीस खेळाडूंमध्ये अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत संतोष बंगाळे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्यांच्या या यशामुळे केवळ त्यांचे वैयक्तिक कर्तृत्व अधोरेखित झाले नसून, अजनसोंड गाव, पंढरपूर तालुका आणि संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे नावही उज्ज्वल झाले आहे.

संतोष बंगाळे यांनी बालपणापासूनच अनेक अडचणींचा सामना करत आपल्या जिद्दीच्या आणि परिश्रमाच्या जोरावर प्रगती साधली. मर्यादित साधनसंपत्ती असूनही त्यांनी खेळाविषयीची आवड जपत सातत्याने सराव केला आणि विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले. त्यांच्या कारकिर्दीत अनेक पदके मिळवली असली, तरी राष्ट्रीय स्तरावरील हे पहिले सुवर्णपदक असल्याने या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक अडथळ्यांवर मात करत एका छोट्याशा गावातून राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### चेस कँडिडेट स्पर्धा; दिव्या देशमुखचा पराभव

## प्रज्ञानानंदाने केली चौथी फेरी ड्रॉ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सायप्रसच्या पाफोसमध्ये सुरू असलेल्या फिडे कँडिडेट्स स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाने चौथ्या फेरीत जर्मनीच्या मथियास ब्लूबाउमविरुद्ध सामना ड्रॉ केला. चौथ्या फेरीत दोन सामने ड्रॉ झाले आणि दोन सामन्यांचे निकाल लागले. महिलांच्या गटात वैशाली रमेशबाबूने रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाविरुद्ध सामना ड्रॉ केला. तर, दिव्या देशमुखला चीनच्या झू जिनेरविरुद्ध पराभव पत्करावा लागला.



चौथ्या फेरीनंतर, ओपन गटात उझबेकचे ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव ३.५ गुणांसह अव्वल स्थानावर आहेत. अमेरिकन ग्रँडमास्टर फॅबियानो कारुआना दुसऱ्या, अनीश गिरी तिसऱ्या आणि आर प्रज्ञानानंदा चौथ्या क्रमांकावर आहेत. महिला गटात चौथ्या फेरीनंतर, भारतीय ग्रँडमास्टर वैशाली सहाव्या आणि दिव्या सर्वात खाली आठव्या क्रमांकावर आहेत. गेल्या वेळी भारताच्या डी गुकेशने हे जिंकून चीनच्या डिंग लिरेनला आव्हान दिले होते. तेव्हा गुकेश कँडिडेट्स टूर्नामेंट जिंकणारा भारताचा दुसरा खेळाडू ठरला होता. कँडिडेट्स टूर्नामेंट दर दोन वर्षांनी होते आणि याचा विजेता वर्ल्ड चॅम्पियनला आव्हान देतो. ओपन कॅटेगरीच्या विजेत्याचा सामना भारताच्या डी गुकेशशी, तर महिला कॅटेगरीच्या विजेत्याचा सामना चीनच्या जू वेनजुनशी होईल.

### क्रिकेटरची तक्रार; अभिनेत्रीला अटक

**नवी दिल्ली :** श्रीलंकन क्रिकेटर भानुका राजपक्षे आणि अभिनेत्री हर्षी रसंगा यांच्यातील वाद आता न्यायालयात पोहोचला आहे. क्रिकेटर भानुका राजपक्षे याने तिला कायदेशीर नोटीस पाठवली होती. नोटीस पाठवल्यानंतर, ९ लाख रुपये किम तीची सोन्याची साखळी परस्पर गहाण ठेवल्याप्रकरणी थलंगगामा पोलिसांनी अभिनेत्री हर्षी रसंगाला अटक केली.


सतरावे पुण्यस्मरण



स्व. सौ. उषा जयवंत पाटील

जन्म दि. १३-६-१९६९ मृत्यू दि. ०३-०४-२००९

शब्दांतून दु:ख व्यक्त करता आले असते
तर अश्रूंची गरज भासली नसती
सर्व काही शब्दांत सांगता आले असते तर
भावनांची किंमतच उरली नसती

शोकाकुल

पती-जयवंत, बहिण- सौ. दिप्ती (दिपा), मुलगी- प्रिती, मुलगे- आविष्कार व अथर्व, सासू- श्रीमती लिलाबाई, जाऊ- सौ. अंजना, भाऊ - श्री. उदय म्हात्रे, जावई - श्री. अमृत भोईर, मैत्रीण- सौ. मालती, सर्व पाटील परिवार आणि मित्र परिवार

मु. रांजणखार, ता. अलिबाग, जि. रायगड


## मायनाक भंडारी चषकाचा खांदेरी आरमार थळ विजेता

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

स्वराज्याच्या आरमाराचे शौर्य गाजवणारे विर मायनाक भंडारी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भंडारी बहुउद्देशीय सामाजिक संस्था, अलिबाग आयोजित राज्यस्तरीय मायनाक भंडारी चषक क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या १२ संघांच्या चुरशीच्या लढतींनी प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.



अंतिम लढत खांदेरी आरमार थळ आणि प्रिन्सी ११ पालघर यांच्यात रंगली. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात सचिन कदम यांच्या मालकीच्या खांदेरी आरमार थळ संघाने उत्कृष्ट फलंदाजी आणि अचूक गोलंदाजीच्या जोरावर विजय मिळवून मायनाक भंडारी चषकावर आपले नाव कोरले.

विजेत्या संघाला मायनाक भंडारी चषक आणि १,०५,५५५ रुपयांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. द्वितीय क्रमांक प्रिन्सी ११ पालघर संघास रोख रक्कम ५०५५५ तर तृतीय क्रमांक भंडारी सुभेदार किहीम संघास नंदकुमार मयेकर पुरस्कृत २५५५५ रुपये व संतोष कीर पुरस्कृत आकर्षक चषके देवून सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेतील कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नाना तोडणकर, नंदकुमार मयेकर, सुरेश खोत, संतोष कीर, संदीप खोत, कमलाकर पडवळ, संजय राऊत, मुरूड डोंगरी भंडारी समाज सर्व पदाधिकारी, तुकाराम शिलधनकर, कमलाकर पडवळ, नारायण पाटील, किरण राऊत, अविनाश आचरेकर,आदिक नार्वेकर, प्रशांत जाधव, निलेश खोत, नाशिकेत परकर, क्रांती जाधव, प्रकाश पारकर, मोहन खोत,गणेश गुळेकर उपस्थित होते.





|| श्री गणेश प्रसन्न || || श्री धावीर प्रसन्न || || जय शिवराय ||

सस्नेह निमंत्रण !

श्री. मोहन द. धुमाळ
पुरस्कृत

RPL RAMRAJ VIBHAG PREMIER LEAGUE 2026

रामराज विभाग प्रिमियर लिग २०२६

कृषीवल | माध्यम प्रायोजक

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे आपल्या रामराज विभागात रामराज विभाग प्रिमियर लीग ओव्हर-आर्म टेनिस क्रिकेटचे मर्यादित षटकांचे डे-नाईट सामने शुक्रवार दि. ३ एप्रिल २०२६ ते रविवार दि. ५ एप्रिल २०२६ रोजी आयोजित केले आहेत. तरी या कार्यक्रमात आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

उद्‌घाटक

मा. आ. श्री. जयंतभाई पाटील (मा. विधानपरिषद सदस्य)
मा. सौं. चित्रलेखा नृपाल पाटील (शे.का.प. प्रवक्त्या, महाराष्ट्र राज्य)
मा. श्री. सुरेश रामदास घरत (मा.तालुका चिटणीस, अलिबाग शे.का.प.)
मा. श्री. अनिल शां. पाटील (मा.तालुका चिटणीस, अलिबाग शे.का.प.)

स्थळ - श्री धावीर मैदान, नांगरवाडी

- आयोजक -

ग्रामस्थ व महिला मंडळ नांगरवाडी, श्री धावीर क्रिकेट संघ नांगरवाडी, रामराज विभाग क्रिकेट संघ व मोहन धुमाळ मित्र मंडळ


### दक्षिण आफ्रिकेचा एस्टरहुइजन ३९व्या स्थानावर | अष्टपैलू खेळाडूंमध्ये हार्दिक टॉप-२

# भारतीय संघाचे ४ फलंदाज टॉप-१० मध्ये

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसी टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत भारताचे ४ फलंदाज टॉप-१० मध्ये आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेत २०० धावा करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या कॉनर एस्टरहुइजनने ६४ स्थानांची झेप घेऊन ३९वे स्थान पटकावले आहे. अष्टपैलूंच्या क्रमवारीत हार्दिक पंड्या दुसऱ्या स्थानावर कायम आहे.









**अभिषेक अव्वल स्थानी**

टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत अभिषेक शर्मा ८७५ रेटिंगसह पहिल्या क्रमांकावर आहे. दुसऱ्या क्रमांकावरही भारताचा ईशान किशन आहे. टॉप-१० मध्ये भारताचे एकूण ४ फलंदाज समाविष्ट आहेत. यात तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनीही स्थान मिळवले आहे. पाकिस्तानचा साहिबजादा फरहान तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर इंग्लंडचा फिल सॉल्ट चौथ्या स्थानावर आहे.

**ऑलराउंडरमध्ये सिकंदर रझा पहिल्या स्थानावर**

ऑलराउंडर रँकिंगमध्ये झिम्बाब्वेचा सिकंदर रझा ३२८ रेटिंगसह पहिल्या क्रमांकावर आहे. भारताचा हार्दिक पंड्या २९९ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे. पाकिस्तानचा सॅम अयुब तिसऱ्या आणि नेपाळचा दीपेंद्र सिंग ऐरी चौथ्या क्रमांकावर आहे.

**गोलंदाजीमध्ये रशीद नंबर-१**

गोलंदाजांच्या क्रमवारीत अफगाणिस्तानचा राशिद खान ७५३ रेटिंगसह पहिल्या क्रमांकावर आहे. भारताचा वरुण चक्रवर्ती दुसऱ्या आणि पाकिस्तानचा अबरार अहमद तिसऱ्या स्थानावर आहे. टॉप-१० मध्ये भारताचा जसप्रीत बुमराह देखील समाविष्ट आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)